रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ११ जून २०२३



भारतीय लोकशाहीत निवडणुकीला महत्व आहे. या माध्यमातून लोकसेवक निवडले जातात! पण राजकारण व्यवसाय बनला आहे,सत्ता हे साधन बनले आहे. त्यामुळे निवडणुकीला "हिडीस' स्वरूप आले आहे. ते मिळविण्यासाठी वाटेल करण्याची राजकीय पक्षाची तयारी आहे. हे नेते आता राजकीय स्वार्थासाठी तीनशे वर्षापूर्वीच्या इतिहासकालिन "कबरी' खोदत आहेत! यातून महाराष्ट्रातील जनतेचे भले होणार काय? देशाचा अमृत महोत्सवात निवडणूक येत आहे. तेंव्हा यामेळी निवडणूक सामाजिक बांधिलकी व विकासाचे तोरणे बांधून साजरी केली पाहिजे. यातून जगाने भारतीय लोकशाहीचे, महाराष्ट्राचे विकासाचे कौतूक केले पाहिजे! देशात २०२४ मध्ये लोकसभा व महाराष्ट्र विधानसभेची निवडणुक होणार आहे! या निवडणुकीत राजकीय पक्ष मताच्या ध्रृव्रीकरणासाठी धर्माचा व जातीचा कुबड्या घेऊ लागले आहेत! यातून सामाजिक तणाव निर्माण होत आहे. आजपर्यत निवडणुकीत राजकीय पक्षाचा जाहीरनामा मतदारांसमोर ठेऊन त्याव्दारे मते मागण्याची परंपरा होती. आता पक्षच जाहीरनाम्याला फारसे महत्व देत नाहीत. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ व विधानसभेच्या २८८ जागेसाठी २०२४ मध्ये निवडणूक होणार आहे. ही निवडणूक महाविकास आघाडी विरूध्द भाजपा व शिवसेना शिंदे यांच्यात होईल, असे दिसतेय!



# राजकीय स्वार्थासाठी इतिहासकालीन 'थडगे' का खोदताय ?

महाविकास आघाडीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उध्दव गट यांच्यात अजून जागा वाटपाचा निर्णय झालेला नाही. यात मोठा भाऊ कोणतो ? हे ठरायचे आहे. आघाडीत मात्र जागांच्या वाटणीवरुन भावा- भावात वाद होऊन वज्रमूठ ढिली पडू नये म्हणजे, झाल! भाजपा-शिवसेना शिंदे गटात जागेच्या वाटपात अडचणी येतील, असे चिन्हे दिसत नाहीत. कारण दोघांची आता गरज आहे! या




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

निवडणुकीत भाजपाला पराभव करणाच! असा चंग विरोधी पक्षांनी बांधलेला आहे! तर भाजपा मित्र पक्षांनी मागील निवडणुकीपेक्षा यावेळी सर्वाधिक जागा जिंकण्यासाठी तयारी सुरु केली आहे. या निवडणुकीत विकासाच्या प्रश्नांची चर्चा होताना दिसत नाही. कारण धार्मिक व जातीचे गणित मांडून निवडणूक कशी जिंकता, याचेच गणित मांडले जात आहे. कर्नाटक निवडणुकीत 'मुस्लिम फॅक्टर' महत्वाचा ठरला आहे, त्यात सवंग योजनांची जोड दिली गेल्याने भाजपाचा पराभव झाला. यातूनच काँग्रेसला यश मिळाले! विरोधी पक्षाला भाजपाला पराभव करण्याचा 'फार्मूला' सापडला.तोच फार्मुला येणाऱ्या लोकसभा व महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत वापरला जाणार आहे! महाराष्ट्रात हिंदूची लोकसंख्या ७९.८ टक्के आहे, त्यानंतर मुस्लिम समाज दोन क्रमांकावर आहे. या समाजाची संख्या १३.५४ टक्के आहे. तर बौध्द, जैन, शीख इतर समाजाची संख्या कमी आहे, पण वंचित समाज एकत्र आला व त्यांची एकगठ्ठा मते पराभवासाठी कारणीभूत ठरू शकतात! याचा चांगला अनुभव नांदेडचे काँग्रेस नेते आशोक चव्हाण यांना आला आहे. तेंव्हा यांचे मतांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. काँग्रेस पक्षाने कर्नाटक निवडणुकीत टीपू सुलतान व बजरंग दल सारखे प्रश्न उपस्थितीत केले! असाच प्रयोग महाराष्ट्र निवडणुकीत होण्याची शक्यता आहे. कर्नाटकात टिपू सुलतानचे थडगे आहे,तर महाराष्ट्रात औरंगजेबाचे थडगे आहे! राज्यात परवा धार्मिक मिरवणुकीत काही विघ्नसंतोषी लोक डोक्यावर औरंगजेबाचे पोस्टर घेवून नाचले! यापूर्वी असे प्रकार घडल्याची नोंद आहे. खर तर! औरंगजेब हा त्यांच्या 'खानदान' चा नाही! तरी त्याला डोक्यावर का घेतले जात आहे ? कोल्हापूर येथे परवा समाजमाध्यमावर आक्षेपार्ह मजकूर व छायाचित्र प्रसिध्द झाल्याने हिंदू संघटना रस्त्यावर उतरल्या! यात दोन गट समोरा- समोर आले! त्यातून मग हिंसक घटना घडली! याचे कोणीही समर्थन करणार नाही.समाजमाध्यमातून दंगली घडविण्याचे षडंयत्र रचले जात आहे. कोल्हापूरात तर अल्पवयीन मुलांचा वापर केला आहे,हे दिसतेय! ही घटना कोणी व का घडविली ? या मागचा सूत्रधार कोण ? याचा पत्ता राज्याचा गुप्तचर विभागाला व पोलिस यंत्रणेला लागलेला नाही,पण ही घटना घडताच मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार व जितेंद्र आव्हाड यांना याची पूर्व माहिती होती, असेच दिसतेय! त्यांनी लगेच राज्यात सत्ताधाऱ्यांकडून दंगलीस प्रोत्साहन दिले जात आहे, असा आरोप केलेला आहे. जर, राज्यात सत्ताधारी दंगली घडवित असतील व याची त्यांना खात्रीपूर्वक माहिती असेल त्यांची नावे उजेडात आणावी, शांत कसे बसता ? केवळ हवेत आरोप करु का! सत्तेसाठी जर कोणी महाराष्ट्र जाळतोय! तर मग राज्य वाचविण्याचे कर्तव्य राजकीय नेत्यांचे नाही काय ? देशात काँग्रेस राजवटीत सर्वात अधिक दंगली झाल्या आहेत.महाराष्ट्रात यापूर्वी असंख्य दंगली झालेल्या आहेत, तेंव्हाही सत्ताधारी लोकांचा यात हात होता काय ? तत्कालिन मुख्यमंत्री सुधारकराव नाईक यांनी तर मुंबईतील दंगलीबाबत एका राजकीय नेत्याबद्दल गंभीर आरोप केला होता! शिंदे व फडणवीस सरकारने केवळ कारवाईचे इशारा देत न बसता! या घटनेतील मुख्य सूत्रधाराला अटक झाली पाहिजे! मग तो कोणत्याही पक्षाचा, धर्माचा असो!. तसे न जर झाले नाही तर! राज्य सरकार कांही तरी लपवित आहे, असाच संशय येवू लागेल! राज्यात दंगली होतात! सामान्य माणसांची डोके फुटतात! यात काही जणांना लोकांना अटकही केली जाते! नंतर मात्र या घटनेचा सर्वांना विसर पडतो! कोल्हापूरच्या घटनेत निश्चितच षंडयत्र आहे! राज्यात कट्टरपंथी लोक अधून - मधून डोके वर काढत आहेत! यातून उसामाबीन लादेन, औरंगजेब आणि टीपू सुलतान यांचे उदात्तीकरणाचे सोंग केले जात आहे. यातून भारतीय मुस्लिम बांधवांचे भले होणार आहे काय ? इतिहास पूसला जाणार नाही. मुस्लिम समाजाने अश्या प्रवृत्तींचा विरोध केला पाहिजे! त्यांचेमुळे संपूर्ण मुस्लिम समाज बदनाम होत आहे. भारताचा इतिहास वाचला तर लक्षात येईल! भारतात दहा क्रूर व लुटेरे शासक होऊन गेले आहेत. यात मिहिरकूल, अत्तिला हुन, मुहम्मद बीन कासीम, मुहमद गजनवी, मुहमद गोरी, चंगेजखान,तैमूर बाबर, औरंगजेब, नादीरशाह हे आहेत! तरी राज्यात सद्या औरंगजेबाचा उदो S उदो केला जात आहे! कट्टर मुस्लिम नेते त्याच्या कबरीवर फूले वाहत आहेत! तर राजकीय नेते तर इतिहास संशोधक बनले आहेत! औरंगजेब हा हिंदू व्देष्टा नव्हता! तो क्रूर नव्हता! तो धर्मनिरपेक्ष होता!त्याने मंदिरे पाडली नाहीत, असेही सांगितले जात आहे राजकीय नेत्यांना या क्रूर धर्मांध मोगल सम्राटाचा एवढा पुळका असेल तर त्यांनी इतिहासाचे पुनर्रलेखन करावे! किमान नवीन तरुण पिढी तरी वाचेल! पण तसे न करता! ते केवळ इतिहासावर बडबड करत आहेत! हे राजकीय विचारवंताचे लक्षण नाही. औरंगजेबाचे पूर्ण नाव अबू मुझफर मुहिउद्दीन औरंगजेब असे आहे! तो अतिशय धर्मांध व क्रूर शासक होता! हे १९४६ मध्ये पंडित नेहरु यांनी ' डिस्कवरी ऑफ इंडिया'या पुस्तकात म्हटले आहे. इतिहास संशोधकांनी तेच म्हंणणे आहे. औरंगजेबाने ४८ वर्षे भारतावर राज्य केले! मोगलाने भारतावर एक हजार वर्षे राज्य केले! औरंगजेबाने आपल्या साम्राज्याचा विस्तार अफगानिस्तान ते दक्षिण भारतापर्यंत केला होता. औरंगजेब म्हणजे क्रूरतेचे प्रतिक! त्याने हिंदू, शीखांचे सक्तीने धर्मांतर केले! त्याने आपल्या पूर्णकाळात धार्मिक अत्याचार, अन्याय केलेला आहे. यासाठी इतिहासाची पाने कमी पडतील! त्याने हिंदुवर जजिया कर लावला होता!यात ६ रूपये तर श्रीमंत हिंदू लोकांना १२ रूपये तो सालाना हा कर सक्तीने वसूल केला जात असे!पण मुस्लिमांना यातून वगळले होते! त्याच्या क्रूरतेच्या अनेक घटना आहेत! यात शिखांचे गुरू तेग बहाद्दूर यांना इस्लाम धर्म कबूल करण्यास सांगितले. माझे शिर कापा पण केस कापू देणार नाही, असे गुरूंनी सुनावले! त्यानंतर त्यांचे शिर कापून हत्या केली गेली. पण इतिहासात शिख बलीदानाचा उल्लेख पूर्णपणे नाही.

त्याचप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांना क्रूरपणे मारले! पण त्यांनी इस्लाम धर्म स्विकारला नाही. त्याचेसमोर गुडघेही टेकले नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी धर्म व राष्ट्राकरिता प्राणाची आहूती दिली आहे. औरंगजेब हा अतिशय महत्वाकांक्षी होता! आपल्या वडिल शहाजहान यांना मरेपर्यंत कैदेत ठेवले! त्यांचा छळ केला. त्यांना मरेपर्यंत पाणी पाजले नाही. तेंव्हा शहाजहान कैदैत असताना म्हणाला, 'हिंदू संस्कृतीत मृत वडिलांना मुलगा पाणी पाजवितो ! पण आमच्यात ही संस्कृती नाही, याचे वाईट वाटते! त्याने स्वतःचा भाऊ दारा शिकोह याचा १६६९ मध्ये विश्वासू शिपाायाच्या मदतीने शिर कापले! ते शिर ताटात ठेऊन दरबारात आणवयास लावले व तो भाऊ असल्याची खात्री केली. मृत भावाचे शिर आगरा फोर्टला पाठविले व धडाचे इतर ठिकाणी दफन केले! इटालियन इतिहासकार निकोलाई मानुची यांनी 'स्टोरिया दो मोगोर' या पुस्तकात लिहिले की, दाराला मृत्यूपूर्वी औरंगजेबने विचारले होते, आमची भूमिका बदली तर काय कराल! तेंव्हा दराने उपासपूर्वक उत्तर दिले, औरंगजेबच्या शरिराचे तुकडे करून दिल्लीच्या सर्व मुख्य कमानीवर लटकवेन'! औरंगजेबाचा विश्वासू सहकारी व इतिहासकार माहिर-ए- आलमगीरी यांनी लिहिलेल्या नोदींनुसार १६६९ मध्ये काशी येथील प्रसिध्द विश्वनाथ मंदिर विध्वंस करण्याचा हुकूम त्याने दिला होता! तेथे ज्ञानव्यापी मंदिर तोडून मशिद उभारले आहे. गुजरात राज्यातील प्रसिध्द सोमनाथ मंदिर तीन- चार वेळा उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. काश्मिर ब्राह्मणांना इस्लाम धर्म कबूल करण्यास भाग पाडले! बुंदेलचे महाराजा छत्रसालने औरंगजेबावर वार केला, त्यात गंभीर जखमी झाला होता! तो तीन महिने अंथरणावर पडून होता. शेवटी तो तडफडून १७०७ मृत पावला. त्याचे मृत्यूसमयी जवळ कोणीच नव्हते! आताचे छत्रपती संभाजीनगरपासून २५ किं.मी. अंतरावर खुलाताबाद येथे फकीर बुरूहानुद्दीनच्या कबरीजवळ औरंगजेबाला दफन करण्यात आले. तेथेच त्याची कबर आहे! औरंगजेब याच्या १६५८ ते १७०७ या काळात भारतातील सुमारे एक हजार मंदिरे तोडली, तसेच मस्सिदी बांधल्या आहेत! या इतिहासात उल्लेख आहे. पण काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर मुस्लिम समाज नाराज होईल! म्हणून, काँग्रेस सरकारने सोमनाथ मंदिराच्या पुनर्रउभारणीच्यावेळी अडथळा आणला होता. स्वातंत्र्यानंतर देशातील हिंदूनी प्रसिध्द मंदिरावर दावा करू नये म्हणून तत्कालिन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी १९९१ मध्ये "प्लेसेस ऑफ स्पेशल वरशिप स्पेशल ॲक्ट१९९१" हा कायदा आणला. या कायद्याचा मुस्लिम नेते आधार देत आहेत! मुस्लिम नाराज होतील म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून अनेक कायदे केले गेले! धर्मात हस्तक्षेप नको, म्हणून मुस्लिम सजातील जुन्या रुढी, परंपरेला संरक्षण देण्याचे काम केले गेल! तर दुसरीकडे हिंदू धर्मातील जुन्या रुढी व परंपरेला विरोध म्हणून धार्मिक, विवाहाचे कायदे गेले केले! यातून दोन समाजात दरी निर्माण होत गेली. भारतातीय घटनेत सर्वांना न्याय, अधिकार व हक्काचा अधिकार दिला गेला.यातून काँग्रेस सरकारने घटनेतील समान नागरी कायद्याला तिलांजली दिलीअसो! मुस्लिम समाज नाराज होईल याच उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराजांनी सेनापती अफजलखानाचा वध केला' हे इतिहासातील सत्य घटना ही झाकी म्हणून दाखविण्यास बंदी घातली गेली. पुरोगामी महाराष्ट्रात अफजलखानच्या थडगे परिसरात सुशोभिकरण करण्यापर्यंत मजल गेली. पण शिंदे- फडणवीस सरकारने हे सुशोभिकरण पाडून टाकले. अशा क्रूर व धर्मांध राजाचे काही राजकीय नेते व कट्टर मुस्लिम नेते जाणीवपूर्वक उदात्तीकरण करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज सर्वांना बरोबरीने घेवून स्वराज्यासाठी लढले! त्यांनी सर्व धर्माचा आदर केला! महिलांचा आदर केला! क्रूर व धर्मांध औरंगजेब, अफजलखान हे महान कधीपासून झाले ? हा धर्मांध क्रूर, अत्याचारी प्रवृत्तीच्या विरोधात आहे. तसेच अश्या प्रवृत्तीचे समर्थन करणाऱ्या कट्टर नेत्यांचा आहे ! तो मुस्लिम समाजाच्या विरोधात नाही. पण महाराष्ट्रातील पुरोगामी नेत्यांनी त्याला 'समाज व्देषाचे' स्वरूप देत आहेत. यातून मुस्लिम बांधवाकडे संशयाच्या नजरेतून पहाणे, हे चुकीचे आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी अनेकांनी बलिदान केले त्यांचे स्पप्न होते! या राज्यात सर्व धर्माचे बांधव गुण्या- गोविंदाने नांदतील! गरीब व अपेक्षित माणसांचे जे स्वप्न आहेत,ते निश्चितच पूर्ण होतील! देशात विकासाच्या बाबतीत हा महाराष्ट्र नेहमी अग्रसेर राहील. भारत - चीनच्या १९६२ च्या युध्दानंतर 'हिमालयाच्या मदतीसाठी सह्याद्री धावला, असे म्हटले गेले. कारण महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे देशाचे संरक्षणमंत्रीपद दिले गेले. हिमालयाच्या मदतीला धावणे हा महाराष्ट्र धर्म आहे! तो आजचे राजकीय नेते विसरले आहेत.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## श्रीकृष्ण आणि ज्ञानेश्वर

आधुनिक केसरी

अन्यथा त्याच्या घरी या सगळ्यांची अजिबात कमतरता नव्हती. गोपाळकाला आज आपण चवीने आणि प्रसाद म्हणून खातो पण त्या वेळी सामान्य गोपाळांनी आणलेले खाद्यपदार्थ एकत्र करून त्याने अनोखी सामाजिक समरसता साधली. सर्वांना समान पातळीवर आणले. इंद्रदेवाची केली जाणारी पूजा बंद करून अनाठायी होणाऱ्या पूजा, कर्मकांड इ. च्या विरोधातच तो उभा ठाकला. आज स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची वर्णने आपण आपण पेपरमध्ये, टीव्ही वर पाहतो. श्रीकृष्ण त्याच्या काळात अशाच अत्याचारित स्त्रीवर्गाच्या रक्षणासाठी उभा राहिलेला आपल्याला दिसेल. प्राग्ज्योतिषपूर नावाचे राज्य होते जे बहुधा आजच्या आसाममध्ये असावे. या राज्याचा राजा किंवा प्रमुख नरकासुर होता. अनेक स्त्रियांना पळवून आणून त्याने बंदिवासात ठेवले होते. स्त्रियांचे जिणे खरोखरीच नरक झाले होते. असेही सांगितले जाते या ठिकाणी स्त्रियांचा देहव्यापारासाठी वापर केला जायचा. अशा या स्त्रियांना बंदिवासातून त्याने सोडवले. नरकासुराला संपवले. आता या सोडवलेल्या स्त्रियांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला. यात त्या स्त्रियांचा काहीही दोष नसताना त्यांना स्वीकारायला समाज तयार नव्हता. आज सुद्धा समाजात ही मानसिकता आपल्याला टिकून असलेली आपल्याला दिसते. इथे श्रीकृष्णाचा दूरदर्शीपणा आपल्याला दिसतो. त्याने प्रसंगी आपले नाव देऊन त्यांचे पुनर्वसन घडवून आणले हा त्याचा केवढा मोठेपणा ! म्हणून श्रीकृष्ण हा आद्य समाजसुधारक होता असेच म्हणावे लागेल. श्रीकृष्णाचे चरित्र सांगताना काळाच्या ओघात कीर्तनकार, प्रवचनकार,पुराणे, भागवतकार आदींनी दिव्यत्वाचा साज चढवला. त्याचे चरित्र हे त्याच्या नेतृत्वाची, कर्तृत्वाची गाथा सांगण्यापेक्षा चमत्काराच्या कथा असे स्वरूप झाले.  या सगळ्यात श्रीकृष्णाने आमच्यासमोर प्रस्थापित केलेले आदर्श, त्याने दिलेली शिकवण याकडे आमचे दुर्लक्ष झाले आणि देव म्हणून आम्ही त्याची पूजा करू लागलो. त्याची पूजा करायची नाही का ?



## आनंदी पहाट

## वेळेचे मूल्य पैशांपेक्षा अधिक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या वेळेच्या व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यासाठी स्पष्ट उद्दिष्यांचा वापर कसा करायचा, आपल्या स्वतःला प्रेरित आणि शिस्तबद्ध राहण्यास मदत करण्यासाठी अनेक संसाधने देखील उपयोगात आणता येऊ शकतात. सामान्य वेळ-व्यवस्थापन आव्हानांवर मात करण्याच्या दृष्टीने नेहमीच उपयुक्त ठरत असते. जेणेकरून आपण आपला दृष्टिकोन सुधारत राहतो आणि आपला वेळ पूर्णपणे वापरतो. व्यवस्थापनात चांगला वेळ असण्यामध्ये जाणीवपूर्वक नियोजन आणि विचारपूर्वक निर्णय घेणे महत्वाचे असते. यामध्ये आपल्या कामाकडे, ध्येयाकडे लक्ष केंद्रित करणे आणि बिनमहत्त्वाच्या गोष्टींच्या बाबतीत विचलित होण्याऐवजी आपल्या प्राधान्यकृत कार्यांवर चिकटून राहणे देखील आवश्यक असते. प्रभावी वेळ व्यवस्थापन नेत्यांना, उद्योजकांना आणि लहान व्यवसाय करणाऱ्यांना, मालकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत करते. आपला वेळ हुशारीने व्यवस्थापित केल्याने दैनंदिन काम, आपल्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि एकूणच जीवनाचे संतुलन सुधारते आणि मिळणारा आनंद वाढत जातो. चांगल्या वेळेचे व्यवस्थापन ताणतणाव देखील कमी करते आणि आपल्याला आपली उद्दिष्टे जलद तसेच सहज साध्य करण्यास उपयुक्त ठरते. वेळेचे व्यवस्थापन आपल्या कामांना प्राधान्य देण्यास मदत करते, जेणेकरून प्रत्येक काम, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा वेळ उपलब्ध असल्याची खात्री होते. आपल्या कामाचा दर्जा वाढतो, त्यामुळे ते जलदगतीने अंतिम मुदतीपूर्वी पूर्ण करण्यासाठी घाई करावी लागत नाही. वेळ म्हणजे भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंत, भविष्यात अपरिवर्तनीय क्रमाने घडणाऱ्या घटनांचा सततचा क्रम होय. एखादी व्यक्ती या जगात अशा वेळेत जीवन जगत असते, जी त्याच अनुभवातून, घडणाऱ्या अनेक गोष्टीतून व्यक्त होत असते. दहा वर्षांपूर्वी आपण आजच्यासारखे नव्हतो. आपले रूप, ज्ञान, अनुभव, भोवताल ह्या सर्वच बाबी भिन्न होत्या.

## संघर्ष...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-2

तुमचा आजचा संघर्ष  तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो. त्यामुळे विचार बदला आणि बदलवा तुमचे आयुष्य.  आयुष्य खूप सोपं आहे, निर्णय घ्या आणि मागे वळून पाहू नका.  पण सिंहावलोकन जरूर करा. कधी कधी संघर्ष हा अटळ असतो. तो करावाच लागतो. किंबहुना त्याला तोंड दिल्याशिवाय पुढचे दार उघडतच नाही. तेव्हा संघर्ष नक्की करा. संघर्षात माणूस कधी कधी तावून सुलाखून निघतो. तर कधी त्यातून  सहज बाहेर पडतो. आयुष्यात कधी कधी खूप सहज काही गोष्टी मिळतात. पण काही गोष्टीसाठी खूप म्हणजे खूपच संघर्ष करावा लागतो.  मग संघर्ष आहे म्हणून काही गोष्टींचा ध्यास आपण घेऊ नये का???? आपल्याला ती मिळणारच नाही!!!!  म्हणून आशा सोडावी का?? प्रयत्न करायला काय हरकत आहे..  वेळ जरी वाया गेला तरी संघर्ष करताना काही अनुभव आपल्या सोबत राहतील. जी गोष्ट मिळवण्यासाठी संघर्ष केला त्या गोष्टीचे महत्त्व आपल्याला राहते. सहज मिळालेल्या गोष्टीला किंमत नसते व तिला तेवढं महत्त्व प्राप्त होत नाही.  जेवढा संघर्ष करून आपण काहीतरी मिळवतो त्याचा तेवढा आनंद मनाला होतो, आत्म्याला होतो.  संघर्ष करताना आपल्यात आत्मविश्वास निर्माण होतो. आपण ही गोष्ट करू शकतो याचा आनंद वाटतो. आणि मग कितीही अवघड संकटे आली तरी त्याला सामोरं जाण्याची आपल्यात हिमंत येते.  मुंगी बघा किती संघर्ष करत असते. एक साखरेचा कण घेऊन जात असताना भिंतीवर बराच उंचीवर पोहोचते. पण तो कण तिच्या तोंडातून खाली पडतो. ती पुन्हा खाली येते. आणि त्याच उत्साहाने तो कण घेऊन पुन्हा वर चढत असते. प्रयत्न सोडत नाही." प्रयत्न वाळूचे कण रगडीता तेलही गळे. तिचा संघर्ष पाहून अगदी खरंच ही म्हण आठवते. चोर बघा, चोरी करतो,अपयश मिळालं तर पुन्हा प्रयत्न करतो चोरीचा.  बऱ्याच चोऱ्या पचवतो. पण चोरी करणे पाप आहे ना.. मग भरतो एक दिवस पापाचा घडा. चोराचाही  संघर्ष चालू असतो, चोरीसाठी. पण तो चुकीचं काम करत असतो. आपल्याला संघर्ष चांगल्या कामासाठी करायचा आहे. संघर्ष यातच खरं यश दडलं आहे...

## कोंबडीचे अंडे

आधुनिक केसरी

बऱ्याच वर्षांच्या अनुभवावरून अकबरला हे माहिती होते की. बिरबलची मजाक करणे सोपी गोष्ट नाही. तरीसुध्दा अकबर स्वतःला थांबवू शकत नसे व कधीकधी बिरबलची मजाक करत असे.



एके दिवशी बिरबल दरबारात येण्यापूर्वी अकबरने दरबारातील सर्व दरबाऱ्यांना एक एक कोंबडीचे अंडे दिले व त्यांना बिरबला बरोबर करण्याच्या गंमती बद्दल योजन सांगितली. नेहमीप्रमाणे जेव्हा बिरबल दरबारात आला तेव्हा अकबर त्याला म्हणाला, 'काल रात्री मला एक स्वप्न पडले त्यात एका ऋषींनी मला सांगितले की, जे दरबारी बागेतील तलावात जातील व तलावातून आपल्या बरोबर हातात अंडे घेऊन येईल तेच माझ्यासाठी निष्ठावंत असतील. तरी आता सर्वांनी तलावात जाऊन त्यातून एक एक अंडे आणावे.' त्यानुसार, सर्व दरबाऱ्यामधून एक एक दरबारी तलावातील पाण्यात डुबकी मारून आपल्या बरोबर एक अंडे घेऊन बाहेर येत होते. शेवटी आता बिरबलचा नंबर होता. बिरबलने तलावात उडी मारली परंतु अंडे सापडण्यात तो अयशस्वी झाला. त्याला त्वरीत लक्षात आले की ही अकबरची माझ्यासोबत गंमत करण्याची योजना आहे.  बिरबल तलावाच्या बाहेर येताच कोंबडयाच्या आवाजात ओरडु लागला. कोंबडयाच्या त्या आवाजामुळे अकबर संतप्त झाला. तो बोलला, 'तू वेडा झाला आहेस का? तलावातून प्रत्येक जण आपल्या सोबत अंडे घेऊन आला परंतु तुझ्या हातात अंड नाही. असे का?' बिरबल बोलला 'महाराज! फक्त कोंबडयाच अंडे घालू शकतात. मी तर कोंबडा आहे.' अकबरने दरबाऱ्यांकडे बघितले व चोरून हसला. व दरबाऱ्यांनी गोंधळून आपले हात एकमेकांवर मारले.

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**निशायां शोभते चन्द्रो दर्शनं केशभालयोः |
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
१८ || रात्री गडद आकाशात चंद्र शोभून दिसतो, तसे तुझ्या काळ्या दाट केसांच्या खाली तुझे विशाल कपाळ शोभून दिसते आहे, अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**माया रहि नहिं रहत है,
यह महिमा गुरु ज्ञान ।
सुख व शान्ति से घर रहें, जन है परम सयान
।।१०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/१०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**


ते अंतरातून त्यागी असलेले गृहस्थ संत सद्गुरूंच्या ज्ञान प्रभावाने मायेत राहूनही मायेत रहात नाहीत. ते वैराग्ययुक्त जीवन व्यतीत करत, सुख शांतीने घरात राहून ब्रह्मविद्येची योग साधना करतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## विषयाकडचा ओढा भगवंताकडे लावावा

आधुनिक केसरी

प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात, त्यालाच परमार्थात श्रद्धा म्हणतात. उणीव हेच प्रपंचाचे रूप असल्यामुळे तो पूर्ण झाला असे कधीच होणार नाही. समाधान हा मात्र पूर्णत्वाचा स्वभाव आहे. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्विकता उत्पन्न होईल. आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे 'सर्वस्व' अर्पण करणे, याचेच नाव यज्ञ होय. त्याग आणि भगवंताचे स्मरण, हा यज्ञाचा खरा अर्थ होय. परमार्थ साधला की बुवाचा देह पुष्ट होतो. तो काय दुधाचा रतीब लावतो ? छे ; भगवंताच्या आनंदाने त्याचा देह भरलेला असतो ; परंतु साधकावस्थेमध्ये त्याचा देह कष्टामध्येच ठेवलेला असतो. खरे म्हणजे, परमार्थी माणसाने दैन्यवाणे राहायचे कारणच नाही. पैसा असेल तर त्याने रोज श्रीखंडपुरी खावी; पण उद्या जर उपास पडला, तर मात्र आजच्या पक्वान्नाची आठवण होता कामा नये. सर्वांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ सांगितला आहे.ज्याला हित करून घ्यायचे आहे,त्याला गृहस्थाश्रमासारखा आश्रम नाही. पण लग्न करून सर्व काळ विषयांत घालवू लागलो,आणि प्रपंचाची



कर्तव्ये करायची राहिली,तर मग लग्न करून काय साधले ? उद्योग करून पोट भरायचे हे खरे, पण नोकरी करून मालकाला सर्वस्व मानू लागलो आणि देवाला विसरलो, तर नाही उपयोग. देवाला स्मरून नोकरी करावी. गृहस्थाश्रमात देव भेटणार नाही असे म्हणेल, त्याचे खरे मानू नये. देव भेटेल याची खात्री बाळगावी. आपला भार सर्वस्वी भगवंतावर टाकावा. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले आहे त्या स्थितीत समाधान मानावे. अर्पणबुद्धीने सर्व कर्मे करावीत. ज्यात माझे मन मला खात नाही, ते काम चांगले असे समजावे. कोणत्याही मनुष्याला जोपर्यंत या प्रपंचामध्येच सर्व काही आहे असे वाटत असते, तोपर्यंत तो परमार्थापासून दूर असतो. वाईट लोक समाधानात दिसतात, पण खरे ते तसे नसतात. वाईट कृत्ये करणाराला कधी ना कधी तरी पश्चात्ताप झाल्यावाचून राहात नाही. एखादी बाई आपल्या सावत्र मुलाला ज्याप्रमाणे खायला प्यायला घालते, पण आतून तिचे त्याच्यावर प्रेम नसते, त्याप्रमाणे आपण परमार्थाला वागवतो. खरे म्हणजे आपले इथेच चुकते. आपला ओढा जो विषयाकडे आहे, तो भगवंताकडे लावला की परमार्थ साधला. ज्याने विषयातले सुख भगवंताकडे लावले, म्हणजे भगवंताच्या स्मरणात ज्याला सुखा-समाधानाचा लाभ झाला, त्याचे जन्माला येऊन खरे कल्याण झाले. **बोधवचन : प्रपंचात जी आपली चिकाटी आहे. तिच्या एकचतुर्थांश चिकाटी जरी भगवंतासाठी आपण धरली, तरी आपले काम भागेल.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आकाश स्वतः अगदी मुलायम आहे. तो मुलायम पणा म्हणजे पाणी होय. अज्ञानाने जो भास होतो तोच तेजाचा प्रकाश होय. अज्ञानाचा जो व्यवहार होतो तो सगळा आकाशात स्तब्ध होतो.  वायूंत व आकाशात भेद नाही, वायू देखील आकाशाइतकाच स्तब्ध आहे. पण आकाशामध्ये जो प्रतिकार व सुक्ष्म अटकाव अनुभवास येतो तोच वायु होय. वायू --- वायूचे कार्य कसे चालते.  ऊदा, बागेतील गुलाबाचे फुल वजनाने हलके तरी त्यास वजन असते.तसा वारा हलका असला तरी त्यास घनपणा असतो. कडकपणा असतो. म्हणून सोसाट्याच्या वारा आला तर झाडे उन्मळून पडतात, वजनकवाचून झाडमोडले असे कधीच होत नाही. वजनाला जडपणा असतो. हा वायूतील पृथ्वीचा अंश असतो. आपण आतापर्यंत पंचभूतांचे वर्णन समजावून घेतले आपल्याला लहानपणापासून हे पंच महाभूते माहिती होते पण त्याचा सुक्ष्म व खोलवर विचार कधीही केला नव्हता श्री समर्थांच्या दासबोध निरूपणाच्या रूपाने  खोलवर माहिती मिळाली . धन्यवाद. निराकार अवस्थेत झाडे असणे शक्य नाही पण समर्थ आपल्याला या बाबत विचार करायला लावतात. आपल्या विचारांना मार्गदर्शन करतात. कसे ते पहा. निराकार पंचमहाभूतांच्या मध्ये झाडे नाहीत हे खरे पण तिथे शक्ति होतीच आणि शक्तिला कठीण पणा असतोच. हा प्रुथ्वीचा गुण आहे. समजा विस्तवाची अगदी लहान ठिणगी आहे, तिच्यामध्ये तिच्याच मापाची उष्णता असतेच.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेत्रक्षेत् शिथिलबन्धनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यमेवं वदति पुस्तकम् ।।
स्पष्टीकरण - वर सांगितलेल्या गोष्टींमुळे पुस्तकाची खराबी होते. पुस्तकाच्या नाशाच्या आणखीही काही गोष्टी आहेत. माणसे पुस्तक वाचताना त्याच्यावर खाणा कुणा करतात. पानांच्या कडा तर दुमडतातच, शिवाय पुस्तक चक्क उलटे करतात. त्यावर आपले पसंती-नापसंतीचे शेरेही लिहितात. हे सारे असंस्कृतपणाचे लक्षण आहे. मुलांनो, तुम्ही असल्या गोष्टी करू नका, पुस्तकाची अशी वाट लावणे म्हणजे विद्येचा अपमान करण होय.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**

रविवार, ११ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 11 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-270 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5

# अखेर पवारांनी भाकरी फिरवलीच!

## सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेल पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा शनिवारी २५ वा वर्धापन दिन साजरा केला केला. या वर्धापन दिनानिमित्त नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोठी घोषणा केली. राष्ट्रवादीत कार्यकारी अध्यक्ष हे नवीन पद तयार करण्यात आले असून या पदावर खासदार सुप्रिया सुळे आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल या दोघांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती स्वत: पवार यांनी दिली आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाला आणखी बळकटी देण्यासाठी राष्ट्रवादीकडून हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

**लोकाग्रहास्तव निर्णय :** राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आपल्या निर्णयाबद्दल माहिती देताना सांगितले की, खासदार सुप्रिया सुळे यांच्या पक्षाची राष्ट्रीय पातळीवरची जबाबदारी सोपविण्यात यावी, अशी लोकांची मागणी होती . लोकाग्रहास्तव खासदार सुप्रिया सुळे यांची पक्षाच्या कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली . सुप्रिया सुळे यांची पक्षाच्या कार्याध्यक्षपदी नियुक्ती केल्यानंतर त्यांच्या खांद्यावर महाराष्ट्रासह, हरियाणा आणि पंजाब या राज्यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे . महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यांमध्ये पक्षाची ताकद वाढावी म्हणून हा बदल करण्यात आल्याचे पवार म्हणाले . लोकांना परिवर्तन हवं आहे, असेही ते म्हणाले . पक्षात एकाच वेळी दोन कार्याध्यक्ष का नेमले गेले, असा सवाल शरद पवार यांना पत्रकारांनी विचारला . या प्रश्नाचे उत्तर देताना पवार म्हणाले की, 'देशाचा मोठा विस्तार लक्षात घेऊन दोन कार्यकारी अध्यक्ष नेमले गेले आहेत . तसेच ही निवड करताना कुठला निकष लावला गेला असाही प्रश्न त्यांना विचारला गेला . त्यावर उत्तर देताना पवार म्हणाले की, अनेक लोकांची तशी मागणी होती म्हणूनच दोन कार्याध्यक्ष निवडले गेले . कार्यकारी अध्यक्षांचे पद किती काळासाठी असणार ? पदाची कालमर्यादा निश्चित केली आहे का ? या प्रश्नावर शरद पवार यांनी म्हटले की, यासाठी आधी पक्षाच्या घटनेत दुरुस्ती करावी लागेल . त्यासाठी पक्षाची बैठक बोलावून त्याबाबतचा बदल करण्यात येईल .पक्षात दोन कार्याध्यक्षपदे निर्माण केली जात असताना त्यांवर खासदार सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची नियुक्ती केली गेली . मात्र यात पक्षाचे अनुभवी नेते अजित पवार यांना स्थान देण्यात आले नाही, त्यांना बाजूला सारल्याने ते नाराज आहेत अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे . मात्र या चर्चेलाही शरद पवार यांनी पूर्णविराम दिला .

सुप्रिया सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाणा विधानसभेचीही जबाबदारी असेल. तसंच प्रफुल्ल पटेल यांच्यावर गुजरात, मध्य प्रदेश आणि गोव्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सुळे आणि पटेल यांच्यासह सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड यांनादेखील राष्ट्रीय राजकारणातील जबाबदारी पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याकडून देण्यात आली आहे.

शरद पवार यांनी 'लोक माझे सांगाती' या आपल्या राजकीय आत्मकथेच्या विस्तारित आवृत्तीच्या प्रकाशनावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरुन निवृत्त होण्याची घोषणा केली होती. मात्र नंतर राज्यभरातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेली नाराजी आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या समितीने फेटाळलेल्या राजीनाम्यानंतर पवार यांनी हा निर्णय मागे घेतला होता. तेव्हापासूनच राष्ट्रवादीच्या पक्षसंघटनेत काही प्रमाणात बदल केले जातील, अशी शक्यता वर्तवली जात होती. या शक्यतेवर आता अखेर शिक्कामोर्तब झालं असून शरद पवार यांनी पक्षात कार्यकारी अध्यक्ष हे नवे पद निर्माण केले आहे. दरम्यान, कार्यकारी अध्यक्षपदावर सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची नेमणूक करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांसह कार्यकर्त्यांनीही समाधान व्यक्त केलं आहे. यामध्ये ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री छगन भुजबळ, सुनिल तटकरे आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांचा सामावेश आहे.



# छत्रपती संभाजीनगरात पावसाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कित्येक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आज ( शनिवारी ) छत्रपती संभाजीनगरात सायं. 6 वाजता पावसाने धुवांधार बॅटिंग सुरु केली. दिवसभर कडक उन पडले होते. केरळमधे मान्सूनचे आगमन झालेले असले तरी महाराष्ट्रात मान्सून येण्यासाठी चार दिवस नक्कीच आहेत. शनिवारी छत्रपती संभाजी नगरात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मान्सून पूर्व पावसाने बळीराजा सुखावला आहे.

# औरंगजेबाचे स्टेटस ठेवणाऱ्या तरुणाला सोलापुरात अटक

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** कोल्हापूर, नगर, अकोला, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांमध्ये जातीय दंगली घडविण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातही जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून शांतता बिघडविण्याचे प्रयत्न होत आहेत. औरंगजेबाची छबीचे समाज माध्यमावर स्टेटस ठेवून आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारीत करण्याचा प्रकार घडला असून याप्रकरणी एका तरूणाला पोलिसांनी अटक केली आहे. दोन दिवसांपूर्वी एका महाविद्यालयीत तरूणाला लव्ह जिहादच्या संशयावरून एका टोळक्याने पळवून नेऊन हल्ला केला होता. त्यानंतर औरंगजेबाच्या छबीचे समाज माध्यमावर स्टेटस ठेवण्याचा प्रकार अक्कलकोट रस्त्यावरील गोदूताई परूळेकर विडी घरकुलात घडला आहे. याप्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. संबंधित तरूणाला अटक केली असता त्यास न्यायदंडाधिका-यांनी १२ तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनपल्ले यांनी ही माहिती दिली. सोलापूर शहरात मागील तीन महिन्यांपासून विविध सार्वजनिक उत्सवांच्या निमित्ताने हिंदू संघटनांकडून शक्तिप्रदर्शन होत आहे.चिथावणीखोर भाषणे केली जात आहेत. यातून तरूणींना दुस-या धर्माच्या तरूणांबरोबर फिरण्यास, बोलण्यास मनाई केली जात आहे. यात दुस-या धर्माच्या तरूणांना गाठून हल्ले करण्याचे प्रकार घडत आहेत. त्यातच गोदूताई परूळेकर विडी घरकूल परिसरात राहणा-या एका तारूणाने स्वतःच्या व्हाटस्अपच्या स्टेटसवर औरंगजेबाची छबी ठेवल्याचे उजेडात आले. अशा घटनांमुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखताना पोलीस प्रशासनावरील जबाबदारी वाढल्याचे दिसून येते.



# संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे पंढरपूरला प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** श्रीक्षेत्र आपेगांव येथील माऊलीच्या पालखीचे संत ज्ञानेश्वर मंदिरातुन शनिवार (ता:१०) रोजी सायंकाळी ५:३० वाजता प्रस्थान ठेवले. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या उपस्थितीत माजी सभापती विलासबापू भुमरे यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊली व त्यांच्या माता पित्यांच्या पादुकांचे पूजन करुन पालखीत माऊलींच्या पादुकांचे प्रस्थान करण्यात आले.

यावेळी सरपंच पांडुरंग औटे, प्रल्हाद औटे, भाऊसाहेब औटे,कातंराव औटे, रामकाका औटे, आन्नासाहेब औटे, ज्ञानेश औटे, ज्ञानेश्वर औटे, भागवत भारती, बालाजी नलभे, विनायक महाराज अष्टेकर, यांच्यासह वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर ज्ञानेश्वर माऊली व त्यांच्या माता पित्यांच्या पादुका मंदिरातुन अजानवृक्ष व पिंपळाच्या ओट्यावर सजवलेल्या पालखीत ठेवण्यात आल्या. त्यांनतर भाविकांनी दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी भाविकांनी ज्ञानोबा माऊलीचा जयघोष करुन परिसर दणाणुन सोडला. टाळ मृदगांच्या गजर व हरीनामाच्या जयघोषात मंदिरात प्रदक्षिणा करण्यात आली.

परंपरागत पध्दतीने पालखीचा पहिला मुक्काम माता पिता मुक्तमुदी मंदिरात करून टाळ, मृदंगाचा गजर आणि संत ज्ञानेश्वर माउलीचा जयघोष व असंख्य वारकरी, भाविकांच्या उपस्थितीमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने सोमवार ता . ११ जुन रोजी सकाळी ८ वाजता श्रीक्षेत्र आपेगांवहुन निघुन आगरनांदर हुन कुरणपिंप्री मार्गे पढरपुकडे मार्गस्थ होईल.

# दृष्टी नसतानाही अर्जुन साकारतोय विठुरायाची सुबक मूर्ती

## आयुष्यात सर्व हरलात तरी चालेल पण हिंमत हारु नका

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

धाराशिव : शंभरटक्के अंधत्व वाटयाला आले असतानाही जिल्ह्यातील वाशी तालुक्यामधील केळेवाडी या खेडेगावातील अर्जुन केळे या तरुणाने प्रचंड आत्मविश्वास व आपल्या जिद्दीच्या जोरावर डोळसांना सुद्धा लाजवेल असे यश एका आगळ्यावेगळ्या व्यवसायातून यश संपादन केले आहे. अर्जुन केळे यांचा जन्म वाशी तालुक्यातील केळेवाडी मध्ये झाला. आई-वडिलांना जरी दिसत असलं तरी त्यांच्या कुटुंबाला अंधत्वाचा शापच लागलेला आहे.त्यांचे दोन भाऊ व एक बहिण असं का भावंडांचं अंधत्व समोर नुसता डोंगर नाही तर अंधारा वाटेवरच उभा डोंगर असताना प्रवास तर करायचा तोही न थकता,न हरता अशी खुणगाट मनाशी बांधलेल्या अर्जुनाला काहीतरी वेगळं करण्याच्या जिद्दीचे विचार गप्प बसून देत नव्हते. अर्जुन यांनी बारावीनंतर डीएड पूर्ण केले. शंभर टक्के अंधत्वामुळे या कलियुगी जीवनात आयुष्य जगत असताना स्वतः खचून न जाता, परमेश्वरान दिलेल्या अंध आयुष्य सोबत घेऊन समाजात बेरोजगारांना व्यवसाय उपलब्ध करून देण्याचा मानस उराशी बाळगून, हा कलयुगातील अर्जुनाने पूर्णतः डोळ्यांनी दिसणाऱ्या बेरोजगार तरुणासाठी प्रकाशमय स्वप्न पाहू लागला. विचार करू लागला की, असं कोणतं कार्य आपणं करु शकतो,ज्याने समाजाला प्रेरणा मिळेल. महाभारतात नात्याच्या चक्रव्यूहात अडकलेला अर्जुनाला श्रीकृष्णांनी भगवद्गीता सांगत महाभारताच्या युद्धात मोलाची साथ दिली. त्याचप्रमाणे विचारांच्या गर्दीत अडकलेल्या या कलियुगातील अंधअर्जुनाला देवी देवतांच्या मूर्ती बनवायची कल्पना त्याचा कृष्ण रुपी मित्र उत्तरेश्वर कांबळे यांनी दीली. त्या मित्रांनी नुसती कल्पना



दिली नाही तर संपूर्ण व्यवसाय उभा करून देत अर्जुन केळेला मोलाची साथ मिळाली. याच मित्राच्या साथीच्या जोरावर अर्जुन केळे यांचा मूर्ती बनवण्याचा व्यवसाय चांगला सुरळीत चालू आहे. आज या दृष्टी नसलेल्या अर्जुनाने वाशी तालुक्यातील केळेवाडी गावा त देवी देवतांच्या वेगवेगळ्या रूपातील मूर्ती बनवण्याचा कारखाना सुरू केला आहे. या मूर्ती बनविण्याच्या कारखान्यामुळे केळेवाडी गावातील दहा ते पंधरा तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

खाली पाण्यात पाहून माशाचा बरोबरच डोळा उडवणारा महाभारतातील अर्जुन, महाराष्ट्राचे मायबाप विठ्ठल रुक्माई ची अतिशय सुंदर,मनमोहक, दिव्य अशी मूर्ती साकारणारा हा कलियुगातील दृष्टीहीन अर्जुन आजच्या तरुणांसाठी एक आदर्शच आहे. दृष्टी नसताना सुद्धा हा अर्जुन अगदी व्यवस्थित पैसे मोजणे, कुणाचाही आधार न घेता मोबाईलवर व्यापाऱ्याला फोन लावणे, आपण नंबर सांगितला सेव्ह करणे, मूर्ती बनवणे, नुसता मूर्तीला स्पर्श करून ती मूर्ती व्यवस्थित झाली का नाही हे अजून सहज ओळखतो. कारखान्यामध्ये कच्चा मालापासून तयार केलेल्या विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्ती नंतर कामगारांकडून रंगरंगोटी करून तयार झालेल्या विठू रुक्माई चे सुंदर अशा मूर्ती व्यापाऱ्यांच्या ऑर्डर नुसार तुळजापूर,कोल्हापूर,पुणे,सांगोला जालना या ठिकाणी पाठवल्या जातात. मूर्ती बनविण्याच्या व्यवसायामधून महिन्याकाठी दोन ते तीन लाख रुपयांची उलाढाल असे अर्जुन केळे यांच्याकडून सांगण्यात आले. भारत देशातील वाढत्या लोकसंख्येत वाढत्या बेरोजगारी मध्ये तरुणांनी नोकरीची वाट पाहत वय वाढवण्यापेक्षा स्वतःच्या आवडीच्या व्यवसायाला पसंती देत व्यवसाय वृद्धीलाच प्राधान्य द्यावे. असेच मत अर्जुन केळे यांनी व्यक्त केले.


# सामान्य माणूस आणि शिक्षण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शिक्षणातून समाज बदल व्हावा आणि समाज बदलाचे आव्हान शिक्षणाने पेलले पाहिजे या दुहेरी भूमिकेतून ही प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था खूप चांगली होती म्हणून ती आज आणता येणार नाही किंवा सर्वांनाच पराभूत मानसिकतेचे बनविण्यासाठी मेकॉले प्रणित शिक्षण व्यवस्था आज तंतोतंत लागू करता येणार नाही. ज्यात भारतीयत्वाचे उद्याचे स्वप्न दडलेले आहे आणि जे सामान्य माणसाला उन्नतीकडे घेऊन जाईल अशी शिक्षण व्यवस्था भारताला अपेक्षित आहे. नवीन शैक्षणिक धोरण आणि दीर्घकालीन परिणाम या संदर्भात विचार होणे अपेक्षित आहे.**



## क्षितिजापल्याड

भारताला काहीएक शैक्षणिक धोरण असावे या विचारातून १९६८ ला पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. दुसरे धोरण १९८६ साली आले आणि त्यात १९९२ साली सुधारणा करण्यात आली. तेव्हापासून ते आजपर्यंत त्याबरहुकूम आपली शैक्षणिक वाटचाल सुरु होती. दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. समाज पूर्वीपेक्षा जरा जास्तच गतिशील झाला आणि ही आव्हाने पेलण्यासाठी आणि कालसुसंगत शिक्षण मिळाले पाहिजे यातून नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणण्यात आले. यात काय आहे, काय नाही याविषयी सर्वांनाच बऱ्यापैकी माहीत झालेले आहे. त्याविषयी चर्चा करून जागा व्यापण्यात काही हशील नाही. नवीन शैक्षणिक धोरण आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम या अनुषंगाने विचार करणे गरजेचे वाटते. हे धोरण लागू करण्यासाठी सर्वत्र युद्ध पातळीवर काम सुरू आहे. काही विद्यापीठे यात अग्रेसर तर काही अजून काम चालूच आहे या प्रकारातली. परंतु जे चालू आहे ते नेमके काय हे मात्र माहीत नाही. समाज विकासाच्या प्रक्रियेत तीन घटक महत्त्वाचे असतात. चौथा आपण निर्माण करतो. या घटकांना मुक्त स्वातंत्र्य दिले तर त्याचे वर्ग होतात आणि बंदिस्त केले तर वर्णात रूपांतर होते. हे सूत्र लक्षात घेऊन हा भाग आपणांस समजून घ्यायचा आहे. प्रस्तुत धोरणात विद्यार्थी एक मुख्य विषय घेऊन इतर कोणत्याही शाखेचे विषय घेऊ शकतो किंवा व्यावसायिक शिक्षण घेऊ शकतो. भारत हा गरिबांचा श्रीमंत देश असल्यामुळे इथला विद्यार्थी थोडेफार शिकून रोजगार कसा मिळणार याच शोधात असतो. त्याला एक धोरणात्मक रूप देऊन अशा विद्यार्थ्यांना एकाअर्थी मदतच झाली आहे. पदवीच्या पहिल्या वर्षी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दुसऱ्या वर्षी पदविका, तिसऱ्या वर्षी पदवी आणि चौथे वर्ष स्नातक अशी ही रचना. आज शिक्षणाप्रति विद्यार्थी किती उत्सुक आहेत, हे आपण सर्वत्र पाहतो आहोत. ही मुले शिक्षण पूर्ण करण्यापेक्षा थोड्याफार शिक्षणाच्या आधारे काही रोजगार मिळवू इच्छितात. यात एक व्यक्ती म्हणून काहीच गैर असण्याचे कारण नाही. पण दीर्घकालीन समाजहिताच्यादृष्टीने हे हितकारक नाही. कारण या प्रक्रियेतून निपजलेली मुले किंवा नागरिक फक्त वाहक बनू शकतात, निर्माते नाही. कोणताही प्रगतिशील समाज त्रिस्तरीय रचनेतून प्रगती करत असतो. यातील पहिला स्तर साहजिकच निर्मात्यांचा असतो. कोणतीही निर्मिती अथक परिश्रम, ध्यास, अभ्यास, प्रामाणिकता आणि उदात्त ध्येय याशिवाय शक्य नाही. निर्मितीप्रक्रियेनंतर तुम्ही खुशाल बसून खा. मात्र निर्मिती प्रक्रियेत आळस किंवा ताबडतोबीचे धोरण चालणारे नसते. यासाठी सातत्यपूर्ण दीर्घ प्रदीर्घ प्रक्रियेची गरज असते. तुमची परिस्थिती कशी आहे हे ज्ञेय वस्तूला काही कर्तव्य नसते. ध्येय तुमचा त्याग मागते. बहुजनातील गरीब घरातील असे किती विद्यार्थी या ज्ञान निर्मिती प्रक्रियेत येतील हा प्रश्नच आहे. समाजाची भविष्यकालीन गती, प्रगती आणि परिस्थिती कशी असावी याची रूपरेषा तयार करण्याचे काम या वर्गाचे असते. आपल्या शिक्षण व्यवस्थेतून या प्रक्रियेत आपणहून किती विद्यार्थी सामील होतील हा प्रश्नच आहे. हा ज्ञानवृंदाचा संघ देश घडवत असतो. देशाचे अर्थकारण, राजकारण किंवा एकूण परिस्थितीवर या गटाचे प्राबल्य असणार हे नैसर्गिक आहे. तुम्ही कितीही जिंदाबाद मुर्दाबाद करत राहिलात तर काहीच अर्थ उरणार नाही. दुसरा गट किंवा वर्ग असतो ते ही ज्ञान प्रक्रिया समजून घेऊन इतरांना समजून संगणाऱ्यांचा. किंवा सिध्दांतनांच्या वाहकांचा. आजचा मध्यमवर्गीय समाज हा याचे



उत्तम उदाहरण म्हणून आपणास पाहता येईल. शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील किंवा तत्सम लोक यात येतात. ही मंडळी व्यवस्थेचा लाभ घेण्यात अग्रेसर असणार यात काही शंका नाही. कारण व्यवस्था चालवणे आणि ती परीदृढ करणे ही जबाबदारी या मंडळींवर असते. त्यामुळे सामान्य माणसाचे काय आणि किती नुकसान होत आहे की फायदा याच्याशी या वर्गाचे काही कर्तव्य नसते. आपले नेमून दिलेले काम निमूटपणे करणे आणि त्या बदल्यात सुविधा मिळवणे यातच त्यांचे सौख्य सामावलेले असते. प्रयत्न केला तर हा वर्ग निर्मिती प्रक्रियेत येऊ शकतो, परंतु जे चालले आहे ते चांगले आहे या मनोवृत्तीतून हा आळसाचा धनी बनल्यामुळे त्याची पुढची ज्ञानात्मक प्रगती खुंटते हे नक्की. शेवटी जो वर्ग उरतो तो संख्येने मोठा आणि पोटार्थी स्वरूपाचा असतो. रोजच्या जगण्या मरणाचे प्रश्न घेऊन हा काबाडकष्ट करत असतो. धोरण म्हणजे काय आणि राज्य काय असते यापेक्षा त्याला आपले पोट भरणे आणि आपल्या मुलाबाळांचे संगोपन महत्त्वाचे असते. परिस्थितीमुळे मनात असूनही तो आपल्या पाल्याना चांगले आयुष्य प्रदान करु शकत नाही, ही त्याची मर्यादा असते. नव्या शैक्षणिक धोरणातून या पोटार्थी सामान्य माणसाचा पाल्य निर्मिती प्रक्रियेत, धोरणात्मक प्रक्रियेत येईल का, हे येणारा काळच ठरवेल. शिक्षण व्यवस्थेत काळानुसार बदल होणे साहजिक आहे. त्यावर सकारात्मक नकारात्मक चर्चा झाली पाहिजे. कारण शैक्षणिक धोरणांनंतर जे विविध आयोग गठीत होतात आणि साधक बाधक चर्चा होते, हे त्याचेच प्रतीक असते. काही आयोगाच्या शिफारशी सामान्य माणसापर्यंत वाचायला मिळतात तर काही फक्त शासनस्तरावर कार्यवाही करण्यासाठी असतात. काही असले तरी जागतिक स्पर्धेत स्वतःला सिद्ध करण्यासाठी सामान्य विद्यार्थ्यांनी आत्तापासूनच कंबर कसली पाहिजे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# पु. ल. व सौ. सुनीताबाई देशपांडे यांचे लग्नबंधन



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**पु.ल. हे जीवनातील सदा आनंद, हास्य देऊ करणारा झरा. हे आपण मोठ्या अभिमानाने म्हणतो. पु.ल जितके सुंदर लिहायचे, तेवढ्यात ताकदीच सुनीताबाई लिहायच्या, किंबहुना त्यांचे विचार म्हणजे सुंदर समीक्षा जणू प्रत्येक गोष्टीचा दोन पैलूतून विचार करणाऱ्या त्या फारच समजदार अशा होत्या. पु.लना ज्यांनी जीवनभर साथ दिली. त्यांना प्रत्येक पडत्या काळात साथ दिली. पु.लच्या बालमनाला जपलं. सुनीताबाई अर्थात पु.लच्या आर्धांगिनी पु.ल आणि सुनीताबाई यांना एकत्र पाहणे म्हणजे निखळ आनंद. आज त्यांचा लग्न वाढदिवस. आज त्यांच्या लग्नाला सत्त्यांतर वर्ष पूर्ण झाली, पण आजही त्यांच्याकडे पाहताना असे वाटते की अगदी काल परवाची भेट आहे असं वाटतं आजही ते आपल्यासोबतच आहे.**

माझ्या आयुष्यावर या दोन व्यक्तीचा प्रभाव आहे. माझ्यातलं जे जे चांगलं आहे ते या दोघांमुळेच असे मी समजते. पु.ल आणि सुनिताबाईची ओळख ही 'ओरियंट हायस्कूल' नावाची एक शाळा त्या काळात जुवळे आडनावाचे शिक्षणप्रेमी गृहस्थ मुंबईच्या दादर-माटुंगा विभागात चालवत होते. या ना त्या कारणाने इतर ठिकाणी प्रवेश न मिळू शकलेले विद्यार्थी यांना तेथे प्रवेश मिळू शकेल. आणि नोकरीच्या शोधात असलेल्या शिक्षकांना त्या नोकरीचा आधार होईल. त्या काळात पु.लनी तेथे प्रवेश केला आणि काही काळाने सुनीताबाईनी ही. पु.ल वरच्या वर्गाला शिकवायचे. आणि सुनीताबाई खालच्या वर्गाला शिकवायच्या. (तिथेच पु.लच्या वर्गात बाळ ठाकरे हे त्यांचे विद्यार्थी होते आणि सुनीताबाई यांच्या वर्गात राज ठाकरे यांचे वडील श्रीकांत ठाकरे होते.) शिक्षक म्हणून काम करत असताना भाई आणि सुनीताबाईची ओळख झाली. भाईंना त्या मुळात इतक्या आवडत्या होत्या की लग्न करून त्यांच्यासोबत एकत्र रहावे असे त्यांना वाटले. भाई म्हणाले, "साधी पांढरी साडी नेसलेली, पाठीवर मोठी वेणी टाकलेली, एकही दागिना न घातलेली ही मुलगी किती सुंदर दिसत होती. दागिण्याविनही तिचं सौदंर्य मोत्यासम चमचमत होतं." दोघे एकमेकांच्या प्रेमात पडताचं "आपण लग्न करू या" असा भाईचा आग्रह सुरू झाला. पण सुनीताबाईंना लग्न हे कृत्रिम बंधन वाटे. समजा, उद्या आपलं पटेनासं झालं, तर लग्नात 'शुभमंगल सावधान' म्हणणारा तो भटजी, किंवा नोंदणी-पद्धतीने लग्न केलं असेल तर ते रजिस्टर करणारा तो कायदेतज्ज्ञ, हे आपली भांडणं मिटवायला येणार आहेत का? असं त्या म्हणायच्या हे विचार त्या मनात लग्नापूर्वी नक्कीच थैमान घालत होते. त्यांचं ताठ मत त्यावेळी तरी वाकायला तयार नव्हतं, आणि भाईचा आग्रह हा चालूच राहिला होता. पण शेवटी आढेवेढे घेऊन पु.ल म्हणाले, "माझ्यासाठी तू इतकचं कर, लग्नविधीला फक्त 'हो' म्हण, मग तू म्हणशील तशा लग्नाला माझी तयारी आहे," या आग्रहाला त्यांनी मान्यात दिली खरी! खरंतर सुनीताबाईच्या आधी पु.लचं लग्न झालं होतं. या गुणी मुलाल आपली लाडाची लेक देऊन मोठ्या थाटामाटात कर्जतच्या दिवाडकर लोकांनी त्यांना जावई करून घेतले होते. पण लग्नांनंतर पंधरा दिवसातच त्यांच्या पत्नी तापाने आजारी झाल्या आणि खूप डॉक्टरी उपचारांचाही उपयोग न होऊन त्या बिचाऱ्या मरण पावल्या. सुनीताबाईच्या आईने त्यांच्यासाठी काही स्थळं हेरून ठेवली होती. एक तर त्यांना ह्या बिजवराशी मुलीनी लग्न करणं पसंत नव्हतं. शिवाय परजातीतला जवई हे ही खटकत होतं.

शाळेला उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली आणि सुनीताबाई आपल्या गावी रत्नागिरीला आल्या. "भाईने, टपाल घेऊन येणाऱ्या बसने यावे, ती गाडी आधी पोस्टात येते तिथे टपालाच्या थैला टाकून मग गावात गाडीतळावर जाते, पोस्टाच्या कंपाऊंडलाच लागून आमचा वाडा आहे. मी त्याला उतरून घेऊन आमच्या घरी आणीन असे त्यांनी भाईला सांगितले होते." मुळात येथे मुलं एकटेच न जाता त्यांचा भाऊ उमाकांत आणि जुळे सरांचा हारकाम्या बाळू तेंडुलकर यांच्यासह ते आले. पुढे सुनिताबाईंनी आप्पा- आईंशी त्यांची ओळख करून दिली. त्यांनी उभयतांना वाकून नमस्कार केले आणि पुढल्या दहा-पंधरा मिनिटातच भाईंनी सर्वांना हसवून आपलेसे करून घेतले. 'हसवण्याचा माझा धंदा आहे' या नावे पुढच्या काळात भाई रंगभूमीवर एक कार्यक्रम करत असे, सुनीताबाई म्हणे, " माझा अनुभव मात्र सांगतो हसवण हा त्यांचा धंदा नव्हता त्यांचा तो धर्मच होता." पुढल्या चार-पाच दिवसातच लग्न रजिस्टर करायचं होतं. त्यावेळी भरायचा फॉर्म त्याकाळी आठ आण्याला मिळेल तेवढाही खर्च इतर कुणावरही पडू नये म्हणून तो फॉर्म विकत आणून वाचून ठेवला आणि आप्पानाही त्यांनी दाखवला होता. सुनीताबाईंचे आप्पा म्हणजे त्यांचे वडील हे स्वतः रत्नागिरीतले नामवंत वकील तर होतेच पण एक संत प्रवृत्तीचे माणूस देखील होते तसा त्यांचा लौकिकही होता. गावात पु.ल रत्नागिरीला आल्यावर दोन-तीन दिवसातच लग्न रजिस्टर करून टाकावे असे सुनीताबाईच्या आई-बाबांना मनातून



वाटत होते. त्याचप्रमाणे आप्पांनी कोर्टातून परतताना आपल्या वकील स्नेह्यांना "मुलीचे लग्न रजिस्टर करायचा आहे, साक्षीदार म्हणून सह्या करायला तुम्ही केव्हा येऊ शकाल?" असे विचारले आणि 'फॉर्म' वगैरे सर्व तयार आहे वगैरेही सांगितले त्यावर, मग आत्ताच जाऊया की म्हणून ते आप्पांबरोबरच निघाले. रत्नागिरीचे मुख्य पोस्ट ऑफिस त्यांच्या शेजारच्या कंपाउंड मध्येच होते तसेच घरासमोर जिल्हा न्यायालय होते. दुपारी सुनीताबाईंचे वडील आप्पा घरी परतत तेव्हा दुपारचा चहा होत असेल त्या सुमाराला त्यांच्या वाड्याच्या फाटकाची खिटी वाजली आणि आप्पा आले असे त्या खुशाल मानत असे सुनिता बाईंच्या आईने चहाला आधण ठेवले होते. खिटी वाजली म्हणून त्यांनी सहज तिकडे पाहिले तर, आप्पांच्या सोबत आणखी तीन-चार जण येताना दिसले त्यांनी आईला ते सांगताच तिने आधानात आणखी चार-पाच कप पाणी वाढवले हे लोक साक्षीदार म्हणून सह्या करायला आले आहेत आणि पुढच्या दहा पंधरा मिनिटातच पु.ल आणि सुनीताबाई यांचे लग्न होणार आहे. याची घरच्या आणि त्यांना कुणालाच पूर्वकल्पना नव्हती. उन्हाळ्याचे दिवस.

वधू घरच्या साध्या खादीच्या सुती साडीत होती आणि नवरदेव घरी धुतलेल्या पायजमा वर साधा बिन बाह्याचा बनियन घालून, चहाची वाट पाहत, गप्पा मारत उर्फ सर्वांना हसवत बसलेले. आप्पांनी आल्या आल्या सुनीताबाईंना हाक मारली जावयाशी त्या लोकांची ओळख करून दिली आणि त्या फॉर्मवर या नव- उभयतांना त्या साक्षीदारांसमोर सह्या करायला सांगितले आणि त्यांच्या साक्षीदारांच्या ही सह्या झाल्या आणि एवढ्यातच लग्न समारंभ संपला नेहमीच्या दुपारच्या चहाबरोबरच लग्नही झाले हे तेव्हा कोणाच्या लक्षातही आले नाही, की आपण केवळ त्या छापील फॉर्मवर सह्या करून कु. सुनीता ठाकूर ह्यांचे सौ सुनीता देशपांडे करण्याचे काम फक्त आठ आण्यात आणि दोन चार मिनिटात उरकले एका योगायोगाने ती दोघं १२ जून १९४६ ला लग्न बंधनात अडकले. आठ आण्यांत आणि दोन तीन मिनिटात जोडलेलं ते लग्न बंधन वयाचे चोपन्न वर्ष एकत्र बांधून आणि आयुष्य रंगीबिरंगी आणि संपन्न करून गेलं. आजही हे आठ आण्यांतील लग्न श्री व सौ. देशपांडे यांना आपल्यासोबत बांधून गेलं. पु.ल आणि सुनिताबाई हे दोघही माझ्या आयुष्यातली आनंद कस्तुरी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# श्री क्षेत्र देवगिरी ते आळंदीमार्गे पंढरपूरला पायी दिंडी रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** ब्राहालिन श्री पपूज्य जगन्नाथ महाराज पवार यांच्या संकल्पनेतून २००६ झाली श्री क्षेत्र देवगिरी ते आळंदी -पंढरपूर पायी दिंडी सोहळा सुरु करण्यात आला होता. ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे यांच्या नेतृत्वाखाली पालखी सोहळा दि १० जून शनिवारी सकाळी अनेक वारकरी च्या उपस्थितीत आळंदी कडे प्रस्थान झाली. यावेळी देवगिरी चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष आपासाहेब गावंडे, कमलाकर पेरे, ह.भ.प. सुरेंद्र महाराज आनंदें, रामदास इंगळे, रावसाहेब काजूने, नारायण महाराज कोरडे,डॉ. कैलास निकम, ज्ञानेश्वर गवळी, भुषण करपे, आबा लकडे, मुकुंद महाराज. गवळी मामा व ग्रामस्थ उपस्थित होते. 25 जून रोजी दिंडी पंढरपूर येथे पोहोचल. 30 जूनला काल्याचे कीर्तन होऊन पंढरपूर येथून दिंडी देवगिरी. देवगिरीकडे प्रस्तान करणार असल्याचे माहिती ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे यांनी सांगितले.

# खामगावच्या तरुणाचे मॉरीशसमध्ये अपघाती निधन

आधुनिक केसरी न्यूज





**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव येथील श्री गोरक्ष शैक्षणिक बहुउद्देशीय संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष ऋषिकेश मोहन पाटील सोनवणे यांचं मॉरीशीस मध्ये अपघाती निधन झाले. ऋषिकेश मोहन सोनवणे यांचा लग्न २४ एप्रिल २०२३ रोजी मोठ्या थाटात व मोठ्या उत्साहात छत्रपती संभाजीनगर मध्ये लग्न पार पडले. लग्नाच्या सव्वा महिना उलटण्या आधी अपघाती निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. १ जुन रोजी ऋषिकेश व पत्नी फिरण्यासाठी गेले होते. मंगळवार ६ जून रोजी दुपारी, एका ५४ वर्षीय मॉरिशियन ड्रायव्हरसह दोघे पती पत्नी भाड्याने घेतलेल्या कारचा कम्युनिटी सेंटरजवळील पेटीट रेट्रेटमध्ये अपघात झाला. कारचा चालक रवी सुब्रोन (५४) रुषिकेश मोहन सोनवणे ( २५ ) हे दोघेही जागीच ठार झाले. मागील सीटवर असलेल्या पत्नी सायली पांडुरंग शिंदे ( २६ ) या गंभीर जखमी झाल्या त्याना स्थाकांनी उपचारासाठी फ्लाक येथील डॉ ब्रुनो चेओंग रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरानी दोघाना मृत्यू घोषीत केले. ऋषिकेश सोनवणे हे श्री गोरक्ष शैक्षणिक तसेच आयुर्वेदिक डी. फॉर्म नर्सिंग कॉलेज, मेडिकल कॉलेजसह हॉस्पिटल या सर्व संस्थेचे कमी वयात भरारी घेणारे कार्यकारी अध्यक्ष होते. तसेच त्यांची मालकीची शेंद्रा एमआयडीसी छत्रपती संभाजी नगर मध्ये आलोक इंजीनियरिंग या कंपनीचे काम बघत होती. ऋषिकेश यांची पत्नी आमठाणा तालुका सिल्लोड येथील आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहतात. दि 9 शुक्रवार रोजी श्री गोरक्ष आयुर्वेदीक हॉस्पीटल कॉलेज व रिसर्च सेंटर खामगाव येथे सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या जाण्याने संपूर्ण फुलंब्री तालुक्यासह गावांमध्ये सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी भाऊ भाऊजयी बहीण असा मोठा परिवार आहे.

# गोंदेगावात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहिमेचा झपाटा सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील गोंदे गावात यंदा खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने बाजारात बियाणे व खताची निकृष्ट दर्जा राहू नये शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे व रासायनिक खत मिळावी यासाठी सुभाष आढाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी आर.जी. गुंडिले यांनी पुढाकार घेऊन कृषी विभागाच्या भरारी पथकाने अचानक दि.१०/६/२०२३ शनिवार रोजी सोयगावात कृषी सेवा केंद्र दुकान जाऊन तपासणीची मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये कृषी सेवा केंद्र दुकानाची वेगवेगळ्या पद्धतीने कसून एक्स पायर झालेल्या खत,व बियाणे याची तपासणी करु लागले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यावर्षी उच्च दर्जाचे बियाणे व रासायनिक खते मिळणार असल्याचा विश्वास यावेळी सुभाष आघाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी आर.जी. गुंडिले यांनी व्यक्त केला.सोयगाव तालुक्यात सुमारे ८३ गावे असून ४२ हजार हेक्टर क्षेत्र खरीप लागवड योग्य आहे. परंतु बाजारात उपलब्ध असलेले बियाणे चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांनी लागवड केल्यास संपूर्ण वर्ष शेतकल्याचे वाया जाऊ शकते. यासाठी सोयगाव कृषी विभाग सतर्क झाला असून सोयगाव तालुक्यातही कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.कृषी अधिकारी थेट गोंदे गावात कृषी सेवा केंद्राच्या दुकानात जाऊन विविध प्रकारची तपासणी केली जात आहे.यात सोयगाव कृषी विभागाने वेगवेगळे पथक तैनात केले आहे.या पथकांने कृषी सेवा केंद्रावर जाऊन बियाणे व रासायनिक खताची मात्रा तपासून लागले आहे. खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने तसेच खतांचे लिंक अप किंवा चढ्या दराने विक्री केल्यास कठोर कारवाई

**तालुक्यात कोणत्याही कृषी सेवा केंद्राची गैय केली जाणार नाही :** सोयगाव तालुक्यात कृषी सेवा केंद्र चालकांचा समाधान कारक खुलासा नसल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल . केंद्र चालकांना स्टॉक रजिस्टर अपडेट करणे, ठळक अक्षरात रेट फलकावर बियाण्यांच्या लिस्ट लावणे,खरेदीचे पक्के बिल शेतकऱ्यांना देणे व एम आर आर पी पेक्षा जादा दराने करु नये .नाहीतर आजूक पुढील कारवाई आजूक कडक केली जाणार असल्याचे सुभाष आघाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी आर .जी .गुंडिले यांनी बोलताना सांगितले सदर तपासणी पथकात एम .पी .सौदणे कृषी अधिकारी, एस .आर .चौधरी कृषी पर्यवेक्षक, मानसिंग राजपूत कृषी सहाय्यक,प्रदिप पाटील कृषी पर्यवेक्षक, कैलास कुमावत कृषी सहाय्यक, मयूर पाटील कृषी सहाय्यक, मयूर बारी तंत्र सहाय्यक या पथकांचा समावेश आहे .




महाराष्ट्र Business Katta













# कोकणातील भावलेला साहित्यिक- जेडी




आशिष निनगुरकर
संपर्क क्र. ९०२२८७९९०४

आधुनिक केसरी

**एक पुस्तक प्रकाशित करायचे म्हणजे, त्याचे टंकलेखन, प्रूफ तपासणी, ले आऊट , मुखपृष्ठ, प्रस्तावना, मलपृष्ठ, छपाई, वितरण, कुरीयर व पार्सल आदी कामे म्हणजे कमालीची पळापळ आणि वेळेचे नियोजन लागते. हे सर्व उत्तमरीत्या करणे खूप कठीण काम आहे. मात्र १२ मे ते २४ मे या तेरा दिवसात लेखक जे डी पराडकर यांची तीन पुस्तके 'चपराक प्रकाशन' यांनी प्रकाशित करून ही सर्व भट्टी जमवून आणली.अशा विक्रम पुस्तकांचे लेखक जेडी म्हणजे अर्थातच जे डी पराडकर.त्यांच्या लेखनाचा घेतलेला हा मागोवा.....**

'कोकणची माणसं साधी भोळी,हृदयात त्यांच्या गोड शहाळी' असं मी लहानपणासून ऐकतोय.पण याचा प्रत्यय मला दीड महिन्यांपूर्वी साधारण २२ एप्रिल रोजी आला. मी माझ्या नव्या पुस्तकाच्या कामानिमित्त 'चपराक' प्रकाशनाच्या कार्यालयात संपादक घनश्याम पाटील यांची भेट घेण्यासाठी गेलो होतो.तेव्हा तिथे मला कोकण परिसरातील आपल्या लेखनाने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्व भेटले.खरंतर याअगोदर मी त्यांचे 'साद निसर्गाची' हे पुस्तक वाचले होते व त्यावर समीक्षण देखील लिहिले होते.पण प्रत्यक्ष भेट झाली नव्हती.२२ एप्रिल रोजी हा योगायोग संपादक व प्रकाशक घनश्याम पाटील यांनी जुळवून आणला. पण ही काही ठरवून भेट झालेली नव्हती.हात जरी आभाळाला टेकलेले असले, तरी पाय जमिनीवर असलेले व मातीशी इमान राखणारे असे हे व्यक्तिमत्व मला पहिल्याच भेटीत भावले.
कोकणच्या मातीतील या साहित्यिक मला भावलेल्या या साहित्यिक हिऱ्याचं नाव म्हणजेच जे. डी. पराडकर. लेखक जे. डी. पराडकर यांना लोक प्रेमाने 'जेडी' म्हणतात.जेडी हे एक वेगळंच रसायन आहे.'साधी राहणी पण उच्च विचारसरणी' हे ब्रीद त्यांच्याबाबतीत चपखल लागू पडते.साधारण नऊ महिन्यांपूर्वी जेडींचं 'साद निसर्गाची' हे अप्रतिम पुस्तक 'चपराक'ने प्रकाशित केलं होतं. त्या पुस्तकाला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. अनेकांनी या पुस्तकाची विशेष नोंद घेतली होती. २२ एप्रिलला 'चपराक'च्या कार्यालयात जेडी त्यांच्या मित्रांसोबत आले होते. तेव्हाच त्यांच्या दोन पुस्तकांचे नियोजन झाले होते, पण मे महिन्यात लागोपाठ त्यांची तीन पुस्तके प्रकाशित झाली.हे एक आगळेवेगळे रेकॉर्डच म्हणावे लागेल. मजकूर न पाहता प्रकाशक घनश्याम पाटील कुणाला प्रकाशनासाठी सहसा होकार देत नाही. पराडकरांचं लेखन ते नियमित वाचत असल्यानं त्यांनी पराडकर यांना सांगितलं, ''संहिता द्या, महिनाभराच्या आत दोन्ही पुस्तकं प्रकाशित करू! त्यातही 'बारा सोनेरी पानं' हे पुस्तक तर वाचनाबरोबरच ऐकण्यासही उपलब्ध करून देणार! मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि समीक्षेच्या प्रांतात तंत्रज्ञानाच्या मदतीनं आपल्याला असे काही नवे प्रयोग करावे लागतील.'' पाटील सर यांनी दिलेला शब्द म्हणजे प्रमाण असतो.अगदी ठरल्याप्रमाणे जेडी सरांनी
दुसऱ्या दिवशी पाटील यांना मेल केला. 'कसबा डायरी' आणि 'बारा सोनेरी पानं' या पुस्तकांची संहिता त्यांनी पाठवली. 'सोनेरी पानां'नी प्रकाशकांना भुरळ घातली. तेव्हा संहितेत पाहिल्याप्रमाणे पाटील यांनी जेडी यांना सांगितलं, ''पुस्तकाच्या दृष्टीनं ही 'बारा' पानं पुरेशी नाहीत. आणखी मजकूर द्या!'' मग जेडी यांनी तात्काळ आणखी बारा लेख पाठवले. या चोवीस लेखांचं 'बारा सोनेरी पानं आणि डोंगरावरच्या कथा' हे पुस्तक चपराकने प्रकाशित करायचं ठरवलं. या चोवीस व्यक्तिरेखांचं अल्पावधीत दमदार अभिवाचन देखील करून घेतलं. त्याचे व्हिडिओ करून ते यू ट्यूबवर अपलोड करणं आणि क्यू आर कोड वेळेत उपलब्ध करून देणं हे महत्त्वाचं काम घनश्याम पाटील यांच्या पत्नी ज्योती यांनी केलं. या पुस्तकाला प्रस्तावनाही पाटील यांनीच लिहिली आहे. या बरोबरीनंच 'कसबा डायरी' या पुस्तकाचंही काम पूर्ण करून घेतलं. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे यांनी 'कसबा डायरी'ची प्रस्तावना लिहिली. ही दोन पुस्तकं छापून हातात येतात न येताच तोच जेडींनी गुगली टाकली. ते पाटील यांना म्हणाले, ''माझं पुढचं पुस्तकही लिहून तयार आहे!'' मग त्यांच्या 'असं जगावं कधीतरी' या पुस्तकाचंही बारसं लगेचच करायचं ठरलं.अशाप्रकारे १२ मे ते २४ मे या अल्पकालावधीत तीन पुस्तकं प्रकाशित होण्याचा मान लेखक 'जे. डी. पराडकर' यांना मिळाला. या निमित्तानं एकाच लेखकाची एकाच महिन्यात तीन सर्वोत्तम पुस्तकं प्रकाशित करण्याचा विक्रमही 'चपराक'ने केला. 'असं जगावं कधीतरी' या पुस्तकासाठी सातारा येथील उपशिक्षणाधिकारी श्री. रवींद्र खंदारे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तिन्ही पुस्तकांची अप्रतिम मुखपृष्ठं जेडींचा विद्यार्थी हेमंत सावंत यानं रेखाटली आहेत. १२ मे ते २४ मे या केवळ १३ दिवसात लेखक जेडी यांची 'कसबा डायरी' , 'बारा सोनेरी पाने आणि डोंगरावरच्या कथा', आणि 'असं जगावं कधीतरी ' ही तीन पुस्तके प्रकाशित करण्याचा चपराकने जो विक्रम केला,तो वाखाणण्याजोगा आहे. त्यातील 'असं जगावं कधीतरी' हे पुस्तक अचानक प्रकाशित करायचे ठरले. खरंतर कुठलेही पुस्तक प्रकाशित करणे हे आव्हानात्मक काम असते. अशा स्थितीत एकाच लेखकाची तीन पुस्तके प्रकाशित होणे म्हणजे एक आव्हानच म्हणावे लागेल आणि 'चपराक'ने ते आव्हान लीलया पार पाडले. 'चपराक' या प्रकाशन संस्थेची स्थापनाच जणू आव्हान स्वीकारण्यासाठी झाली आहे , हे त्यांनी अनेकदा सिध्द केले आहे.खरंतर पुस्तक प्रकाशनाचे काम प्रसुती सारखेच असते. येथे प्रत्येक टप्प्याला



वेदना आणि कळा आहेतच. जेडी यांचं पहिलं पुस्तक 'कवडसा' , साधारण २०१४ साली त्यांनी स्वतःच कोल्हापूर येथून छपाई करुन प्रकाशित केलं होतं. पुस्तक प्रकाशन म्हणजे काय प्रकरण असतं ? हे त्या एका पुस्तकाच्या निमित्ताने त्यांनी चांगल्याप्रकारे अनुभवले होते . गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या विषयांवर ते लिहीण्याचा प्रयत्न करत आहेत. हे सारे लेखन फेसबुक , व्हॉटसॲप या सोशल मिडीयावर पोस्ट केल्यानंतर वाचकांच्या छान प्रतिक्रिया त्यांना मिळू लागल्या. यामध्ये सातत्यपूर्ण प्रतिक्रिया असायच्या त्या कालनिर्णयचे संचालक श्री. जयेंद्र साळगावकर सरांच्या. ते नेहमी म्हणत जे . डी . या लेखनाचे पुस्तक प्रकाशित करा . साळगावकर सर एवढ्यावरच न थांबता त्यांनी घनश्याम पाटील यांना जेडी यांच्या लेखनाची शिफारस केली आणि यातूनच गतवर्षी ' साद निसर्गाची ' हे पहिले पुस्तक चपराक कडून प्रकाशित झाले. 'बारा सोनेरी पाने आणि डोंगरावरच्या कथा' या पुस्तकातील २४ कथांना क्यूआर कोड देण्यात आला आहे . हा कोड स्कॅन केल्यावर कथा ऐकण्याची सुविधा देण्याचा देखील कथासंग्रहातील पहिला प्रयोग चपराकने आपल्या पुस्तकामध्ये केलाय.असा अभिनव उपक्रम करणाऱ्या चपराक प्रकाशन आणि घनश्याम पाटील यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत.या पुस्तकात कोकणातील सामान्य माणूस अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतांनाही त्यावर मात करत जगतो कसा,वागतो कसा हे अनुभवायचं असेल तर हे पुस्तक वाचावंच लागेल.ही 'सोनेरी पानं' जेडींच्या लालित्यपूर्ण शैलीने ओथंबलेली आहेत.त्याच्या जोडीलाच 'डोंगरावरच्या कथा' ही दिल्यानं या व्यक्तीचित्रणांची मुळे मातीला घट्टपणे बिलगलेली आहेत.वास्तव जगातील बारकावे बारकाईने टिपणं हे पराडकरांच्या लेखणीचं वैशिष्ट्य आहे.मुळात ते हाडाचे पत्रकार असल्याने हे सारं नेमकेपणानं कसं मांडायचं याचं कौशल्य त्यांच्याकडे आहे.'कसबा डायरी' या पुस्तकातून जेडी यांनी ऐतिहासिक कसबा गावातील सर्व कथा मांडल्या आहेत.लेखकाचे मूळ गावं लोवले (ता. संगमेश्वर) हे आहे.संगमेश्वर तालुक्यातील ऐतिहासिक अशा कसबा गावात जेडी यांचे वडील माध्यमिक शिक्षक असल्याने जेडींचे बालपण तिथेच गेले.याच कसबा गावात शालेय अभ्यासाव्यतिरिक्त जे काही शिकायला मिळाले त्याची नोंद एका डायरीत लेखकाने ठेवली.गाव आणि त्या गावातील अनेक आठवणी या पुस्तकामधून लेखकाने अत्यंत सखोलपणे टिपल्या आहेत.हे पुस्तक वाचतांना प्रत्येकाला आपल्या गावाची आठवण आल्याशिवाय राहणार नाही.गावच्या आठवणीत ज्यांना डुंबायला आवडते त्यांच्यासाठी हे पुस्तक म्हणजे पर्वणी आहे.'असं जगावं कधीतरी' हे पुस्तक म्हणजे ज्या व्यक्तींनी शून्यातून उभं रहात आपली वाटचाल यशस्वी केली अशांची व्यक्तिचित्रणे आहेत. या साऱ्या माणसांची धडपड लेखक जेडी यांना यांच्याकडून आदर्श घ्यावा अशी वाटली. या प्रत्येक व्यक्तिमत्वाने त्यांना काहीतरी ज्ञान दिलेय.आपल्या माणसांचे मोठेपण आपणच सर्वांसमोर आणले पाहिजे आणि पुस्तकाच्या माध्यमातून ते सर्वदूर पोहचवले पाहिजे. असा विचार जेडी यांच्या मनात आला आणि हे पुस्तक जन्माला आले. कोकणातील माणसे जबरदस्त इच्छाशक्ती आणि जिद्द असणारी आहेत. कोणतेही काम करण्यात कमीपणा न मानणारी, स्वतःकडे जे काही आहे, त्यातील काही भाग आनंदाने दुसऱ्याला देणारी अशी व्यक्तिमत्वे खरंच प्रेरणादायी असल्याने 'असं जगावं कधीतरी' या पुस्तकात प्रेरणादायी व्यक्तिंचा जीवनप्रवास कथन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पुस्तकात २५ व्यक्तींचा जीवनप्रवास आहे. यातील काही व्यक्ति कोकणातील आहेत.अशी तिन्ही पुस्तके वाचनीय झाली असून संग्राह्य ठेवण्यासारखी आहेत.लेखक जे डी पराडकर यांच्यासारखा बहारदार सकस लेखक मराठी साहित्याला लाभला हे भाग्यच म्हणावे लागेल. एक पुस्तक प्रकाशित करायचे म्हणजे , त्याचे टंकलेखन , प्रूफ तपासणी , ले आऊट , मुखपृष्ठ , प्रस्तावना , मलपृष्ठ , छपाई , वितरण , कुरीयर, पार्सल आदी कामे म्हणजे कमालीची पळापळ आणि वेळेचे भान. खूप कठीण आहे हे सारं. मात्र १२ मे ते २४ मे या तेरा दिवसात जेडी यांच्या पुस्तकांची छपाई करुन त्यांच्या पुस्तक त्रिवेणीची इच्छापूर्ती झाली आहे.तिन्ही पुस्तकांचा मजकूर जेडी यांनी मोबाईलवर टाईप केल्याने त्यामध्ये शुध्दलेखनाच्या चूका खूपच असण्याची प्रकाशक पाटील यांना भिती होती. हे सारं अत्यंत कमी वेळात तपासणे खरंच कठीण काम होते,पण आता ही पुस्तके अत्यंत कमी वेळेत उपलब्ध झाली आहे.जेडींचा लेखनाचा झपाटा, उत्तम शैली, साधी-सोपी आणि रसाळ भाषा पाहता त्यांनी स्वतःचा एक वेगळा वाचकवर्ग तयार केला आहे. कोकणचे जे. डी. पराडकर आता महाराष्ट्राचं किंबहुना मराठी भाषेचं वैभव ठरले आहेत. जे. डी. पराडकर यांच्या पुस्तकांना भरभरून प्रतिसाद देणाऱ्या वाचक, विक्रेते, हितचिंतकांचे मनःपूर्वक, अगदी मनःपूर्वक आभार.'साद निसर्गाची' सह 'कसबा डायरी', 'बारा सोनेरी पाने आणि डोंगरावरच्या कथा', व 'असं जगावं कधीतरी' ही चारही पुस्तके मागवण्यासाठी चपराक प्रकाशन ७०५७२९२०९२ यांना संपर्क करू शकता. पुस्तके आपल्याला घरपोच मिळतील व वाचनाचा अतुलनीय अलोट आनंद मिळेल यात तिळमात्र शंका नाही.

# ऑनलाइन गेमिंगचा डर्टी जिहाद ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**ऑनलाईन गेमिंग अँप्सच्या माध्यमातून अल्पवयीन हिंदू मुलांना हेरून त्यांचे धर्मांतर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच गाझियाबादमध्ये उघडकीस आला आहे. धर्म ही अफूची गोळी आहे, असं म्हणतात. धर्मावरुन सातत्याने राजकीय आणि समाजिक वाद निर्माण करण्याचे प्रयत्न काही समाजकंटकांडून केला जातो. प्रत्येक धर्म आणि जातीचे चांगले विचार आणि संस्कार असतात. हे सर्व धर्म मानवतेचाच संदेश देतात. पण हल्ली कट्टरता इतकी वाढत चाललीय की नको त्या विकृत घटना घडायला सुरुवात झाली आहे. मुंब्र्यातून अशी एक विक्षिप्त घटना समोर आली आहे. खरंतर या घटनेची माहिती गाझियाबाद येथून समोर आलीय. या घटनेचे धागेदोरे मुंब्र्यापर्यंत असल्याची माहिती समोर आली आहे.**

जिहादी शाहनवाज उर्फ बद्दो हा फोर्ट नाइट गेम आणि डिस्कॉर्ड या दोन अप्सवर हिंदू नावाने फेक आयडी बनवून अल्पवयीन तरुणांच्या गेमिंग ग्रुपमध्ये सामील व्हायचा. तो गेम खेळण्यासाठी अल्पवयीन मुलांना विविध ट्रिक शिकवायचा. त्यात तो मुलांना धार्मिक प्रार्थना म्हणायला लावायचा आणि जिंकून द्यायचा. तुम्ही प्रार्थना म्हटली तर गेम सहज जिंकू शकता, असे तो मुलांना आवर्जून सांगायचा. त्यातून मुलांना पैसे मिळू लागल्याने त्यांचे हे आकर्षण दिवसेंदिवस वाढत गेले आणि हळूहळू ही मुले सहज इस्लाम स्विकारू लागली. ऑनलाईन गेमिंग अप्सवरून जाळ्यात अडकलेल्या मुलांना जिहादी शाहनवाज ऊर्फ बद्दो व त्याचे सहकारी काही व्हिडीओ व लिंक शेअर करून ते पाहण्यास भाग पाडत त्यात जिहादी झाकीर नाईक याच्यासह एका यूट्यूब चॅनेलची लिंक पाठवली जाई गाझियाबाद पोलिसांनी या चॅनेलची पडताळणी केली असता ते इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तानमधून हाताळले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशाच प्रकारे मुंब्रा शहर व अनेक ठिकाणच्या ४००हून अधिक मुलांचे त्याने धर्मांतर घडवल्याची माहिती तपास यंत्रणांच्या हाती लागली आहे. त्यातील २ मुले मुंब्रा परिसरातील तर १ जण मुंबईतील असल्याची माहिती समोर आली आहे.
ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून मुलांचे धर्मांतर करण्याचा हा सारा खेळ टप्पा टप्प्याने होत असल्याची माहिती समोर आली आहे. या चा पहिला टप्पा म्हणजे मुलांसोबत ऑनलाइन गेम खेळणे. दुसऱ्या टप्प्यात ॲपच्या माध्यमातून मुलांशी चॅटिंग करून त्यांना इस्लामचे फायदे सांगत होते. तसेच, या मुलाला सांगण्यात आले की जर त्याने कुराणच्या आयतींचे पठण केले तर तो जिंकेल. त्यामुळे लहान मुलं सुद्धा त्यांनी सांगितलेलं करायचे. त्यांनतर त्यांना जिंकूनही दिले जात होते. त्यामुळे मुलांचा विश्वास वाढत जाऊन मुस्लिम धर्माकडे कल वाढत जात होता. जेव्हा मुलाचा इस्लामकडे कल वाढतो आणि तो मुस्लिम बनण्यास तयार होतो, तेव्हा शेवटी त्याच्याकडून प्रतिज्ञापत्र केले जाते. या प्रतिज्ञापत्रात मुलाने स्वतःच्या इच्छेने इस्लाम स्वीकारत असल्याचे लिहायला लावले आहे. उत्तरप्रदेशातील गाझियाबादमध्ये मोबाईलमधील ऑनलाईन गेमिंगद्वारे धर्मातर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. महत्त्वाचं म्हणजे, गाझियाबादमधल्या या धर्मांतराचं महाराष्ट्राशी कनेक्शन समोर आलंय, महाराष्ट्रातील मुंब्र्यातही ४०० जणांचं धर्मांतर करण्यात आल्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. ऑनलाईन धर्मांतर करणाऱ्या मुख्य आरोपीनं हा गौप्यस्फोट केल्याचं डीसीपी निपुण अग्रवाल यांनी सांगितलंय. मोबाईल गेमच्या आडून ब्रेन वॉश करत धर्मांतर करण्यात आल्याची माहिती समोर आलीय. दरम्यान, ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून अल्पवयीन मुलांचं ब्रेन वॉशिंग करत धर्मांतर करण्याच्या या रॅकेटचं जाळ महाराष्ट्रासह देशभरात पसरल्याचं बोललं जातंय. या रॅकेटच्या मुळापर्यंत पोहोचण्याची गरज असून याची पाळेमुळे शोधून काढण्याची व कारवाई करण्याची गरज आहे. अल्पवयीन हिंदू मुलांच्या धर्मांतराचे हे मोठे षड्यंत्र नष्ट करण्यासाठी लवकरात लवकर प्रयत्न करायला हवेत ! हिंदु पालकांनीही आपल्या मुलांना यासंदर्भात सजग करून त्यांना धर्मशिक्षण द्यायला हवे. तसे झाल्यास ही मुले अशा षड्यंत्राला बळीच पडणार नाहीत !

# नाती

आधुनिक केसरी

आज नातं या विषयावर थोडंसं लिहावस वाटतंय आपल्या भारतीय संस्कृतीत खूप बदल होत आहेत.



दिपा सदाशिव चिंचकर
संपर्क 9284900969

जुन्या परांपरा बरोबर नवीन आधुनेक्तेची विचारसरणी आपण अंगीकारत आहोत. प्रत्येक व्यक्ती आपले कष्ट चातुर्य वृद्धीकौशल्य याचा वापर करून आपापली प्रगती करत आहे. पण या सगळ्यामधे मला एक प्रश्न् खूप दिवसापासून त्रास देत आहे. आणि तो प्रश्न मला तुमच्या सगळ्यांबरोबर मांडावासा वाटला म्हणून हा आजचा लेख. जुना काळ आणि हा आजचा आधुनिकतेचा काळ यात खूप फरक झाला काय. पहिल्या काळात नाती विश्वासाची वाटायची व्यक्तीच्या वचनाला शब्दाला महत्व होतं.आणि खूप मनापासुन ती निभावली जायची आणि नात्यात आपलेपणा दिसून यायचा आणि तसे संस्कार विश्वास आपुलकी होती नात्यात पण आता वेळेनुसार सगळं बदल्यासारखं वाटतय नवीन गोष्टी नवीन ज्ञान प्रगती सगळं होतंय पण दुसऱ्या बाजूला माणूस दुरावत चालाय.नात्यात दिखावा पणा दिसायला लागलाय पाहिल्यासारखे नात्यांचे बंध घट्ट होताना दिसत नाहीयेत. परक्या व्यक्तींबरोबर तर दूर रक्ताच्या नात्यात ही आपलेपणा दिसत नाही. फक्त वरवर विचारपूस, स्वार्थीपणा, इगो, गर्विष्ठपणा या अवगुणांची भर नात्यात झालेली दिसते. भाव भावाचा वैरी झालेला दिसतो कोणी कोणासाठी निरपेक्ष मनाने मदत जरी केली तरी नक्कीच त्याचा स्वार्थ असणार असा विचार केला जातोय कारण नात्यात पाहिल्यासारखा विश्वास नाही राहिला रक्ताच्या नात्यावरच अविश्वास दाखवला जातोय कधी कधी खरच प्रश्न पडतो छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांच्या विश्वासावरच स्वराज्याची बांधणी केली हे सगळं विसरतोय. प्रत्येक व्यक्तीने मी पणा आणी स्वार्थ बाजूला ठेवला आणि विश्वासच पाया रोवून जर नातं घट्ट केल तर ते कोणतंही नातं कायम शेवट पर्यंत आपल्यासोबत असेन. म्हणूच सांगते आजपासून आपल्या मनात विचारात स्वार्थरूपी अहंकार वाईट पणा यासारख्या प्रवृत्तींना दूर करून एक



विश्वासाच नातं निर्माण करूया मग बगा आपण आपल्याच घरात किती आनंदी राहू आणि कोणतेही संकट भक्कम एकजुटीने पार पाडू. शेवटच सांगेन गरज म्हणून कोणतेच नातं जोडू नका सोय म्हणून कोणतेच नातं तोडू नका .आपल्याला नवीन गोष्टी स्वीकारताना जुन्या संस्कारांचा समतोल राखता आला पाहिजे. चला तर मग नात्याची विन विश्वासने घट्ट करूया. संस्काराची शिदोरी कायम जपूया.

तुकारामनीती
भाग -57

# विचार नाही नर खर तो तैसा ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**आपल्या कृतियुक्त आचार-विचारांनी ज्यांनी ज्यांनी समाजातील कुप्रथा, चालीरीती, कालबाह्य परंपरा आणि थोतांड मिरवणाऱ्या वेषधारी लोकांवर घणाघात केला त्यांना तत्कालीन समाजाने उपेक्षेची वागणूक दिली. असे असले तरी आपण काय विचार करतो आणि त्याचे परिणाम काय होतील? याचा प्रत्येक व्यक्तीने विचार केला की; आपल्या विचारांचे फलित झाल्याशिवाय रहात नाही. काळ मोठा खडतर असून आज समाजातील सर्वच घटकांना विचारांची नितांत आवश्यकता आहे. वर्तमानाचे निरीक्षण-परीक्षण केल्यानंतर आज आपला प्रवास उलट मार्गाने तर होत नाही ना? एकीकडे साधनांची रेलचेल, मुबलक पैसा आणि चंगळवादी संस्कृती फोफावतांना आचार-विचाराकडे दुर्लक्ष तर होत नाही ना? असा प्रश्न पडतो आणि त्यात तुकोबांची अभंग रूपाने भेट होते. प्रस्तुत चिंतनासाठीचा तुकोबांचा हा अभंग...**

**विचार नाही नर खर तो तैसा ।वाहे ज्ञान पाठी भार लगड जैसा ॥१॥वादावाद करणे त्यासी तोचि वरी ।गुखाडीची चाड सरे तोचि बाहेरी ॥२॥सौभाग्यसंपन्न हो का वृद्ध प्रतिष्ठा । चिकरूनि सांडी पायां लागली ते विष्ठा ॥३॥**
**नाही याति कूळ फांसे ओढी तयासी ।तुका म्हणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥४॥(११२७)**

सडेतोड आणि एकदम बोलका आहे. माणूस आणि इतर प्राणीमात्रांमध्ये भेद तो काय? आहार, निद्रा, भय आणि मैथुन म्हणजेच प्रजनन हे सर्वच प्राणीमात्रांमध्ये समान असून कदाचित बुद्धी जरी सगळीकडे असली तरी तिचा योग्य विनियोग कसा करावा( ?) हा विचार केवळ आणि केवळ आपल्याकडे म्हणजेच माणसांकडेच असल्यामुळे आपण तो व्यवस्थित करायला हवा. माणूस असूनदेखील आपल्या उत्कर्षाचा, विकासाचा, आत्मकल्याण, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, शांतता, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, जन्म आणि मृत्यु असे विश्वात्मक विचार जर तो करत नसेल तर तो माणूस असून देखील गाढवासारखा आहे. बरेच उच्च शिक्षित, उच्च विद्याभूषित माणसं आहेत मात्र ते पशूपेक्षाही खालच्या दर्जाचा विचार आणि वर्तन करतात. अशी माणसे म्हणजे ज्ञानाचे ओझे पाठीवर वाहणारे गाढवं आहेत. त्यावर कळस म्हणजे ही माणसं भांडणे, वादावादी करून आपले अनमोल आयुष्य कवडीमोल करताहेत. माणूस असूनदेखील ही माणसं गुखाडी म्हणजेच हागणदारीतून फिरत असतात अशी खालची भाषा तुकोबाराय या माणसांसाठी वापरतात. माणूस मग तो कुणीही असो, सौभाग्यसंपन्न असो, प्रतिष्ठित किंवा जेष्ठ असो जर तो कल्याणकारी, वैश्विक विचार करत नसेल तर त्याचे ज्ञान किंवा माणूसपण हे वाटेने चालतांना पायाला लागलेल्या विष्ठेप्रमाणे आहे. बरीच माणसे आपला वंश, जात, कुळ, घराणा याची शेखी मिरवतात, विचार मात्र शुद्र करतात. अशी माणसे म्हणजे केवळ मुद्रा म्हणजेच वेषधारी श्रेष्ठत्व मिरवणारे थोतांड, भोंदू, गर्विष्ठ निकामी लोक असून त्यांची श्रेष्ठत्वाची मुद्रा जर जनकल्याणासाठी उपयोगी येत नसेल तर काय कामाची? काय जाळायची आहे काय? असा खणखणीत सवाल तुकोबा या अभंगात उपस्थित करतात. तुकोबांना त्यांच्या समकालीन प्रस्थापित धर्ममार्तंड, फसव्या, भोंदू लोकांनी लाठ्याकाठ्यांनी का मारले? त्यांचे अनुभवसंपन्न, सडेतोड, जनसामान्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणाऱ्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत का बुडवल्या असतील? या प्रश्नांची उत्तरे इथे या आणि अशा अनेक अभंगात आपल्याला सापडतात. कविता किंवा लेखन कसे असावे? त्याचे फलित काय असले पाहिजे? याचा उत्तम दाखला म्हणजे तुकाराम गाथा! लोकांना जागे करून त्यांना विचार समृद्ध आणि विचार प्रवण करणारे लेखनच कालातीत असते. भाषा आणि त्यातून प्रकट होणारे सामाजोत्कर्ष अभिनिवेश हे त्या त्या वाङ्मयीन कलाकृतीच्या परिणामाचे द्योतक असून त्यावरच त्याची चिरकालीनता अवलंबून असते. तुकोबांचे लोकवाङ्मय तत्कालीन जनसामान्य श्रोत्यांच्या मनीमानसी एवढे खोलवर रुजले होते की; अभंगाच्या वह्या बुडवल्यानंतर सुद्धा लोकांनी आपल्या स्मरणशक्तीच्या अलौकिक ताकदीने ते अभंग पुन्हा लोकप्रवाही केले! वाङ्मय निर्मितीच्या इतिहासात एवढी अद्भुत घटना आत्तापर्यंत तरी कुठे वाचायला मिळाली नाही! हा केवळ आणि केवळ लेखन चमत्कारच म्हणावा लागेल! कर्मकांड, थोतांड, फसवेगिरीवर सडेतोड चाबकांचे वार करणारे तुकोबाराय हे खरे लेखन पंढरीचे वारकरी ठरतात. सोळाव्या शतकात जन्मलेल्या संत कबीरांच्या लेखणीची मजबुतीने री ओढण्याचे काम सतराव्या शतकांत तूकोबांनी मोठ्या ताकदीने केले. इतर वारकरी संतांचे अभंग आणि तुकोबांच्या अभंगातील हा भेद सहजच लक्षात आल्याशिवाय राहत नाही. कुणाचाही मुलाहिजा, भीडभाड न ठेवता तुकोबा 'तीक्ष्ण उत्तरे हाती घेऊन बाण फिरे' असेच लोककवी आहेत. वर्तमानात वारकरी सांप्रदाय बाजारीकरण, व्यापारीकरण आणि दोन नंबरच्या पैशाने कलंकित होतांना आज काही बोटावर मोजण्या एवढे कीर्तनकार-प्रवचनकार सोडले तर एकही महाराज रोखठोक तुकोबा समाजासमोर मांडत नाहीत. आज कीर्तनात बाष्कळ विनोद, संसाराच्या गप्पा, गोड गोड गायन, त्याच त्या भाकड कथा यातच सर्व समाज भुलवून टाकला आहे या तथाकथित ह.भ.प.महाराज मंडळींनी! हेच खऱ्या अर्थाने वारकरी सांप्रदायाचे मारेकरी आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये! आज काही महाराज मंडळी सोडली तर एकही महाराज काव्य अथवा इतर प्रकारचे संतांच्या लेखनावर



चिंतन लेखन करत नाहीत. काही महाराज खूप सुंदर अभ्यासपूर्ण कीर्तनाची मांडणी करून समाजात वारकरी विचार रुजवताहेत. हे विचार-विवेचन ग्रंथ रूपाने मागे राहण्यासाठी चारदोन कीर्तनाच्या तारखा कमी करून आपले विचार लेखन करून पुस्तक रूपाने समाजासमोर येणे काळाची गरज बनली आहे. आज जर असे झाले नाही तर कीर्तन म्हणजे केवळ हा हा ही ही आहे, असा चुकीचा विचार नव्या पिढीत रुजून त्यांना खरे कीर्तन माहिती होणार नाही. त्यासाठी सर्वच संतांच्या वाङ्मयावर समकालीन परिपेक्षात लेखन होऊन समाजासमोर त्यातील मूलगामी विचार येणे क्रमप्राप्त आहे. असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने वारकरी सांप्रदायाची सेवा घडून येणे होय.

या अभंगात विचार हा महत्वपूर्ण शब्द तूकोबांनी दिला असून सर्वकाळ माणसाने विचारपूर्वक वर्तन करणे गरजेचे आहे. विचारावर आचार आणि अचारावरच उच्चार आधारित असतो. त्यासाठी सर्वप्रथम आपण काय विचार करतो हे अत्यंत महत्वाचे आहे. त्यासाठी दूरदृष्टी, सर्वसमावेशक, सर्व कल्याणकारी विचारच चिरकाल टिकणारा असतो आणि तसाच विचार आपण करायला हवा. आज माणसे संकुचित विचार करून स्वतः आणि आपला भोवताल अडचणीत आणत आहेत. आज माणसं एकीकडं पैशाने श्रीमंत होतांना दूसरीकडे मात्र विचाराने गरीब होताहेत. पैसा, सोयीसुविधा मुबलक प्रमाणात असतांना माणसामाणसांमधला संवाद थांबला आहे. संत तुकोबाराय किंवा अन्य संत आणि महान लोकांनी समाजात विचार पेरण्यासाठीच एवढा अट्टहास केला आहे हे विसरून चालणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनीच सर्वसमावेशक विचार करणे गरजेचे आहे. आज तुकाराम नीती लिहितांना मलाही अनेक विचार स्पर्शून जातात. मनात दाटलेले विचारांचे काहूर या माध्यमातून त्याला वाट मोकळी करून देण्याचे काम सुरु आहे. हे विचार लिहित असतांना मी काही एखादा महात्मा नाही! या विचारांचा मी माझ्यासाठी, माझ्या जीवनात आणि सतत भेटत जाणाऱ्या माणसांशी चर्चा करत असतो. स्वतःसह जगात बदल घडला पाहिजे हाच केवळ हेतू या लेखनामागे आहे. ज्ञानोबा-तुकोबांचा चालत आलेला वारकरी वारसा भजन-कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून जपतांना काहीतरी वारकरी लेखन सेवा घडावी, संत वचनांचा परीसस्पर्श होऊन आपल्याही जीवनात थोड्याफार प्रमाणात बदल होऊन सद्विचार प्रवाही व्हावेत या उद्देशाने लेखन-चिंतन सुरु आहे. एखादा विचार आला आणि त्याला तुकोबांच्या अभंगांची जोड मिळाली की; एका क्षणात लोखंडाचे सोने झाल्याशिवाय रहात नाही! तेवढा खडतर काळ असतांना सुद्धा तूकोबांनी प्रस्थापित मानसिकतेची जपणूक करणाऱ्या लोकांना आपले खडे बोल सुनावले. त्याची जाण आणि वर्तमानाचे भान आपण सर्वांनीच वर्तमान काळात बाळगून वर्तन-लेखन-कीर्तन करायला हवे. असे होणे म्हणजेच आपला जीवनमार्ग योग्य सन्मार्गाने प्रवाही होणे होय! त्यासाठीच तूकोबांनी दिलेल्या अनमोल शब्दधनाचा भारवाही हमाल होण्याचा माझा हा प्रयत्न चालू आहे आणि तो नियमितपणे असाच चालू राहील यात तिळमात्र शंका नाही! ज्याप्रमाणे श्रोता हा वक्त्यासाठी ईश्वर प्रमाण असतो त्याच न्यायाने वाचक सुद्धा लेखकासाठी ईश्वर प्रमाण असतो! तेंव्हा प्रिय महानुभाव वाचक बंधू-भगिनींनो, आपणही हे सदर नियमित वाचून मला आपल्या अनमोल सुचना करून लिहिण्यास आशीर्वाद द्याल हीच माफक अपेक्षा! जय तुकोबाराय!

# अंतरीच्या गुजगोष्टी 'स्वानंद'



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**प्रत्येकाला सुख हवं आहे, किंबहुना प्रत्येकजण सुखाच्याच शोधत आहे फक्त ते दुसऱ्याजवळ शोधण्याच्या हट्टापायी सुखी जीव दुःख भोगत आहे. "तुज आहे तुजपाशी | परी तू जागा चुकलाशी ||" संतांची ही शिकवण आपण सहजपणे, सोयीस्कररित्या विसरून जातो. "जेथे राबतो हात, तेथे हरी" ह्याची जाणीव ठेवून, याच विचारांची साथ सोबत घेऊन मी मी माझा मळा फुलवला.**

जेंव्हा आपण आपल्या आवडीचे काम मनापासून करतो तेंव्हा ते उत्तम च होते.
आम्ही शेतकरी, काळी आई हीच आमची पंढरी, आम्ही तिचे वारकरी, यावेळी संत सावतामाळी यांचा अभंग आठवतो, " कांदा, मूळा, भाजी | अवघी विठाई माझी ||" मी कोण आहे या पेक्षा माझे कर्म काय आहे ह्यावर आपला आनंद ठरत असतो...
ह्या हायब्रीड जीवन शैली मध्ये औषधांचा मारा अधिक असलेले भाज्या घ्याव्या लागतात, त्याच शिजवून आपण खातो तेंव्हा नकळत का होईना आपण आजारांना निमंत्रण देत असतो. तेंव्हा ठरवलं आपल्याला लागणाऱ्या भाज्या आपणच पिकवायच्या. म्हणजे घरच्या ताज्या भाजीपाल्याने शरीर निरोगी राहील व त्याच्यासाठी कष्ट केल्याने मन निरोगी राहील. जेंव्हा आपण आपली बाग फुलवतो, तिची निगा राखतो तेंव्हा आपण निसर्गाच्या जवळ अगदी त्याच्या कुशीत विसावत असतो आणि तो आनंद अवर्णनीय असतो.
आई- वडील, संत, सद्गुरू, धरणीमाय सारखं निःस्वार्थी आपल्यावर कोणीच प्रेम करू शकत नाही ,

**"लेकुराचे हित | वाहे माऊलीचे चित्त**
**ऐसी कळवळ्याची जाती |**
**करे लाभावीण प्रीती ||"**

म्हणून आईची-वडिलांची, संतांची, सद्गुरू माऊलीची, धरणी मातेची सेवा केली तर जीवनात आनंद मिळाल्याशिवाय राहणार नाही. तेंव्हा संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाची अनुभूती येईल,

**आनंदाचे डोही, आनंद तरंग |**
**आनंदची अंग, आनंदाचे ||**

**संत बहिणाबाई म्हणतात त्याप्रमाणे,**
**"मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर |**
**किती हाकलु हाकलु, फिरुनी येतं पिकावरं ||**

म्हणून ह्या मनाला सतत कामात, नामात गुंतवून ठेवलं तरच ते निरोगी राहणार आहे.
फक्त विश्वास असायला हवा, स्वतःवर आणि भगवंतावर. जसे संत जनाबाई म्हणतात, माझ्या प्रत्येक कामात भगवंत स्वतः मदत करत असतो

**"झाडलोट करी जनी, केर भरे चक्रपाणी |**
**पाटी घेऊनिया शिरी, नेवुनिया टाकी दुरी |**
**ऐसा भक्तीशी भुलला, नीच कामे करू लागला |**
**काय उतराई होऊ तुला, जनी म्हणे बा विठ्ठला ||"**

आपल्यालाही प्रत्येक कामात भागवंतच मदत करत असतो पण ते कळत नाही कारण कल्पनेचे देव आपल्या डोक्यात असतात,

**म्हणून संत सांगतात, कल्पनेचे देव कल्पांती नसती |**
**ऐसें वेद श्रुती बोलताती ||**
**यापुढेही ते सांगतात, सांडी कल्पना उपाधी, तीच साधूला समाधी ||**

सगळे दुःखच मुळात कल्पनेचे आहे.आपण भगवंताची, सुखाची कल्पना करतो आणि दुःख भोगतो. आपल्या कर्मात, प्रत्येक जीवात, तोच तो एक ओतप्रोत आहे, त्या एकालाच आपण जाणत नाही आणि रानोरान फिरत राहतो. प्रत्येक गोष्टीत सुख आहे फक्त गुह्य समजलं पाहिजे. म्हणूनच,
प्रत्येक जीवमध्ये भगवंत पाहा, भरला घनदाट हरी दिसे, अशी दृष्टी झाल्यास आनंद मिळाल्याशिवाय राहणार नाही. जे जे भेटे भूत, ते ते मानी मी भगवंत या उक्ती प्रमाणे राहिल्यास स्वानंद तुमच्या माझ्यातच आहे. फक्त शोधा म्हणजे सापडेल.
"देव आहे देव आहे हृदय मंदिरी शोधूनि पाहे"
"देव नटला नाना परी, भरुनी उरला चराचरी"
अशी दृष्टी असेल तर स्वर्ग सुख आहेच आहे. आनंद आहेच आहे.

# आमिषाला भुलू नये



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**कार्य करताना निरपेक्ष भाव खुप महत्वाचा आहे निरपेक्ष भाव असेल तर चेतना विवेक जागृत असतात आणि आपण जे कार्य करतो ते होश युक्त असत.होश युक्त कार्य करताना जीवनात कोणत्याही प्रकारचं नुकसान होत नाही.होश संपला की मग मात्र आपल नुकसान कोणीही टाळू शकत नाही. आपला प्रकाश प्रखर असेल सोन युक्त जीवनशैली असेल तर अनेक विषयांत आपली अडचण निर्माण होणाया अगोदर मार्ग निघतो .लुट ,फसवणुक ,हि कधीच थेट होत नाही जवळीकीच्या मार्गने अमिष दाखवलं जातं .**

अमिषाला बळी पडुन मग आपण आपलं ज्ञान विवेक , आणि वास्तव विसरतो . परिणाम फलस्वरूप आपली योग्य वेळी लुट होते . स्वतःला मजबुत घडविण्या बरोबरच आपले संस्कार भक्कम ठेवले पाहिजे. आपले संस्कार भक्कम असतील तर जगातील कितीही प्रभावी शिकारी आपल्या समोर निष्प्रभ ठरेल . अगोदर आपण स्वतः शिकारयाच्या ताब्यात जातो.आणि नंतर ओरडतो नंतर आरडुन ओरडुन काही उपयोग होत नसतो .आपण दैनंदिन पाहतोय समाजाच्या स्तरावर असो अथवा व्यक्तिगत स्तरावर रोज अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील फसवणुकीच्या संदर्भात घटना घडत आहेत.हि खुप गंभीर बाब असुन हे थांबल पाहिजे .आणि हे थांबण्यासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. अगोदर हे समजलं पाहिजे कि थेट कोणीही आपली लुट करू शकत नाही.आपल्या होणार्या लुटिला आपण थेट प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रित्या जबाबदार असतो . लुट करणारा अगोदर आपल्याशी जवळीकता साधत असतो . नंतर तो आपल्याला लालच दाखवतो आणि मग लुटतो .आपण कोणाशीही जवळीक साधताना किमान विचार केला पाहिजे.पण आपण तो विचार जवळीकता निर्माण करताना करतो का ?तर बहुतांश वेळा विचार करत नाहीत.मग जवळीकता निर्माण केली तर किमान विवेक जागृत ठेवून जवळीकता असली पाहिजे.आणि जवळीकता असताना लालसा हि विचार पुर्वक असली पाहिजे.फसवणुक अर्थिक, मानसिक,शारिरीक, वैचारिक, पद्धतीची असल्याने लुटीचे गांभिर्य पण तितकेच मोठे आहे. जगात वेगवेगळ्या पद्धतीचे लोक वेगवेगळ्या पद्धतीने फसविण्यासाठी बसले आहेत .हे वास्तव आहे पण आपण का फसाव . हाच खुप मोठा प्रश्न आहे.आपली फसवणूक होण्यास इतर कोणी नाही तर आपण स्वतः जबाबदार असतो .पण हिच जबाबदारी आपण आपली चुक लपविण्यासाठी इतरांवर ढकलतो . कोणत्याही विषया संदर्भात आपल्या मनात लालसा निर्माण होऊ देऊ नका .लालसा निर्माण होताना विवेक जागृत असला पाहिजे आणि सत्य, धर्म, न्याय शास्त्र आध्यत्म समजलं पाहिजे.महणजे आपली लालसा आपल्या फसवणुकीचे मुळ ठरणार नाही.तसच कोणीही कितीही प्रयत्न केले तरी तो आपल्याला लुटण्यासाठी निष्फळ ठरला पाहिजे एवढी सद्सद्विवेक बुद्धी जागृत तर असलीच पाहिजे. आपल्याला लुटणारा अगोदर आपल्याला लालचावतो हे सुत्र समजलं पाहिजे.मग मात्र आपली कोणीही सहजासहजी फसवणूक करणार नाही आणि उघड्या डोळ्यांनी सगळं पाहण्याची वेळ आपल्यावर येणार नाही. आपल्या कडून चुक होऊ देऊ नका. पण सध्या सगळं उलट घडतंय लालच हेच लुटीच मुळ आहे .आपण आपल्या मनात लालच निर्माण होऊ दिली नाही तर या सृष्टी वर आपल्याला कोणीही लूटु शकतं नाही .आपली लालसा आपल्या लुटीस कारणीभुत ठरते .विषय कोणताही असो आपण त्याची दुसरी बाजू कधीचं पाहत नाही दुसरी बाजू हेच सत्य असतं अथवा सत्य जाण्यासाठी दुसरी बाजू पडताळणी करण गरजेच असत.समाजिक पातळीवर प्रत्येक दिवशी हजारो वेगवेगळ्या प्रकारच्या घटना घडामोडी घडत आहेत.घडना घडामोडी घडल्यानंतर दोषारोप होतात चर्चा होते शेवटी चर्चा हवेत विरून जाते .मुळ समस्या कायम स्वरुपी तशीच राहते मुळात आपल्या संदर्भात अनपेक्षित घटना का घडते याचा विचार चिंतन मंथन आपण केलं पाहिजे. क्षेत्र कोणतही असु त्या क्षेत्रात विषयात अगोदर आपल्या मनात लुटणाऱ्रा लालच निर्माण करत असतो .आणि नंतर योग्य वेळी आपल्याला लुटत असतो .अमिषाला बळी पडल्या शिवाय आपली लयलूट होतं नाही हे वास्तव आहे.अगोदर आपल्याला आमीष दाखवलं जातं आपण त्याला भुलतो आणि मग शेवटी आपली लुट हे निश्चित ठरलेली असते हा घटनाक्रम तोडण्यासाठी आपलं ज्ञान आपला रक्षक होऊ शकत म्हणून स्वतःला मजबुत घडवा . त्यासाठी आपण स्वतः जबाबदारी असतो पण आपण ते मान्य करत नाहीत हिच खरी समस्या आहे. आपल्याला अगोदर भुरळ घातली जाते एकदा भुरळ घातली कि आपल्याला लुटायची आवश्यकता राहत नाही आपण स्वतः लुटुन घेण्यासाठी उतावीळ असतो . आपल्या समोर कोणीही मृगजळ निर्माण केलं तरी सुद्धा आपल्याला सद्सद्विवेक बुद्धी ने त्यावर मात करून आपला लुटी अगोदरच बचाव केला पाहिजे.

# तरुणांनो पँथरप्रमाणे आता पेटून उठा



अतुल ह. खंडगावकर
संपर्क क्र. 7218340512

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांचा समाजसुधारणेचा, जातीअंताचा वारसा सांगणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रात दिवसेंदिवस दलितांवरील अन्याय, अत्याचाराच्या घटना घडत असून या घटनांत अनेकांना जीवे मारण्यात येत आहे. कुठे दलितांची घरे जाळण्यात येतात, तर कुठे गावात राशन, किराणा देण्यास मज्जाव करण्यात येतो, जनावरांसारखी जीवंत माणसं मारली जात असताना सरकारकडून कुठलीही ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. यात कळस म्हणजे या घटनांमध्ये ना पोलिस यंत्रणा नोंद घेतले, ना शासनदरबारी न्याय मिळतो. राज्यकर्त्यांची ही बेफिकिरीच इथे दिसून येते.**

गावात भीम जयंती काढली म्हणून वाळकी, ता. हदगाव, जि. नांदेड येथील मातंग समाजाच्या तरुणांवर जीवघेणा हल्ला केला जातो व त्यांच्यावरच दरोड्याचा गुन्हा दाखल होतो, तर पाल, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथील रोहिदास पंडित तुपे या तरुणाला गावातील सवर्णसमाजाच्या लोकांनी आमच्या मुलीवर प्रेम करतोस का म्हणून दिवसभर मारहाण करत ठार केले. विशेष म्हणजे गावात पोलिस लवकर येऊन म्हणून अलीकडेच रस्ता अडविण्यात आला होता.  पैठण तालुक्यातील वाघाडी येथील महिलेला गायरान जमीन का धरलीस म्हणून गावातीलच कहार समाजाच्या व्यक्तीने बेदम मारहाण केली होती. आम्ही स्वतः त्यावेळी सदर महिलेला एसपींकडे घेऊन जाऊन अ‍ॅट्रॉसिटी दाखल करायला भाग पाडले होते. मारहाण एवढी क्रूर होती की, त्या महिलेच्या कंबरेखाली काळे, निळे वळ उमटले होते. लातूर जिल्ह्यात मांतग समाजाचा नवरदेव पारावर का चढला म्हणून साऱ्या वऱ्हाडी मंडळींना गावातील सवर्ण समाजाने मारहाण केली होती.

अहमदनगर जिल्ह्यात खर्डा, ता. जामखेड येथील मातंग समाजातील  नितीन राजू आगे कथित प्रेमप्रकरणाच्या संशयावरून अत्यंत अमानुषरीतीने छळ करून दिवसाढवळ्या खून करण्यात आला. या हत्येने अवघ्या महाराष्ट्राला खैरलांजीतील बौद्ध हत्याकांडाची तसेच दीड वर्षापूर्वी घडलेल्या नगरमधीलच सोनई दलित हत्याकांडाची आठवण करून दिली. खैरलांजी हत्याकांडात ज्या प्रकारचे क्रौर्य, अमानुषता, दलितद्वेष, जातीयवादी मानसिकता आपण पाहिली, तशीच क्रूरता, छळवणूक, अमानुषता खर्डा हत्याकांडात दिसून येते. खैरलांजी ते खर्डा सर्वत्र प्रवृत्ती एकच आहे. दलित-सवर्ण यांच्यातील हा अन्याय-अत्याचाराचा संघर्ष सर्वत्र सारखाच आहे. खैरलांजी घडून बरीच  वर्षे झाली तरी दलित, आदिवासी, मागासवर्गीयांवरील अन्याय-अत्याचार थांबलेले नाहीत. मात्र राज्याचे गृहमंत्री अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे कमी होत असल्याचा डांगोरा पिटत आहेत. मुळात देशातील दलित - आदिवासींची सामाजिक सुरक्षाच धोक्यात आली आहे. याला सरकारच या घटनांना जबाबदार आहे. कारण हे अन्याय-अत्याचार रोखण्यास सत्ताधाऱ्यांची राजकीय इच्छाशक्तीच नाही. म्हणूनच कोवळ्या नितीनला आपला प्राण गमवावा लागला आहे. त्यात जितके आरोपी दोषी आहेत, तितकेच, किंबहुना राज्य सरकारही दोषी आहे.  महाराष्ट्रात एकापाठोपाठ दोन मोठ्या घटना घडल्या असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जम्मू काश्मीर गेल्याची बातमी आहे. ज्या महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आपले आयुष्य वेचले, संपूर्ण देशाने त्यांच्या विचारांचा आदर्श घेतला, त्यांच्या नावाने पुरोगामी महाराष्ट्र अशी ओळख मिळाली, त्याच महाराष्ट्रातील अहमदनगरमधील खर्डा येथील दलित असलेल्या नितीन राजू आगे याची सवर्ण समाजातील मुलीबरोबर प्रेम असल्याच्या कारणावरून मुलीच्या नातेवाईक व समाजबांधवांकडून निर्घृण हत्या करण्यात आली. नितीन हा बारावीत शिकणारा कोवळा तरुण. वडील खडी फोडण्याचे काम करतात तर आई मजुरीचे काम. एकुलता एक मुलगा. अत्यंत गरीब कुटुंबातील आशेचा किरण. त्याच्या शिक्षणाने आगे कुटुंबात प्रकाश निर्माण झाला असता. अशा नितीनचा गुन्हा काय  ? तर वर्गातील सवर्ण समाजातील मुलीबरोबर असलेले त्याचे कथित प्रेमसंबंध; अशा मानसिकतेतूनच नितीनचा काटा काढण्यात आला. सकाळी साडेसात वाजल्यापासून दुपारी तीन चार वाजेपर्यंत हा सारा प्रकार सुरू होता. मात्र एवढ्या काळात शाळेपासून गावातील कोणाही माणसाने त्याची मदत केली नाही किंवा पोलिसांना अथवा कुटुंबीयांना कळवले नाही. एवढेच काय तर शिक्षणाचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षकांनीही शाळेच्या आवारात होणारी मारहाण रोखली नाही अथवा त्याबाबत पोलिसांना वा पालकांना कळवले नाही, उलट तो शाळेतच आला नव्हता असा कांगावा केला जात आहे, असे नितीनच्या आईवडिलांचा आरोप आहे. पोलिसांनी याप्रकरणी  रागातून घडलेली घटना म्हटले आहे. त्यामुळे याप्रकरणी सवर्ण समाजातील आरोपींना वाचवण्याची पुरेपूर काळजी घेतली गेली आहे, अशी चर्चा दलित समाजातील कार्यकर्ते करीत आहेत. पोलिसांवर राजकीय दबाव असून त्या दबावाखालीच ही केस नॉर्मल करण्यात येत आहे, असाही उघड आरोप होत असून तो खरा आहे.  एकट्या अहमदनगर जिल्ह्यातच २०१२ डिसेंबपर्यंत जातीय अत्याचाराचे ७३ गुन्हे दाखल झालेत; ज्यात दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियांवर अमानुष बलात्कार, जिवंत जाळणे, देहाचे तुकडे करणे अशी अघोरी हत्याकांडे झाली आहेत. गेल्या वर्षीच १ जानेवारीला उच्चवर्णीय मुलीशी प्रेम केल्यामुळे तीन मेहतर समाजाच्या तरुणांचीही अमानुषपणे हत्या करण्यात आली. परंतु अजूनही खटला प्रलंबितच आहे. २०१३ पर्यंत महाराष्ट्रात दलित अत्याचारावरील सात हजार १९ खटले प्रलंबित आहेत. त्यातील केवळ ७९३ खटले निकाली काढण्यात आले, ज्यात फक्त ६० खटल्यांत आरोपींना शिक्षा झाली व ७३३ खटल्यांतील आरोपी पुराव्याअभावी निर्दोष सुटलेत. फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात २०१३ साली दलितांवरील अत्याचाराच्या १६३३ व आदिवासींवरील अत्याचाराच्या ४१८ घटना घडल्यात. मार्च २०१४ अखेपर्यंत दलित-आदिवासींवरील अत्याचाराच्या ५४३ घटना नोंदल्या गेल्या आहेत.

या घटनेनंतर त्या कुटुंबीयांच्या मदतीला या जिल्ह्यातील एकही आमदार, खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी पाच दिवस होईपर्यंत गेला नाही. पालकमंत्री मधुकर पिचड घटनेच्या दिवशी तिथे असूनही आचारसंहितेचे कारण देत गेले नाहीत. का ? एका दलिताच्या मृत्यूची किंमत यांच्या लेखी काहीच नाही ? दलित त्यांच्याप्रमाणे माणूस नाहीत ? सवर्ण समाजाची मानसिकता अद्याप बदललेली नाही. सरंजामी, वर्णवर्चस्ववादी मानसिकता जोपर्यंत बदलत नाही तोवर हे असेच घडत राहणार. दलित माणूस स्वाभिमानाने, ताठ मानेने जगतो हेच जातिवादी मानसिकतेच्या समाजाला खुपते आहे. आपल्या बरोबरीला तो येतो हे सहन होत नाही. त्यातूनच ही हत्याकांडे होत असतात. म्हणूनच याची तत्काळ दखल राज्यकर्त्यांना घ्यावीशी वाटत नाही. मात्र या घटनेची माहिती मिळताच सर्वात प्रथम त्या



कुटुंबीयांची भेट रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष खासदार रामदास आठवले यांनी घेतली आणि त्याप्रकरणी जोरकसपणे आवाज उठवला गेला. त्याला माध्यमांनीही साथ देऊन ही बाब / घटना सतत लावून धरल्याने अखेर साऱ्यांना दखल घेणे भाग पडले. पाच दिवसांनंतर मग सत्ताधारी व विरोधी पक्षातील अनेक नेते खर्ड्याकडे धाव घेऊ लागले. मदतीची घोषणा करू लागले. त्यांच्यात अहमहमिका सुरू झाली. त्यातही राजकारण केले गेले. तात्पर्य काय ? तर राज्यकर्त्यांना दलित, आदिवासी, मागासवर्गीय समाजाच्या सुखदुःखाबद्दल काही देणे राहिलेले नाही. त्यांना फक्त या समाजाची मते हवी असतात. एरव्ही त्यांचे अस्तित्वही त्यांना नको असते. म्हणून राज्यकर्त्यांची ही बेफिकिरी इथे दिसून आली.

मनोज कसाब या २६ वर्षांच्या मातंग समाजातील दलित सरपंचावर ३ एप्रिल रोजी नाणेगाव, पो. बदलापूर, जिल्हा-जालना येथे गावातील उच्चवर्णीय मराठा समाजातील गणेश चव्हाण व इतरांनी जीवघेणा खुनीहल्ला केला, पण आरोपी उच्चवर्णीय व सत्ताधाऱ्यांशी संबंधित असल्याने पोलिसांनी आरोपींना अटकही केली नाही व अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट अन्वये गुन्हाही दाखल केला नाही. जेव्हा ५ मे २०१२ रोजी मनोज कसाब मृत्यू पावला, त्यानंतर पोलिसांनी आरोपींना अटक करून गुन्हे दाखल केले. म्हणजे आरोपी गावात दहशत पसरवीत मोकाटच फिरत होते.

२५ एप्रिल २०१४ औरंगाबादच्या कन्नड तालुक्यातील पिशोर पोलीस हद्दीतील देवपूल गावची. तेथेही उमेश आगळे या मातंग समाजातील २० वर्षांच्या तरुणाला प्रेमसंबंधाच्या कारणावरून गावातील उच्चवर्णीय, जातीयवाद्यांनी तीक्ष्ण हत्याराने खून करून विहिरीत फेकून दिले. या प्रकरणातही पोलीस उमेशची आई सावित्रीबाईंची तक्रार घेण्यास नकार देत होते. याबाबत प्रसारमाध्यमांत ओरड झाल्यावरच तक्रार घेतली गेली. तिसरी घटना पुणे जिल्ह्यातील हवेलीजवळील चिखली गावातील. तेथील माणिक उदागे या २२ वर्षांच्या बौद्ध तरुणाने पुढाकार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केल्यामुळे गावातील मराठा समाजातील उच्चवर्णीयांनी विरोध केला व १ मे रोजी चौघांनी दगडांनी ठेचून माणिकचा खून केला. या प्रकरणात आरोपी अटक झाले; परंतु नियमानुसार अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टखाली गुन्हा नोंदला नाही. चौथी घटना विदर्भातील वाशीम तालुक्यातील अडोली गावची. तेथील बौद्धांनी १५ एप्रिल रोजी आंबेडकर जयंतीची मिरवणूक काढली असता त्या मिरवणुकीवर जातीयवादी उच्चवर्णीयांनी दगडफेक केली. ज्यात चार लहान मुलांसह १८ जण जखमी झाले; परंतु पोलिसांनी ना गुन्हा नोंदविला, ना कुणाला अटक केली. विदर्भात गोंदियातील कवलेवाडा येथे १७ मे रोजी संजय खोब्रागडे या ५० वर्षांच्या बौद्ध समाजातील माणसाला जमिनीच्या वादावरून स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी पहाटे घराबाहेर झोपला असताना रॉकेल टाकून जिवंत जाळले, ज्यात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस यंत्रणेवर गृहमंत्र्यांचा अजिबात वचक, धाक नाही. जे गुन्हे नोंदले जातात त्यात योग्य तऱ्हेने साक्षी-पुरावे जमा करण्याचे काम पोलीस यंत्रणा जातीय मानसिकतेतून करीत नाहीत.

सतत फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करणाऱ्या राज्यातील सत्ताधारी पक्षातील मातब्बर नेत्यांच्या जिल्ह्यातच दलितांवर अन्याय-अत्याचार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. याबाबत माध्यमांतून सतत बातम्या प्रसिद्ध होत आहेत. खून, सामूहिक बलात्कार, बहिष्कार, मारहाण अशा घटनांचा समावेश आहे. पुणे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, नांदेड, यवतमाळ, नाशिक, बीड, जळगाव या प्रमुख राज्यकर्त्यांच्या जिल्ह्यातच दलित-आदिवासींवरील अन्याय-अत्याचाराच्या घटना वाढतच जात आहेत. मात्र सरकारी पातळीवर त्याची पुरेशी दखलच घेतली जात नाही. या घटना केवळ नोंदल्या गेलेल्या; पण न नोंदल्या गेलेल्या अनेक घटना धाकदपटशा दाखवून दहशतीने दाबल्या गेलेल्या आहेत, त्याचे काय ? खरी संख्या कितीतरी अधिक असेल ? नुकतीच नांदेड तालुक्यातील बोंढार या गावातील अक्षय भालेराव या बौद्ध तरुणाने गावात भीमजयंती साजरी केली म्हणून गावातील सवर्णसमाजातील काही समाजकंटकांनी त्याच्या पोटात धारदार खंजीर खुपसून त्याचा खून केला. बाजूच्याच लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथे मातंग समाजाच्या व्यक्तीचा अवघ्या तीन हजार रुपयांसाठी संपूर्ण कुटुंबाला बेदम मारहाण करत खून करण्यात आला. या घटनांना समाजमन ढवळून निघत आहे, या घटना कुठेतरी थांबायला हव्यात, नसता उद्रेक अटळ आहे.  दिल्ली बलात्कार प्रकरण, मुंबईतील शक्ती मिल बलात्कार प्रकरणात जसा सहा महिन्यांत निकाल आला, तसाच तो खर्डा, सोनई, बोंढार, रेणापूर यासारख्या राज्यातील अनेक दलित हत्याकांडांत लागायला हवा. तरच खऱ्या अर्थाने बाधितांना न्याय मिळू शकेल. याबरोबरच सरकारने सामाजिक प्रबोधन करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घ्यावेत. जातिअंत व्हावा यासाठी राजकीय पक्षांनी, सरकारने कार्यक्रम राबवले पाहिजेत. अन्याय-अत्याचाराविरोधात तत्कालीन 'दलित पँथर'च्या चळवळीप्रमाणे नव्या रणनीतीसह जातिअंताची लढाई लढण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे. चळवळीचा वचक, दरारा निर्माण केला पाहिजे. दलित समाजातील तरुणांनी पँथरप्रमाणे आता पेटून उठायला हवे.

# पहिले व्यक्तिचित्र: भट्या नागपूरकर!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**गुळाचा गणपती आणि सबकुछ पु.ल. म्हणून गाजलेल्या चित्रपटात पु.ल.देशपांडे यांच्या प्रतिभेच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. ते शिक्षक, लेखक, नट, नकलाकार, गायक, नाटककार, विनोदकार, कवी, पेटीवादक, संगीत दिग्दर्शक, वक्ते आदी होते. त्यांनी एकपात्री-बहुपात्री नाटक, चित्रपट, नभोवाणी, दूरचित्रवाणी अशा सर्व क्षेत्रांत काम केले. अशा हरहुन्नरी व्यक्तिमत्वाची ओळख त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजीं करून देत आहेत. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल.देशपांडे ऊर्फ भाई ऊर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते. त्यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते.**

त्यांच्या आद्याक्षरांवरून महाराष्ट्रात ते पु.ल.म्हणून ओळखले जातात. त्यांचे मराठी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे अनेक किस्से आहेत. त्यांच्यावर मराठीत भाई हा चित्रपट बनला आहे. या चित्रपटाचे दोन भाग आहेत. ते हजरजबाबीही होते, त्यामुळे त्यांची शेकडो वाक्सुमने आणि विनोदी किस्से आहेत. मराठी साहित्य व संगीतातील योगदानाव्यतिरिक्त पुलंचे आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. ते उत्तम संवादिनी वादक होते, तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. पु.ल.देशपांडे यांचा जन्म दि.८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू- सीकेपी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले. त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले आणि नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात ते शिकले. सन १९४०च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. सन १९४६ साली ते सुनीताबाईंशी विवाहबद्ध झाले. लेखक आणि कविवर्य वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी हे त्यांचे आजोबा होते. ते साहित्याचे जाणकार होते. रवीन्द्रनाथ टागोर लिखित गीतांजली हा काव्यसंग्रह त्यांनी अभंग गीतांजली या नावाने मराठीत भाषांतरित केला होता. देशपांडे यांचे वडील हे अडवाणी कागद कंपनीत दीडशे रुपये पगारावर फिरते विक्रेते होते. फिरतीवर असताना जेवणाखाण्याचा भत्ता मिळे. एकदा कोल्हापूरला असताना ते बहिणीकडे जेवले. त्यादिवशी त्यांनी भत्ता घेतला नाही, अशी आठवण पु.ल.देशपांडे यांनी सांगितली. ते लहानपणापासूनच धष्टपुष्ट होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी ते पाच वर्षांच्या मुलाएवढे दिसत होते. ते हुशार होते आणि सतत काही ना काही करत असत. त्यांना स्वस्थ बसण्यासाठी घरचे लोक पैसा देऊ करायचे, पण हे त्यांना जमले नाही. आजोबांनी लिहून दिलेले आणि त्यांनी पाठ केलेले दहा-पंधरा ओळींचे पहिले भाषण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. सात वर्षे अशी भाषणे केल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षापासून ते स्वतःची भाषणे स्वतःच लिहू लागले. ते इतरांनाही भाषणे आणि संवाद लिहून देऊ लागले. त्यांना घरात खुप वाचन करायला व रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत. ते घरीच बाजाची पेटी शिकले. टिळक मंदिरात एकदा बालगंधर्व आले असता त्यांनी पेटी वाजवून दाखवली. बालगंधर्वांनी शाबासकी दिली व भावी कलाजीवनासाठी शुभेच्छा दिल्या. लोकांच्या वागण्यातील विसंगती व हास्यास्पद गोष्टी हेरून ते त्या लोकांच्या नकला करायचे. म्हणून घरी कुणी आले असता पुरुषोत्तम जवळ नसलेलाच बरा, असे आईला वाटत असे. त्यांची आई कारवारी, वडील कोल्हापूरचे आणि बहीण कोकणात दिलेली, त्यामुळे घरात भोजनात विविधता असे. यातूनच ते खाण्याचे शौकीन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते गाण्याच्या, पेटीच्या व अन्य शिकवण्या घेऊ लागले. ते शाळेत असल्यापासूनच भावगीते गायचे आणि गीतांना चाली लावायचे. कॉलेजात असताना त्यांनी राजा बढे यांच्या माझिया माहेरा जा या कवितेला चाल लावली. आज ते गाणे मराठी भावसंगीतातील अनमोल ठेवा समजला जातो. ग.दि. माडगूळकरांनी लिहिलेल्या व भीमसेन जोशींनी गायलेल्या इंद्रायणी काठी या गीताला त्यांनी चाल लावली होती. तेही गाणे अजरामर झाले.

कॉलेजमध्ये असताना पु.ल. गायकांना साथ करीत. ते पेटी वाजवत, त्यांचा भाऊ रमाकांत तबला आणि मधुकर गोळवलकर सारंगी वाजवीत. मिळालेले १५ रुपये तिघेही वाटून घेत. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी झाले. कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात ते काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बीए आणि एमए केले. याच महाविद्यालयात असताना त्यांनी चिंतामण कोल्हटकरांच्या ललित कलाकुंज व नाट्यनिकेतन या नाट्यसंस्थांच्या नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. सन १९३७पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या पैजार या श्रुतिकेत काम केले. सन १९४४ साली त्यांनी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्र भट्या नागपूरकर हे अभिरुची या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. याच दरम्यान त्यांनी सत्यकथामध्ये जिन आणि गंगाकुमारी ही लघुकथा लिहिली. सन २०१४मध्ये प्रकाशित झालेले बटाट्याची चाळ हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. सन १९४८साली त्यांनी तुका म्हणे आता हे नाटक आणि बिचारे सौभद्र हे प्रहसन लिहिले.

दूरदर्शनच्या पहिल्यावाहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरूंची दूरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पुलं हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते.

# भोगवट्याची कहाणी : ' भाकरी आणि कर्म '



डॉ. कैलास रायभान दौंड
संपर्क क्र. ९८५०६०८६११

आधुनिक केसरी

**उमेश मोहिते हे मराठीतील एक सशक्त कथाकार म्हणून सर्वांना परिचित आहेत.त्यांच्या 'जागरण' , 'वळख' , 'निवद ' या कथासंग्रहातील कथा वाचकांना आवडलेल्या आहेत. त्यांच्या 'वळण' आणि 'बांधणूक' या कादंबऱ्या देखील त्यांच्या लेखनशैलीची साक्ष देतात. दर्जेदार अनोखा आशय नि कलात्मक मांडणी हा त्यांच्या लेखनाचा विशेष. आता त्यांचा 'भाकरी आणि कर्म ' हा कथासंग्रह कबनूरच्या तेजश्री प्रकाशन कडून प्रकाशित झाला आहे. या कथासंग्रहात 'भाकरी','घात' ,'पाऊस' ,'स्थापना' आणि 'कर्म' या पाच लघुकथा आहेत.अलीकडील काळात लघुकथा लेखक अत्यल्प असल्याचे दिसते.मोहिते यांनी हा प्रकार अगदी सशक्तपणे हाताळला आहे.**

ही ' भाकरी आणि कर्म ' मधील कथा तपशिल आणि संवाद यामुळे घटना आणि प्रसंगांना साक्षात करून परिणाम साधणारी कथा आहे. या कथांमधून अभावाच्या आणि दुःख भोगाच्या विविध छटा व सुक्ष्म कंगोरे अनुभवायला मिळतात. त्यासोबतच मानवी स्वभाव आणि भावनांचे प्रतिबिंबही अनुभवावयास मिळते.

'भाकरी' ही या कथासंग्रहातील पहिली कथा. गरीब आई वडिलांची मुलगी पारबती हिला तिचे वडील गरीब आहेत म्हणून सासरी कसा त्रास दिला जातो याची ही कथा आहे. जणू गरीब असणे हा त्याचा गुन्हा आहे. त्याला लेकीच्या घरचे कोणी समजूनच घेत नाही. सासू राधाबाई, सासरा वसंतराव यांच्या मतलबी स्वभावामुळे ते पारबतीचा बाप नारायणराव याच्याकडून आपल्याला काही मिळत नाही म्हणून ते तिला त्रास देतात, तिच्याकडून अधिकची कामे करून घेतात , तिला अपमानित करतात. तर उमा या छोट्या सुनेला तिच्या वडिलांकडून दूध, भाजीपाला नियमित मिळतो, अधुनमधून त्यांच्या घरी सामिष पाहुणचार मिळतो. म्हणून तिला लाडाकोडात ठेवतात. पारबतीचा पती परमेश्वर तथा भाऊ तोही आईवडीलांचे ऐकून पत्नी व सासरा यांना समजून न घेता त्रास होईल असे वागतो. हे बऱ्याच घरी दिसणारे प्रातिनिधिक पण प्रभावी चित्रण या कथेत येते. मात्र पारबतीला माहेरी सोडते वेळी त्यांचे लग्न जमणारी गंगा मावशी त्याला समजावते, परिस्थितीची कल्पना देते. गरीबीमुळे सासर्याने घर विकायला काढल्याचे सांगते. त्यालाही ते पटते नि त्याचे मत परिवर्तन होते

'घात' कथेत मानलेले नात्यावर खरे नाते मात करत असल्याचे दाखवणारी कथा आहे. सुवर्णा ही सोपानराव या गरीब शेतकऱ्याची मुलगी; सोपानरावचा झाडावरून पडून पाय अधू झाल्यावर त्याने दुकान टाकलेले. ज्यांची शेती कसतांना झाडावरून सोपानराव पडले ते देशमुख सर सुवर्णाला मुलगी मानतात. तिने ग्रॅज्युएशन आणि बीएड केलेले आहे. देशमुख सर जेथे पदाधिकारी आहेत त्याच संस्थेत तिची मुलाखत असते. देशमुख सर व त्यांची मुलगी माधवी सुवर्णाला नोकरी मिळेलच असे सांगतात. पण प्रत्यक्षात निवड दुसऱ्याच मुलीची होते. ती मुलगी अध्यक्षांनी सुन म्हणून स्विकारलेली असते. अशावेळी देशमुख सर संस्थेच्या आगामी निवडणुकीत पुन्हा पदाधिकारी होता यावे व स्वतःची मुलगी माधवी हिला हक्काने नोकरीला लावता यावे म्हणून सूवर्णाला नोकरीला घेण्याचा आग्रह संस्थाध्यक्षांना करत नाहीत. मानलेल्या नात्याऐवजी खऱ्या नात्याची ते कड घेतात. सूवर्णाला हे ऐकून वाईट वाटणे साहजिकच असते. स्वतःच्या संस्थेत जागा असुनही सरांनी आपल्या मुलीचा अर्ज का केला नसावा ? संस्थाध्यक्षांची भावी सुनबाई अर्ज करणार असल्याची किंवा तिची निवड होणार असल्याची माहिती तर देशमुख सरांना आधीच नसेल ना ? असेही वाटत राहते. 'बेटा प्रत्येक जण शेवटी आपलं बघतो ना ? ' हे वाक्य सरांच्या मूळ स्वभावावर प्रकाश टाकणारे ठरते.

'पाऊस' या कथेतील पाऊस जणू गरीब विधवा सुमित्रेची सत्वपरीक्षा घेण्यासाठीच कोसळतो आहे. तिचा नवरा शिवा वारलेला आहे. बजरंग हा शाळकरी मुलगा व एक छोटी मुलगी अशी तिला अपत्ये आहेत. पावसामुळे तिला कुठेही कामाला जाता येत नाही. घरातील धान्य संपलेले आहे. गावातील जे देण्यासारखे होते त्यांना मागून झालेले आहे. अशा स्थितीत लेकरांची आणि स्वतःची भूक भागवण्यासाठी तिचा संघर्ष तिला हतबलतेच्या पातळीवर आणून ठेवतो. पण ती हरत नाही. दिर असणाऱ्या हणमंताने मदत केली असती पण त्याची पत्नी रंधावनीने संशयाचे भूत घालुन त्याचे घरीजाणे बंद केलेले आहे तर नागुशा सारख्या लोचट माणसाला सुमित्रा हुशारी आणि निश्चयाने कटवते. अशा संकटकाळी हरणामावशी, कोंडामावशी तिला मदतीचा हात देतात. या कथेतील पाऊस प्रतिकात्मक झाला आहे. भोवतीच्या माणसांच्या मनातील विविध प्रकारच्या भावछटा घेऊनच जणू तो कोसळत आहे. एरवी आनंदायी असणारा पाऊस सुमित्रा सारख्यांना किती छळत असतो हे या कथेतून प्रत्ययास येते.

'स्थापना' ही आजच्या गावपातळीवरील राजकारणाची झलक दाखवणारी कथा आहे. आपले राजकिय वर्चस्व अधोरेखित करण्यासाठी यशवंत गावात दरवर्षी बसणारा गणपती आपल्या गल्लीत बसवायचा निश्चय करतो. सर्जेराव आणि त्याचे लोक त्यासाठी तयार होत नाहीत. तेव्हा गावात दोन गणपती बसवले जातात. त्यातुन तणाव निर्माण होतो. प्रारंभी सर्जेरावच्या बाजुने असणारा बबन नातेसंबंधामूळे समंजस भूमिका घेऊन अलिप्त होतो. शेवटी परिस्थितीपुढे सर्जेराव या जुन्या गाव पुढाऱ्याला नमते घ्यावे लागते. एक प्रकारे हा जुन्या नव्याच्या मधला संघर्षही म्हणता येईल. गावा-गावात दिसणाऱ्या अशा संघर्षाचे नेटके चित्र लेखकाने रेखाटले आहे.





'कर्म' या कथेत सटवा या दारूड्या नवऱ्याच्या व्यसनाला वैतागलेल्या गयाच्या जगण्याची तिला रंजिस आणणारी हकिकत आहे. गरीबीमुळे गया रोजंदारीने कष्टाचे काम करते. तिचा मुलगा पंडीत हा ही तिच्या सोबतच कुटूंबाला आधार म्हणून कामाला जातो. सटवाचे व्यसन सुटावे म्हणून ते त्याला पैसे खर्च करून औषध देऊन आणतात पण तो काही व्यसन सोडत नाही. पंडीत व गया यांना सटवाने व्यसन सोडावे असे वाटते पण तो त्याच्या पुरता आहारी गेलेला आहे. एकदा तर गुपचूप घरावरील टिनाचा पत्रा काढून दारू पिण्यासाठी विकायला नेतो. गयाला हे बबीकडून म्हणजे तिच्या मुलीकडून कळते तेव्हा ती त्याला शोधते पण तो सापडत नाही. रात्री त्याचा अपघात होऊन तो सरकारी दवाखान्यात असल्याचा निरोप येतो. त्याच्या बद्दलची प्रेमभावना आणि नात्यातील जबाबदारी याचे पुरते भान असलेली गया त्याला सोबत म्हणून दवाखान्यात जायला निघते. जणू तिचे ते कर्मच आहे. मुलगा पंडीत मात्र आपण दवाखान्यात जाणार नसल्याचे स्पष्ट सांगतो आणि गया नवऱ्याला अधिकचे लागलेले असू नये अशी मनात अपेक्षा धरते. पत्नी म्हणून तिच्या ठाई पतीबद्दल असणारे निरपेक्ष प्रेम कर्म कथेतून दिसते.

'भाकरी आणि कर्म' मधील लघुकथा मराठी लघुकथेकडे वाचकांना आकृष्ट करणारी कथा असल्याचे निश्चितच म्हणता येते. या कथासंग्रहातील पाचही कथेतील स्री व्यक्तीरेखा सोशिक, संयमी, जगणे पुढे रेटणाऱ्या, प्रपंचाचा गाडा जिद्दीने ओढणाऱ्या आहेत. त्यामानाने पुरूष व्यक्तिरेखा परिस्थितीने हतबल झालेल्या, काहीशा नमलेल्या आहेत. भाकरी, घात आणि कर्म या कथामधील पुरूष व्यक्तिरेखा परिस्थितीने दबलेल्या आहेत . 'स्थापना' कथेतील पुरूष व्यक्तिरेखा राजकीय आस्तित्वासाठी संघर्ष करणाऱ्या आहेत , जगण्यातील अडथळ्यांना भिडणाऱ्या आहेत. या कथांचे शेवट खूप परिणामकारक आहेत. भाकरी, घात, पाऊस ,कर्म या कथांचे शेवट स्त्रियांच्या भावनाविवशतेने होतात.

या पाचही कथा ग्रामीण भागाशी निगडीत आहेत. त्यातुन ग्रामीण माणसांची फरफट पहायला मिळते. दारिद्र्य आणि दुःखमय जगण्याचे काही कंगोरे या कथातुन साकारतात. या आजच्या ग्रामीण लघुकथा आहेत. 'स्थापना' या कथेतून गावपातळीवरील राजकारणातून निर्माण झालेल्या संघर्षाची झलक पहायला मिळते. सहज आणि प्रभावी संवाद, वास्तवदर्शी कथनशैली यामुळे या कथा वाचनीय झालेल्या आहेत. त्या वाचकांच्या संवेदनांना निश्चितच हात घालतील याची खात्री आहे. वाचकांनी व्यापक पट घेऊन येणाऱ्या या कथा मुळातूनच वाचने आनंदायी ठरेल. ..

**(कथासंग्रह ) : भाकरी आणि कर्म**
**लेखक : उमेश मोहिते**
**प्रकाशक : तेजश्री प्रकाशन, कोल्हापूर)**
**: मो.७६६६१८६९२८**
**पृष्ठे : १४५ ।मूल्य : २००**
**परीक्षण : डॉ. कैलास रायभान दौंड**
**मु. सोनोशी पो.कोरडगाव**
**ता. पाथर्डी जिल्हा अहमदनगर**
**पिन ४१४१०२ मो.९८५०६०८६११**

# मुख्यमंत्रीजी, उपमुख्यमंत्रीजी.. तुम्ही न येणं बरं नव्हं..



मधुकर भावे

आधुनिक केसरी

**लेखाच्या शिर्षकातील मुख्य मुख्य मुद्यालाच हात घालतो... महाराष्ट्राचे फार मोठे नेते स्व. बाळासाहेब देसाई यांच्या जीवनावरील 'दौलत' या चरित्र गौरवग्रंथ प्रकाशन कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित राहिले नाहीत... हे चांगले झाले नाही. पुस्तक कोणी लिहिले आणि कोणावर लिहिले ही बाब गौण आहे. ज्या पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे महामहीम राज्यपाल करणार आहेत, आणि जो कार्यक्रम मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वीकारलेला आहे... तशा पत्रिकाही छापलेल्या आहेत.... पोस्टर्स लागलेली आहेत... राज्यपाल या कार्यक्रमाला आहेत त्या कार्यक्रमाला हजर राहण्याचे मान्य केल्यावर गैरहजर राहणे हे सर्वस्वी राज्यशिष्टाचाराच्या विरुद्ध आहेच...**

शिवाय घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीने तर हे भान पाळलेच पाहिजे. पुस्तक प्रकाशन कार्यक्रम शासकीय नव्हता हे मान्य, तरीही राज्यपाल शासकीयच आहेत. घटनात्मक आहेत. ते जिथे येतात आणि आपण जो कार्यक्रम स्वीकारतो, त्याला अनुपस्थित राहणे हा राजशिष्टाचाराचा भंगच आहे. शिवाय लोकांना ती गोष्ट अतिशय खटकणारी आहे. बाळासाहेब देसाई हे व्यक्तीमत्त्व महाराष्ट्रासाठी तरी मोठे व्यक्तीमत्त्व आहे. गेल्या ५० वर्षांत या महाराष्ट्रात जी कर्तबगार, आणि प्रभावी नेतेमंडळी मानली गेली त्यात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई हे चार तर ५० वर्षांपूर्वीचे विकासाचे मुख्य चार खांब... प्रमुख नेते. शिवाय राज्याचे आजचे मुख्यमंत्री ज्या जिल्ह्यातले, बाळासाहेबही त्याच जिल्ह्यातील. बाळासाहेब यांच्यामुळे जे कोयना धरण उभे राहिले त्या कोयना धरणाच्या आल्याड बाळासाहेबांचे, गाव आणि पल्याड एकनाथ शिंदे यांचे गाव. हा आणखीन एक भाग वेगळा. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तरी यायला हवे होते. त्यांच्या खासदार सुपूत्राच्या कल्याण-डोंबिवली येथील कार्यक्रमांत ते गुंतले, असे सांगण्यात आले. पण तो कार्यक्रम दोन दिवसांनंतर घेता आला असता. शिवाय मुख्यमंत्र्यांसाठी सायंकाळी ६.३० च्या ऐवजी रात्री ८.३० वाजताच्या वेळेला राज्यपालांनी मान्यता दिली. त्यामुळे तर मुख्यमंत्र्यांनी यायलाच हवे होते. त्यांच्या दिवसभराच्या कार्यक्रमाचे तसे नियोजन त्यांनीच करायला हवे होते. ते आले नाहीत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अमरावतीला निघून गेले.... त्यांचा तिथे कार्यक्रम होता, असे सांगण्यात आले. फडणवीस आले नाहीत, ठीक आहे... उपमुख्यमंत्री पद हे काही घटनात्मक पद नाही. ही राजकीय सोय आहे. शिवाय कदाचित फडणवीस यांना असेही वाटत असेल की, बाळासाहेब त्यावेळच्या काँग्रेसचे मंत्री. महाराष्ट्राची बांधणी करण्यात या मोठ्या नेत्यांचा वाटा आहे.. त्यात बाळासाहेबही अग्रक्रमाने आहेत. पण, फडणवीस यांचे म्हणणेच असे आहे की, '७५ वर्षांत काँग्रेसने काहीच केलेले नाही'. फडणवीस जन्म जरी १९७० चा असला तरी त्यापूर्वीसुद्धा काहीच घडलेले नाही. असे मानणारे ते आहेत. महाराष्ट्रात जे काही घडले ते सगळे २०१४ च्या नंतर घडले. त्यामुळे त्यांच्या लेखी बाळासाहेबांचे महत्व नसेलही... पण महाराष्ट्राला तसे वाटत नाही. त्यामुळे बाळासाहेबांचे नातू शंभूराज देसाई यांनी पुढाकार घेवून आपल्या आजोबांचे पांग फेडले, असा तो कार्यक्रम झाला. बाळासाहेबांचे नाव 'दौलत'.... पुस्तकाचे नाव 'दौलत'.... दौलत या शब्दाचा इंग्रजी अर्थ 'वेल्थ' असा आहे. पण दौलत शब्दाला जे परिमाण आहे, तो दर्जा वेल्थ शब्दाला नाही. ५० वर्षांपूर्वीच्या नेतेमंडळीत महाराष्ट्राची बांधणी करणाऱ्या नेत्यांमध्ये दौलतराव श्रीपतराव देसाई ऊर्फ बाळासाहेब... हे उठून दिसणारेच व्यक्तिमत्त्व होते. यशवंराव चव्हाण असतील... वसंतदादा असतील... बाळासाहेब देसाई असतील... सातारा जिल्ह्यातील या तिन्ही नेत्यांनी लहाणपणापासून दारिद्र्य... कष्ट... या सगळ्याचा सामना करून आपले मोठेपण सिद्ध केले आहे. बाळासाहेब हे १२ वर्षांचे असताना कोल्हापूरच्या एका दवाखान्याची साफसफाई करून महिना १० रुपये मिळवत होते आणि आपले शिक्षण करीत होते. अगदी लोकल बोर्डाच्या अध्यक्षापासून ( १९४१ ) ते १९८३ पर्यंत मंत्री म्हणून बांधकाम, शिक्षण, कृषी, गृह, महसूल आणि विधानसभा अध्यक्ष या प्रत्येक पदावरून बाळासाहेबांचा ठसा उमटला नाही, असे झाले नाही. शिवाय एक दरारा असलेले व्यक्तीमत्त्व ही त्यांची महाराष्ट्रातील ओळख. नंतर कुणालाही मिळाली नाही. मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराजांचे अभिमानाचे दोन पुतळे लोकवर्गणीतून उभे केलेले हा लोकनेता. असे हे बाळासाहेब. खरं म्हणजे त्यांची जन्मशताब्दी २०१० साली राज्य सरकारने शासकीय इतमामात करायला हवी होती. अशोक चव्हाण तेंव्हा मुख्यमंत्री होते. १० मार्च २०१० ला ही जन्मशताब्दी होती. आणि १ मे २०१० ला महाराष्ट्र राज्याला ५० वर्ष पूर्ण झाली होती. तोही कार्यक्रम दणकेबाज व्हायला हवा होता... पण शताब्दीही अधिकृतपणे साजरी झाली नाही... आणि सुवर्ण महोत्सवी राज्यगौरव कार्यक्रमही कसा झाला, हे आज कोणाला आठवतही नाही. जे झाले ते झाले... बाळासाहेबांच्या वाट्याला राजकीय उपेक्षा अनेकवेळा आली होती. त्यातून त्यांना नैराश्यही आले होते. पण तरीही त्यांचे मोठेपण महाराष्ट्राला अमान्य करता येत नाही, येणार नाही.



या गौरवग्रंथ कार्यक्रमाला महाराष्ट्राचे २३ वे राज्यपाल श्री. रमेशजी बैस हे ८.३० वाजताच्या रात्रीच्या कार्यक्रमाला आले. पूर्ण तासभराचा कार्यक्रम त्यांनी स्वीकारला. त्यांची मराठी भाषेची थोडी अडचण आहे तरीही बाळासाहेबांची पूर्ण माहिती मिळवून त्यांच्या भाषणात त्यांनी उद्याच्या पिढीला 'बाळासाहेब कसे आदर्श आहेत', याचे नेमक्या शब्दांत आणि प्रभावी हिंदीत वर्णन केले. महाराष्ट्राचा गौरव करताना त्यांनी शब्दांत कुठेही कमतरता ठेवली नाही. मागचे राज्यपाल आणि हे राज्यपाल यातील फरक १० मिनीटांच्या भाषणात समजून आला. श्री. बाळासाहेब देसाई सलग सहावेळा पाटण मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आणि १९६७ ला बिनविरोध निवडून गेले. असे सलग सातवेळा ते आमदार होते. ज्यांच्या हस्ते गौरवग्रंथाचे प्रकाशन झाले ते माननीय राज्यपाल महोदय रमेशसाहेब १९९६ पासून १६ व्या लोकसभेपर्यंत सलग सात वेळा रायपूर मतदारसंघातून लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले. बाळासाहेब मंत्री होते... रमेश बैस साहेबही अटलबिहारी वाजपेयी साहेबांच्या मंत्रीमंडळात केंद्रात मंत्री होते. सूचना प्रसारण, पर्यावरण, वने अशी मोठी खाती त्यांनी प्रभावीपणे सांभाळली. लोकसभेच्या लोकलेखा समितीचेही ते अध्यक्ष होते. झारखंड आणि त्रिपुराचे राज्यपालही होते.... असे हे भारदस्त व्यक्तीमत्त्व सातवेळा खासदार, त्यांच्या हातून सात वेळा आमदार असलेल्या बाळासाहेबांच्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन होणे हा ही एक योगायोग...

आणखी एक निरिक्षण महत्त्वाचे आहे. राज्यपालांचे मी अनेक कार्यक्रम पाहिले आहेत. कार्यक्रम संपल्यानंतर लगेच राष्ट्रगीत होते आणि राज्यपाल उजव्या बाजूला वळून व्यासपीठ पायउतार होतात.... तिथपर्यंत श्रोत्यांमध्ये कोणीही जागा सोडायची नसते. त्या पदाचा सन्मान करण्यासाठी हे नियम फार प्रभावी वाटतात. पण या राज्यपालांनी राष्ट्रगीत झाल्याबरोबर व्यासपीठावरील सर्वांशी हस्तांदोलन केले.... गौरवग्रंथ उत्तम झाला, ही भावना व्यक्त केली. एवढेच नव्हे तर 'फुरसतसे मिलने को आ जाईए' असे आमंत्रणही सर्वांना दिले. महाराष्ट्राला एक भारदस्त राज्यपाल मिळाल्याची जाणीव फार थोड्या वेळाच्या कार्यक्रमात झाली. उच्च विद्याविभूषित राज्यपाल सयंमी, शांत आणि बुद्धीमान आहेत. त्याचीही झलक दिसून आली.

या समारंभाच्या निमित्ताने शंभूराज देसाई यांच्या कळकळीबद्दलही लिहिले पाहिजे. ते आता मंत्री आहेत... पण ते कोणत्या पदावरही नव्हते तेव्हाही म्हणजे १९८३ नंतर बाळासाहेबांच्या प्रत्येक स्मृतिदिनाला त्यांनी मरळी येथे दिवसभर कार्यक्रम केले नाहीत, असे एकही वर्ष नाही. पदावर असो नसो... आपल्या आजोबांच्या कर्तृत्वाची ही कृतज्ञाता भावना अलिकडच्या काळात किती नातवंड जपत असतील! शिवाय मंत्रीपदाची संधी मिळाल्यावर आपल्या आजोबांचे ज्या पद्धतीने मरळी येथे स्मारक उभे केले त्यातील ग्रंथालय... विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, संगणकीय शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी सर्व तरतूद... छान सभागृह... आणि आपल्या आजोबांची शासकीय पातळीवर जन्मशताब्दी झाली नाही याची सल मनात ठेवून, १३ वर्षांनंतर ती सगळी कसर शंभूराज यांनी भरून काढली. असे पदोपदी जाणवत होते. या खानदानी घराण्याशी माझा ६० वर्षे संबंध आहे. आणि त्यामुळे त्या संपूर्ण कार्यक्रमात ६० वर्षांपूर्वीचे बाळासाहेब त्यांचा तो दरारा... त्यांचे चालणे.. बोलणे... मनातून असलेला प्रेमळपणा... सगळे काही आठवत होते... या गौरवग्रंथामुळे एक चांगले काम करता आले, याचा आनंद आहे. मात्र, राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन होणाऱ्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्र्यांनी कार्यक्रम स्वीकारूनसुद्धा न येणे हे काही चांगले झाले नाही. तरी बरं... विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर आले आणि बाळासाहेब जसे निर्णय घेत होते, तसा निर्णय घेईन, असे सूचकपणे बोलले. त्यांच्या या वाक्याला खूप टाळ्या पडल्या... हश्या उसळला. संदर्भही समजला... नार्वेकरजी, तुम्हालाही राजकीय परंपरा आहे. तुम्ही रामराजे निंबाळकर यांचे जावई. रामराजे यांचे आजोबा मालोजीराव नाईक-निंबाळकर हे कोयना धरणाच्या सुरुवातीचे बांधकाम मंत्री. बाळासाहेबांचे मित्र. तुम्ही समारंभाला ऐनवेळी येणे आणि त्याचा आनंद घेणे, हा ही योगायोग... फक्त सांगणे एकच. 'बाळासाहेब तडाकून निर्णय करायचे...' तुम्ही तसा निर्णय कराल.... पण, बाळासाहेब निर्णय करायला वेळ घेत नव्हते. एवढेही लक्षात असू द्या....'

सध्या एवढेच...

# कृष्ण मनोगत: भावस्पर्शी कादंबरी



सुलेखा जक्कल
संपर्क क्र. ९२७००६४७२९


आधुनिक केसरी

**खरं सांगायचं तर, माझी कृष्णाविषयीची कुतुहलाची तृष्णा कधी भागलीच नव्हती. आजवर कृष्णाविषयी मिळेल ते वाचत गेले, परंतु तो पुरता कधी आकळलाच नव्हता. मैत्रेय स्वामीजींनी लिहिलेली सहाशे बहात्तर पानांची 'कृष्ण मनोगत' ही महा-कादंबरी हातात आली. जणू एका तहानेल्या माणसासमोर काठोकाठ भरून ठेवलेला घटच होता. मी त्या घटातलं पाणी आधाशासारखं घटाघटा कधी पिऊन संपवलं ते कळलंच नाही. ही प्रदीर्घ कादंबरी नुकतीच वाचून संपवली. साक्षात कृष्णाच्या सोबत इतक्या दिवसापासून असलेला सहवास संपुष्टात आला अशी एक अनामिक हुरहूर माझ्या कृष्णवेड्या मनाला लागून राहिली होती. पण कृष्ण सहवास कधीच संपत नसतो.**

तो मनामनात व्यापून राहतो हे आताशी जाणवायला लागले आहे त्याचे श्रेय या कादंबरीला आहे. महाभारताचं युद्ध सुरू असताना संजय दूरचित्रवाणीवर पाहून धृतराष्ट्राला तटस्थपणे चतुर्वैसत्यम घटनाक्रम सांगत होता. इथे कृष्ण मनोगत या कादंबरीच्या माध्यमातून मैत्रेय स्वामीजी आपल्याला थेट कृष्णाची गाठ घालून देतात आणि त्यानंतर वाचक आणि कृष्ण दोघेच उरतात. कृष्ण आपला जीवनपट उलगडून सांगत असतो. साक्षात कृष्ण आपल्याला त्याच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तिची भेट घडवून देतो आणि प्रत्येक प्रसंगात आपण दर्शक म्हणून एका कोपऱ्यात राहून सगळं बघत असतो आणि ऐकत असतो. लेखकाचे स्वतःचे असे कुठलेही कसलेही भाष्य नाही. लेखक आहेत हे जाणवण्यासाठी अधूनमधून कृष्णाच्या संवादातील काही वाक्ये मात्र ठळक अक्षरात उमटत जातात एवढेच. विराट रूप कृष्ण व्यक्तिरेखेची व्याप्तीच इतकी अगाध आणि असीम आहे की तो एका कादंबरीत मावणारच नाही. कितीही लिहिले तरी तो अगम्य, गूढ, घननीळा, लडिवाळ कृष्ण अंगुळभर उरतोच. परंतु मैत्रेय स्वामीजींनी मात्र ह्या भावस्पर्शी कादंबरीत मात्र सारं काही एकवटण्याचा ठायी ठायी प्रयत्न केलेला दिसून येतो. कृष्ण कन्हैयाचा जन्मापासूनच सुरू झालेला चित्तथरारक, रोमहर्षक प्रवास आपल्या समोर उलगडत जातो, गोकुळातील विविध प्रसंग, कौरव पांडवात समेट घडवून आणण्यासाठी त्याची मध्यस्थाची भूमिका, महाभारतातील युद्ध प्रसंग, अर्जुनाला सांगितलेली भगवद्गीता, अखेरच्या प्रवासात उद्धवाला सांगितलेली गीता असे कित्येक प्रसंग आपल्यासमोर जिवंत उभे करण्यात स्वामीजी पूर्णपणे यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल. कृष्णाची भाष्य जीवनसूत्रे, त्याने सांगितलेला कर्मयोग, कर्ताभाव समर्पण, परमात्म्याला जाणण्यासाठी आवश्यक असणारे प्रेम, भक्ती आणि ध्यानमार्गाचे मार्गदर्शन, सहज योगाचे सखोल दिशादर्शन ते अतिशय सहजतेने कुठलाही धीरगंभीर आव न आणता आपल्यापुढे मांडत जातात. शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहांची अखेर... युद्धातील रक्तरंजित हानी... चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यूची शौर्य गाथा, अर्जुन आणि जयद्रथ यांच्यातील युद्ध, शेवटच्या श्वासापर्यंत दुर्योधनाशी असलेला मैत्र जपणारा दानवीर शूर कर्ण, हे सारे काही प्रसंग आपल्या नजरेसमोर घडत आहेत असे वाटण्याइतके जिवंत उभे झालेले आहेत. कर्ण, अर्जुन, दुर्योधन, पितामह भीष्म, गुरु द्रोण, अश्वत्थामा, द्रौपदी, माता कुंती ह्या सगळ्याच व्यक्तिरेखा आपल्याला भेटतात आणि आपली व्यथा सांगतात. त्यांची सुखदुःखे काळजाला भिडतात. स्वामीजींनी या कादंबरीत प्रत्येक व्यक्तिरेखेला उचित न्याय दिला आहे.

मी लहानपणी कॅलिडोस्कोपच्या नळीत एखादा काचेचा तुकडा टाकून ती नळी हळूहळू फिरवत रंग आणि आकार सतत बदलत असताना निरनिराळी जटिल प्रतिबिंबे पाहताना हरखून जायचे. इथेही कृष्ण तोच, परंतु त्याचा जीवनपट पाहताना सतत बदलत जाणारी अनेक विविधरंगी व्यक्तिमत्वांची प्रतिबिंबं ह्या पुस्तकातून आपल्या नजरेसमोर फिरत असतात. कृष्णाचे प्रत्येकाशी स्नेहबंध वेगळे असले तरी तेवढेच मनमोहक आणि वेधक वाटणारे आहेत. किंबहुना कृष्णाच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तिरेखेला कृष्णामुळेच महत्व लाभले असे म्हणता येईल. कृष्ण आणि बलराम, कृष्ण आणि सुदामा, कृष्ण आणि अर्जुन, कृष्ण आणि कर्ण, कृष्ण आणि सखी द्रौपदी, कृष्ण आणि रुक्मिणी, कृष्ण आणि राधा, कृष्ण आणि उद्धव अशा अनेकांशी कृष्णाचे स्नेहबंधच इतके उत्कट होते की त्यातील कृष्ण हे नाव आपण विलग करूच शकत नाही. किंबहुना त्यांचे कृष्णाशी असलेल्या स्नेहबंधामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वांना एक वेगळीच झळाळी लाभली आहे, हे या कादंबरीतील विविध प्रसंग वाचताना प्रकर्षाने जाणवत राहते.

आजवर भगवद्गीतेवर अनेक भाष्य ग्रंथ लिहिले गेले आहेत. मला या कादंबरीतील अखेरचे उद्धव पर्व मात्र फारच लोभसवाणे वाटले. उद्धवाच्या असंख्य प्रश्नांना योगेश्वर कृष्णांनी दिलेली सहज सोपी उत्तरे पाहून अचंबित व्हायला होते. कृष्णाच्या जीवनाचं सुंदर, वेधक आणि देखणं रूप आणि कृष्णाची समग्र जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आपल्याला पानोपानी जाणवत राहते. भगवद्गीतेत कृष्णाने सांगितलेली गहन, गंभीर वचने स्वामीजी मात्र वाचकांसमोर अतिशय हळुवारपणे सहज सुंदर, मनभावन शब्दांतून मांडत जातात, त्यातूनच सिद्धहस्त लेखणीचा प्रत्यय जाणवायला लागतो.




कृष्णाचे मृदू तसेच प्रसंगी न्यायासाठी लढताना कठोर होणारे स्वभावविशेष, सत्याचा जय होण्यासाठी वेळप्रसंगी तत्वांना मुरड घालणारा कृष्ण, इतरांच्या सुखदुःखात समरस होणारा, प्रत्येकाची बाजू, मनोव्यथा आत्मीयतेने समजून घेणारा, अनुकूल आणि प्रतिकूल निर्णयांचा समान सन्मान करणारा, अनेक मान मिरविणारा, अनेक अपमान रिचवणारा असा कृष्ण आणि त्या युगंधर कृष्णाचे वास्तवदर्शी विविध पैलूंचे सूक्ष्म चित्रण करताना लेखकाच्या भावकोमल लेखनशैलीचा खरा कस लागतो. अंतिम समयी जेव्हा जराकडून विषारी बाण कृष्णाच्या पायात रुततो आणि विष हळूहळू भिनत जाते, त्या क्षणीही उद्धवाच्या शंकांचे निरसन करतो. अतिशय शांतपणे, स्थिर चित्ताने मृत्यूचा अनुभव घेत, त्या क्षणाचासुद्धा महोत्सव करणारा आणि ज्या सहजतेने तो अंतिम क्षणी मृत्यूला आलिंगन देतो तो योगेश्वर अलौकिकच म्हणायला हवा. आपल्या मृत्यूनंतर, जरास कुणाकडूनही कसलाही त्रास होणार नाही याची काळजी घेणारा विशाल हृदयी कृष्ण जाता जाता क्षमाशीलतेचं संस्कार भिनवत जातो, हे सारं मुळातूनच वाचायला हवे.

मैत्रेय स्वामीजींची जीवनशैली, त्यांचे कृष्णप्रेम, कृष्णगुणांची तादात्म्यता, त्यांची वैयक्तिक आध्यात्मिक साधना ह्यामुळेच स्वामींजीनी ही कादंबरी इतक्या साक्षीभावानं लिहिली असावी. त्यांच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष प्रसंग घडत असावेत असे वाटत राहते. स्वामीजींच्या भाषेत एक अनामिक गोडवा आणि लालित्य अवतरलेले आहे. कादंबरीतील प्रत्येक प्रसंग, घटना अशा काही शब्दबद्ध केलेल्या आहेत की वाचक त्या काळाचा, कथानकाचा, प्रसंगाचाच एक भाग, घटक होऊन समरसून जातो. स्वामीजींचे प्रसंग खुलवण्याचे कसब आणि लालित्य कौतुकास्पद आहे. जणू परकाया प्रवेश केलेल्या स्वामीजींच्या लेखणीतून हे कथ्य उतरले असावे इतके भावस्पर्शी जिवंत चित्रण झाले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही. कादंबरी वाचून पूर्ण होतांना असे जाणवत राहते की स्वामीजी वाचकाच्या मनांत नकळत, कृष्णाची जीवनमूल्यांची बीजं सहजपणे रुजवून जातात. वाचक कृष्णमय होऊन, कृष्णाच्या रंगात पुरता न्हाऊन जातो ह्यातच कादंबरीचे यश दडलेले आहे. या कादंबरीतील नेमके कुठले प्रसंग अधिक भावपूर्ण उतरले आहेत, हे या समीक्षणात शब्दमर्यादेमुळे मांडता येणे अशक्य आहे. 'गागर में सागर' भरण्याइतकी माझी कुवत नाही हे मी जाणून आहे. जागोजागी कृष्णाने केलेली भाष्ये, चिंतन हे सारं कथन करायला, मांडायला माझं शब्द सामर्थ्य अपूर्ण आहे याची मला जाण आहे. वाचकांनी स्वतः वाचूनच त्याचा आस्वाद घ्यावा. तृप्तीच्या आनंदात डुबकी घ्यावी, इतके ते प्रवाही झालेलं आहे. संपूर्ण कादंबरीभर सात्विकता, पावित्र्य आणि भक्तिभाव ओसंडून वाहताना जाणवतात.

आजच्या काळात इतकी प्रदीर्घ कादंबरी प्रकाशित करणाऱ्या अनमोल प्रकाशन कौतुकास पात्र आहेत. अर्थात लेखकाचे उच्च दर्जाचे समृद्ध लेखन ऐवज पाहूनच ह्या कादंबरीचे प्रकाशन करण्याची जबाबदारी घेतली आहे असे म्हणता येईल. कृष्णावर लिहिलेली ही कादंबरी जगभरातील वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करेल ह्यात शंका नाही.

**कादंबरी: कृष्ण मनोगत**
**लेखक: मैत्रेय स्वामी**
**प्रकाशन: अनमोल प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ संख्या: ६७२ मूल्य: रू. ७००/-**

# न कळलेली सावित्रीआई फुले...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**आजचा लेखाचा शीर्षक वाचून आपल्याला प्रश्न पडला असेल की,आज क्रांतिज्योती सावित्रीआई ची जयंती नाही आणि स्मृतिदिन सुध्दा नाही मग या विषयावर का बरं लेख लिहिले असावे. आपले म्हणने साहाजिकच आहे कारण प्रत्येकांचे वेगवेगळे विचार असतात त्या विचारांना आपण रोखू शकत नाही. असो, क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या वर लिखाण करण्यासाठी कोणतेही मुहूर्त बघण्याची गरज नाही कारण त्या मातेने समाजकार्य करण्यासाठी व याच समाजातील व देशातील मुलींना व महिलांना शिक्षण देण्यासाठी त्यांच्या विकासासाठी कोणतेही मुहूर्त बघितले नाही तर रात्रंदिवस चंदनासारखे झिजून संपूर्ण आयुष्य पणाला लावले त्या महान मातेला आपण कसे विसरू शकतो. ..?**

त्यांच्यावर लिहिण्यासाठी किंवा त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून चालण्यासाठी मुहूर्त बघण्याची गरज नाही तर..आधी त्यांना वाचणे अंत्यत गरजेचे आहे त्यासाठी एकदा स्वतः मध्ये शोधून बघण्याचा प्रयत्न करायला पाहिजे की,आज आपण इथे आहोत ते नेमकं कोणामुळे. ..? कोणाच्या त्यागामुळे,कोणाच्या शिकवणीमुळे, कोणाच्या कष्टामुळे आज जेव्हा मोठ्या, मोठ्या उंच पदावर निवड नेमकी झाली ती कोणामुळे व सुखाने दोन घास खायला मिळत आहे जगात मिळणारा एवढा मोठा मानसन्मान कोणामुळे मिळत आहे स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार कोणामुळे मिळत आहे,पुरुषांच्या खांद्याला, खांदा लावून जगण्याचा अधिकार कोणामुळे मिळत आहे, उंच शिखरावर कोणामुळे, पोहचायला मिळत आहे, रंगारंगाचे पुरस्कार कोणामुळे मिळत आहेत,ओळख कोणामुळे मिळाली आहे अशा अनेक गोष्टी आहेत या सर्व कोणामुळे मिळाल्या आहेत आणि दररोज मिळत आहेत याविषयी एकदा वेळात, वेळ काढून प्रत्येक महिलांनी तसेच पुरूषांनी सुद्धा विचार करायला पाहिजे.

क्रांतिज्योती सावित्रीआई फुले अशा सहज कळणार नाही तर आधी त्यांना वाचणे गरजेचे आहे पण,आपण काय करतो त्यांची जयंती किंवा स्मृतीदिन असले की, मात्र आठवण करत असतो आणि वर्षभर त्यांना विसरून जातो त्या जर..आम्हाला असेच विसरले असते,किंवा आम्हां सर्वाचा विचार केले नसते तर आज आपण कुठे असतो. ..? याचा कोणी विचार करावे...?

पुन्हा एक गोष्ट ती म्हणजेच महिलांच्या विषयी बोलायला गेले तर आज दररोज महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, मानसिक त्रास, हुंडाबळी, हिंसा, वाईट कृत्य, अपमान, तसेच अनेक घटना घडताना दिसत आहेत हे कोणापासूनही



लपलेले नाही मग महिलांच्या विषयी एवढे सारे होताना पाहून महिला वर्ग का म्हणून तिच्या मदतीसाठी किंवा तिला न्याय मिळवून देण्यासाठी पुढे होत नाही. ती स्वतः अभिमानाने म्हणत असते की, मी सावित्रीआई ची लेक आहे मग तिच्या लेकीवर असे प्रसंग घडून येतांना दिसतात तेव्हा ती जागी का होत नाही. . ? त्या एका काळी महिलांवर अन्याय होत होते चूल आणि मुल याच्यात ती जगत होती आणि निमूटपणे सर्व सहन करत होती हेच तिचे दुःखी जीवन बघून तिचा उध्दार करण्यासाठी त्या मातेने आपल्या अंगावर दगड,गोटे,चिखल, शिव्या, निंदा घेतले आणि आज त्याच मातेच्या संघर्षातून आजची महिला सुशिक्षित झाली आणि बघा ती जगते तरी कशी तेवढ्या महान मातेची लेक असून सुद्धा प्रसिद्धी कमविण्यासाठी स्वतः चा स्वाभिमान सुद्धा विकायला मागे, पुढे बघत नाही, एवढेच नाही तर महिलेची वैरीण बनून तिला बदनाम करण्यासाठी संधी सोडत नाही, स्वतः सुशिक्षीत असतांना सुद्धा आजही चूल आणि मुल सांभाळून नवऱ्याच्या येणाऱ्या पगारावर मज्जा करून आपल्या मोहल्यात खंडिभर महिला जमवून दिवस रात्र इतरांच्या निंदा करणे,मौजमज्जा करणे व इतर काही गोष्टी करण्यासाठी वेळ काढत असते खरंच अशी वागणून व व्यर्थ विचार करण्यासाठी त्या मातेने ह्या महिलांना शिक्षण दिले होते का... ?


आज बघायला गेले तर..आपण नेहमीच पुरूषांना दोष देत फिरत असतो की,पुरुषांनी महिलेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे पण, आपण स्वतः मध्ये किती बदल करतो. . ? हातात मुठभर पैसे असून सुद्धा अंगभर कपडे घालत नाही, नीट वागणूक नाही, हा सर्वात मोठा अपमान सावित्रीआईचा आहे कारण सावित्री आईने आपली भारतीय संस्कृती टिकवून ठेवली होती आज काहीच राहिले नाही. अशा बऱ्याच गोष्टी आहेत की, या महिलांमुळे सावित्रीआई चा अपमान होत आहे. त्यात पुन्हा एक गोष्ट ती म्हणजेच की,आजची महिला दररोज असे अनेक सन्मान मिळवते तेही सावित्री आईच्या त्यागामुळे पण एवढे वर्ष होऊन सुद्धा सावित्रीआई ला व महात्मा ज्योतिबा फुलेंना अजूनही सर्वोच्च असलेला भारतरत्न पुरस्कार मिळाला नाही यासाठी का बरं ती पुढे होत नाही. .. ? म्हणजे कुठेतरी ती,स्वार्थी होऊन जगत आहे म्हणूनच तर पाऊल उचलू शकत नाही. सावित्री आईनी या महिलांना असल्या प्रकारचे जीवन जगण्यासाठी संघर्ष केला नाही तर..प्रत्येक महिला संक्षम बणली पाहिजे,धैर्यवान बणली पाहिजे, हिंमतीने जगली पाहिजे, समाजासाठी कार्य केली पाहिजे व एक नारीशक्ती बणून आपली ताकत जगाला दाखवली पाहिजे पुन्हा बरच काही यासाठी त्या माऊलीने संपूर्ण आयुष्य पणाला लावले पण आजचई ही महिला मात्र सर्वच विसरून गेली आहे आज प्रत्येक महिलांनी जर..सावित्रीआईला वाचले असते तर पूर्णपणे सावित्रीआई कळली असती पण,शोकांतिका म्हणावे लागेल की, आजच्या सुशिक्षित असलेल्या महिलांना अजूनही न कळलेल्या सावित्रीआई फुले आहेत हेच फार मोठे दुर्दैव आहे.

# आचरणात आणण्यासारखे काही

आधुनिक केसरी

माणसाच्या जीवनात तडजोड ही आवश्यकच असते. किंबहुना,तो कोणत्याही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे असं म्हटलं तरी ते वावगं होणार नाही. गरीब असो की श्रीमंत असो, तरुण तरुणी असो, अथवा तरुण विवाहित जोडपं असो की प्रौढ विवाहित स्त्री, पुरुष असो. प्रत्येकाला त्यांच्या जीवनात व संसारात तडजोड ही करावीच लागते. त्याशिवाय, कोणीही जीवन व्यवस्थित जगूच शकत नाही. कौटुंबिक नात्यात एकमेकांचे स्वभाव समजून घेऊन जगता आले पाहिजे. तरच, त्यांच्या जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. म्हणून, एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये लोक आनंदाने जगू शकत होते. प्रत्येकाने आपल्या स्वभावाला थोडी मुरड घातलीच पाहिजे, म्हणजे, संसार सुखाचा होण्यास मदत होते. विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये पूर्वी आई वडील,मुलगा व सून आणि त्यांची मुले एकत्र राहात होती. आता, नवीन पध्दतीमध्ये पती पत्नी व त्यांची मुले एकत्र राहण्याची नवीन पध्दत रुढ होते आहे. कुटुंब पद्धतीचा अशाप्रकारे -हास होत चालला आहे. माणसा माणसातील आपलेपणाचा व प्रेमाचा व भावनांचाही -हास होत चालला आहे. कौटुंबिक व सामाजिक सुरक्षित अस्तित्वाच्या दृष्टीने ही फार गंभीर बाब आहे. वेळीच याचा कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर उत्तम प्रबोधनात्मक विचार होऊन त्यावर योग्य ती अंमलबजावणीही झाली पाहिजे. मुख्य म्हणजे जगात भारताची कुटुंब पद्धती सर्वश्रेष्ठ मानली जाते. याच देशात आज ही वेगळी पध्दती रुढ होत आहे. हा या देशातील हजारो वर्षांपासून चालत आलेल्या कुटुंब पद्धतीचा -हास होत चालला आहे हेच दिसून येते.या पध्दतीला वेळीच आवर घातला नाही तर, भारताच्या कुटुंब पद्धतीची अवस्था इतरदेशांप्रमाणे होईल. याची सर्व भारतीयांनी गंभीरपणे व आत्मियतेने नोंद घेणे अत्यावश्यक आहे. ही या काळाची गरज आहे.सर्वांमध्ये एकात्मता आवश्यक आहे.

मधुकर ए. निलेगावकर



## निसर्गाची जीवनशाळा

उन! स्वभाव बदलूनही आपला
देते सावलीलाही निज जागा
सोडणार कधी माणसा,
स्वार्थाला होऊनि जागा!

दे दूज्यांना जागा
देतो निसर्ग शिकवण तुजला
वेळ नाही तुज सुज्ञान घ्याया
अर्थ आयुष्याचा तुज नाही कळला
नशीब लागते रे! संतसंग लाभाया

सोड! जीवनाची रीत ही वेगळी
मोदाविण त्यात नसतो अर्थ काही
हसण्या हसविण्याची गोडी आगळी
यावीण,जीवनी अन्य दूजे नको काही

सुंदर आहे खूप ही निसर्गाची शाळा!
इथेच मिळतो आयुष्याचा मार्ग भला
नसे कुणी कुणापासून अन्य आगळा!
फुलते इथेच माणसांची जीवनशाळा!
काव्यरचना : मधुकर ए. निलेगावकर
९४२१३७५६९१



## श्री गणेशाय नमः

ॐ श्रीगजाननाश्री लंबोदरा
श्रीविनायका
आस तुझीया दर्शनाची ही लागली
सारे नभ समस्त जीवसृष्टी ही न्यारी
जयघोषात आता मग्नहोऊ लागली

हरवते दुःखचिंता व्यथा मनाची
अशी आम्हासओढ हीभेटीची
भक्तीही भोळ्या भक्तांची अशी
कीर्तनअंतर्मनी चाले तुझ्या नामाची

कर्म कार्य करीता सर्व
तुझा ध्यासहा सदैव राहो
भक्तांवरीतुझी कृपाही,
अशी निरंतरपाठीशी राहो

साथ तुझी प्रवासांत आयुष्याच्या
मोलाची अशी आम्हास लाभलेली
पाऊलवाटकाट्यांची ती खडतरजणू
वाटते ही आम्हास तूच
फुलांनीमाखलेली

-तुषार लाखे.
वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

## वसंत पंचमी

वसंत पंचमी येते तेव्हा
पूजन मी करते
सरस्वती पूजन मी करते
संगीतातून प्रकटे वाणी
स्वानंदनी मी स्फुरते ।।१ ।।

एकहाती विना वाजे
मुखातून स्वर दे
मयुरावरती होऊन स्वार
वृक्ष लता वरदे
देवी पूजन मी करते ।।२ ।।

सृष्टी रचैता ब्रह्मदेव जव
मनुष्य रचना करी
निर्जन भासे धरती तेव्हा
प्रकटे मयुरा वर स्वारी
बागेश्वरी भगवती शारदे
तुजला मी नमीते.
देवी पूजन मी करते ।।३ ।।

कमंडलूतील जल
पडता धरेवर
पृथ्वी कंपन झाले
अद्‌भुत शक्ती चतुर्भुज तव
सुंदर रुप प्रकटले
विद्या बुद्धी सुलक्षणी तू
सरस्वती तुझ स्मरते
देवी पूजन मी करते ।।४ ।।

सौ. शशिकला गुंजाळ वांगी
बु.भुम, मो.९१३०२७२२१६



## कोणी कोणाचे नाही

कोणी, कोणाचे दिसत नाही
आपुलकी, स्नेह, प्रेम नाही
स्वार्थी झाले सगळे इथे
माणुसकी मुळीच दिसत नाही

कोणी, कोणाचे दिसत नाही
मदत करणारे फार कमी
धोका देणारे वाढले जास्त
कुठे गेली ती गोड वानी

कोणी, कोणाचे दिसत नाही
कोणी, कोणाचा विचार करत नाही
निंदा, चुगली वाढली जोरात
तरीही म्हणतात आम्ही आहोत गुणी

कोणी,कोणाचे दिसत नाही
मुलाला मायबापाची कदर नाही
वृधाश्रमात नेवून सोडले तरी
म्हणतात मी काहीच केलं नाही

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## कशा माणसांना जपावे ?

आवड ज्यांना आपली
अशांसोबत सदा रमावे...
सुख-दुःख वाटूनी घेती
अशा माणसांना जपावे...

हे मन जिथे हलके होती
अशांजवळ व्यक्त व्हावे...
अबोल भाव जे वाचती
अशा माणसांना जपावे...

डोळ्यात ज्यांच्या आदर
तयांची कदर करावे...
आधार बनूनी उभे राहती
अशा माणसांना जपावे...

जाणीव ज्यांना आपली
भेटीस उत्सुक असावे...
निष्पाप स्पर्श करती
अशा माणसांना जपावे...

आनंदी चेहरा पाहण्यास
नेहमी नेहमी तया भेटावे...
कुशीत ज्यांच्या स्वर्गसुख लाभती
अशा माणसांना जपावे...
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

## आज वावरात माझ्या

आज वावरात माझ्या
जरी मिरुग महिना
झळा दुष्काळी अजून
नाही सरता सरेना ..

भर उन्हात तापून
गेला ढेकूळ थकून
वर आभाळी मेघाची
नाही कुठे खाणाखुण..

कसे दिस मिरगाचे
असे कोरडेच आले
वारे भयाण शिवारी
फिरू एकटे लागले..

ऋतू मोसमी कुठेही
नाही दिसत नावाला
इथं वैशाख वणवा
जाळू शिवार लागला..

गंध मातीला अजून
पावसाचा रे येईना
अन्नदाती काळी माय
उपाशीच पाण्याविना..

ज्ञानेश्वर गायके.खामगाव
कन्नड मो.९४०३३८४८८९

## वासना स्पर्श ..

जवळ घे लहानग्यां
स्पर्श किळस वाणा
वासनांध वृत्ती वृध्दी
अश्लीलखाणाखुणा

मुकतो कोवळाजीव
जीवनाचे सुंदरक्षणा
अश्लील चाळे काळे
आठवता क्षणोक्षणा

शब्द एक बोलू नको
बळी पडतो दडपणा
दादतरी रे मागू कुणा
उन्मळू पडे धीटपणा

एकटाच रे अभिमन्यू
युध्द करतो रणांगणा
बाल बुध्दी बने जिद्दी
तोडू पाहते रे रिंगणा

मोठी माणसे मोठीचं
किंमत ना देई श्रवणा
आंधळे ते मातापिता
लाभले कसे श्रावणा

लोटली युगे कित्येक
सिता माई तव हरणा
जरब का बसेना तरी
पुनर्जन्मल्या रावणा

- हेमंत मुसरीफ, पुणे
9730306996...



## नीलांबरी (गोकर्ण )

नीलांबरी नाव तुझे गं
गोकर्ण ही म्हणती तुला
कळ्या फुलांच्या राशीमधून
वेली वरती घेशी झुला ॥१ ॥

कळीमधून पदर उमलता
वाटे नाजूक सोनपरी
लावण्यवती गं वाटे मजला
तू ग अप्सरा भासे खरी ॥२ ॥

नाजूक कांती सुकुमार ती
वाटे मजला राजकुमारी
सोन सकाळी अवनी वरती
बहरून येते भर दुपारी ॥३ ॥

राजसकन्या कुण्या देशाची
निलवर्णीय वस्त्रधारी
लवचिक बांधा मदनमोहिनी
नाव शोभते निलांबरी ॥४ ॥

सौ.शशिकला गुंजाळ वांगी भूम
मो.९१३०२७२२१६

## जरासा...

तु जसा मी ही तसा
मग हा अबोला कसा... ?

कसले हे मौन
कसला हा वारसा... ?

खोटे नाही बोलत... ?
बघ समोर आरसा

कसले हे घर... ?
हा तर आडोसा

गर्वाचे घर खाली
मागे पडला ससा

सुटलेला तोल
आवर कसा बसा

मागे वळून पहा
जरासा जरासा
- बलराज संघई
9420015108

## मेस

अगदी घरच्यासारखं
जेवण मिळावं
म्हणून लावली एक
घरगुती मेस
पण ताटात रोज असतो
एकतरी केस
वरणाच्या वाटीचा तर
सरळ दिसतो बेस
कारण त्यात डाळीचा
काहीच लागत नाही
ट्रेस रोज त्याच त्या
पांचट भाज्या खाऊन
तोंडाची गेली टेस्ट...
म्हणूनच हल्ली माझं
जेवण झालं एकदम
लेस. आई तू नेहमी
सांगतेस ना ....
भरपूर खा पी घे
व्यवस्थित रेस्ट
तब्येतीला जप ती ठेव
काय बेस्ट...
पण खरं सांगू आई
राहिली जर का माझ्या
मेसची अशी ही केस...
तर पन्नास किलो
वजनाचा टार्गेट देखील
माझ्याच्याने व्हायचे
नाहीकधीचचेस...
कारण निसत्व बेचव
अशी आहे माझी मेस...
अशी आहे माझी
मेस....
- सीमा गाडेकर
9423172305

## भुई

काळ्या भूईच्या कपाळी
देखणं हिरव मळवट
निळ्या-पांढऱ्या
आभाळाचा
तीच्या डोईवर पदर
तीच्या भांगातूनी वाहे
नद्यांची रास
तीच्या वेलींच्या वेणीत
गजरा चांदण्याचा माळे
हिरव्या शालूवर तीच्या
फुले, फुलांची बागे
अंगाखांद्यावर तीच्या
खेळे किलबिल पाखरे
मुक्या जीवासंग
बोलकी ही जगे
पाहून काळ्या भूईच्या
रुपाला भूरळ डोळ्याला
पडे
पाणकळात तीचे खुलते
हिरवे मळवट
हिरव्या गोजिऱ्या रुपाची
खिळे रिमझिम चौफेर
- लक्ष्मण
वाल्डे-कन्नड,
जि.संभाजीनगर

## लिंबुनीच्या विहिरीवर

कानी अजून घुमते
मोटेची त्या कर कर
डेरेदार आंब्याखाली
लिंबुनीची हिर
पखाली तून वाहे
पांढरेशुभ्र पाणी
नाजुकशी शीळ घुमते
हिरव्या पात्यातूनी
आमराईत घुमे घुंगराची
खुळ खुळ
पाटातून पाणी वाहे बाई
झुळ झुळं
दूर ओढ्यात घुमतो
पारवा इतभर पिकात
बळ्यांचा थवा
भरधाव लोट येई
पाण्याचा जेव्हा
पंख पसरुन झेपावे
नभात तेव्हा
लेकरांची माय जणू देई
स्वप्नाला आकार
माय भू सांग कसे फेडू
तुझे उपकार
- ©सौ. वैशाली इंदुमती
जाधव-महाडिक
संपर्क क्र. -
९७६७४३७९२३

## ऋण माझ्या जिजाऊंचे

आम्ही जिजाऊंच्या लेकी
गातो जिजाऊंचं गाणं
जिजाऊंने दिले आम्हां
स्वराज्याचे वरदान

पिता लखुजी राजा
वीर म्हाळसा आई
रणरागिनी कन्या
पोटी आली जिजाबाई

किती नवस सायासें
झाला जन्म जिजाऊंचा
गिरविला भावांसंगे
श्री गणेशा शिक्षणाचा

शिक्षणाच्या संगे जिजा
युद्ध कलाही शिकली
यवनांच्या जुलमां पुढे
नजर तिची ना झुकली

शूर शहाजी राजांची
बांधियेली लग्नगाठं
तेंव्हा दिसें जिजाऊला
स्वराज्याची ती पहाटं

जिजाऊंनी सांभाळली
अब्रू माया बहिणींची
रोखून सतीच्या प्रथेला
जगविली माय लेकरांची

होता काळ यवनांचा
दुष्ट आणि दुर्जनांचा
रुजे जिजाऊंच्या पोटी
अंकुर तो स्वराज्याचा

शिवनेरी किल्ल्यावरीं
जन्म शिवबाचा झाला
रयतेला तारण्यास
वाली रयतेचा आला

आई जिजाऊंचा पोटी
शिव ,शंभू जन्मा आलें
तलवारीच्या पात्यापरीं
साऱ्या जगीं लखाखलें

पित्यासोबतच त्यांनी
शंभू बाळास धाडलें
जिजाऊंच्या छायेखाली
बाल शिवबा वाढलें

जिजाऊंनी घडविले
बाल शिवबांना असे
कोल्हा -कुत्र्यांच्या मध्यें
शोभावेत सिंह जसे

होते बेचीराख झाले
सारे पुणे ते शहरं
शिवबांनी उपटली
जुलूमांची ती पहारं

होता कधीं फिरलेला
जिथे नांगर गाढवाचा
जिजाऊंनी फिरविला
तिथे नांगर सोनियाचा

होत्या जिजाऊ म्हणून
दिसे मंदिरा कळसं
त्यांच्यामुळेच शोभते
अंगणातली तुळसं

रायरेश्वराच्या मंदिरी
शपथ स्वराज्याची झाली
तोरण्याच्या बुरुजावरीं
भगवी ध्वजा फडकली

जिंकून तोरणा बांधले
स्वराज्याचे हो तोरण
मावळ्यांनी ही अर्पिले
स्वराज्यालाच जीवन

साऱ्या रयतेच्या मनी
आता थोडं बळ आलं
शिवबांनी त्यांच्यावरी
जणू छत्रं धरीयलं

संकल्पना शहाजींची
आशीर्वाद जिजाऊंचा
उभा राहिला तेंव्हाच
वटवृक्ष स्वराज्याचा

पाहून स्वराज्य सोहळा
घेतला निरोप जगाचा
अवघा भारत देश ऋणी
माझ्या थोर जिजाऊंचा
माझ्या थोर जिजाऊंचा....

- सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे,
परभणी ९८२३०६६६०६

## गुगल गुरु

गुगल गुरु भुरू भुरू किती प
ळता राव ?
थकवा कसा येत नाही सुरूच
असते धाव ?

येनी वे.. येनी व्हेअर..
येनी टाईम रेडी
बरी नव्हे भाग दौड
विश्रांती घ्या थोडी

बोटांच्या तालावर
टिचकी घेता गालावर
क्षणात कसे फिरून
येता पृथ्वीच्या गोलावर

जगाच्या काण्या कोपऱ्यात
विखूरलेली दप्तरे
युजर्सच्या प्रश्नांची शोधून
आणता उत्तरे

टेक्नोसेव्ही जमाण्याचे
गुगल गुरु तुम्ही
तुमच्यामुळेच उन्नत
आणि प्रगत झालो आम्ही

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086

## मेघा रे, मेघा रे!

मेघा रे मेघा रे, तुला माझी आण रे।
पाणी आण आधी, पाणी आण
रे।धृ।

विणा पाणी सृष्टी गमे बेजार।
तुझा असा कोरा कसा शेजार।
वेळा आली तरी तू बेफाम का।
आम्ही सारे झालो अता बेजाण
रे!१ !

तुझी फक्त आदळ आपट-
धड् धड् धडाडधूम।
विजेचा भारी थयथयाट-
कड् कड् कडाटकड।
अशा भयान अंधारी हृदयात-
थर थर थरारम।
अंगा सुटे दरदरून घाम बेभान रे!२ !

साऱ्या नजरा भेदरलेल्या
आकाशाकडे।
धारा थांबव अंगा अंगांच्या
तुला साकडे।
लाही लाही अंग होतो रे।
होतो मोठा मनी त्रागा रे!३ !

सळ सळ सळाक पाने वाजू दे।
टप टप टपाक पाणी पाड रे।
काळ्या काळ्या नभीच्या ढगा रे।
जाऊ दे वाहून तनमनाचा त्राण
रे!४ !

धाडू नको खट्याळ वारा- भर्र भर्र ।
पडू दे ना पाण्यासंगे गारा- गार गार।
चिंब भिजू दे घामाघूम अंगा रे।
बेधुंद नाचू दे कृगोनि मनमोरा रे!५ !

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे
गुरुजी, गडचिरोली,
मो. ७७७५०४१०८६.






विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# सुसंस्कृत महाराष्ट्रात विकृत कृत्य

आधुनिक केसरी

**देशामध्ये महाराष्ट्राला एक आगळी वेगळी ओळख आहे. फुले शाहू आंबेडकर विचारधारा व संत तुकाराम महाराजांपासून संत गाडगेबाबा पर्यंत संतांची परंपरा या स्वराज्यात निर्माण झाली. फुले शाहु आंबेडकर विचार धारा ही संतांच्या विचारावरच असून समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य यावर आधारित आहे. संतांचा लढा हा विषमता, अंधश्रद्धा, धर्माच्या नावाखाली लूट याला मातीत गाढून सामाजिक समता विज्ञान यावर आधारित होता. संतांनी धर्माला महत्व न देता कर्माला महत्व देऊन मानवता धर्म जोपासला. कोणत्याही प्रकारचा भेद, विषमता व द्वेष याला थारा न देता केवळ आणि केवळ माणसाला माणूस म्हणून माणसाची सेवा करणे यालाच प्राधान्य दिले.**

संतांची व महापुरुषांची शिकवण एकी व समतेवर आधारित असून विषमता व द्वेषाला धारा नाही. अनेक संतानी देव दगडात व देवळात नसुन तो मानसात आहे. आणि मानवांची सेवा हिच ईश्वर सेवा असे सांगितले असतानाही आजही जिवंत माणसाला जाती धर्माच्या नावाखाली मारले जाते. सामाजिक द्वेष पसरवून माणसाला माणसापासून दुर केले जाते. हे कृत्य संताच्या विचारधारेत बसतच नाही. आज कर्माला नाही धर्माला महत्त्व दिले जाते. इतिहासाची चुकिचे दाखले देऊन वर्तमानात सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण करून सर्वसामान्य तरुणांचे भविष्य उद्धस्त केले जाते याची जाणीवच राहीली नाही. स्वतः ला माणूस म्हणून घेताना प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या संताचा किंवा कोणत्या ना कोणत्या महापुरुषांचा आदर करून त्यांना माणतो. परंतू खंत आहे की जे काही आज घडत आहे यावरून असे दिसत आहे कि जे लोक वैचारिक पणे संत व महापुरुषांचे विचार स्वतः स्विकारतात व त्याचा प्रचार आणि प्रसार करून समजामध्ये प्रबोधनाच्या माध्यमातून समजात समता बंधुता व शांतता प्रस्थापित करतात अशा लोकांना प्रकाशझोतात आणले जात नाही. जे लोक धर्मापेक्षा कर्माला महत्त्व देऊन असत्य थोतांड अंधश्रद्धा व देवाधर्माच्या नावावर पोटभरणाऱ्या लोकांना विरोध करतात त्या लोकांचे विचार व कार्य जास्त लोकांपर्यंत पोहचु दिले जात नाही. परंतू जनता जागृत होऊन सत्य असत्य यामधला फरक व धर्माच्या नावाखाली केवळ राजकारण करून लोकांच्या समस्या वाढवल्या जात आहेत याची जाणीव झालेली आहे. परंतु अशा लोकांना मर्यादित केले जाते. धर्मद्रोही म्हणून त्यांची टिंगलटवाळी केली जाते. आज सत्य बोलणे गुन्हा होत चालला आहे. सरकार आपल्या अधिकाराचा गैरवापर करून सामाजिक तेढ निर्माण होणाऱ्या बाबींना प्राधान्य देऊन समाजिक तेढ निर्माण करण्यासाठी हातभार लावते. कोणत्याही चुकिच्या गोष्टी चे समर्थन कोणताही जागृत व मेंदुचा वापर करणारा व्यक्ती करत नाही. हे सत्य असताना केवळ धर्माच्या बेगडी स्वाभिमान दाखवून इतरांना तुच्छ लेखणे किंवा अत्याचाराचे समर्थन करणे हे सुसंस्कृत पणाचे लक्षण नाही. सामाजिक तेढ किंवा समाजीक द्वेषाची जाणीव आपल्याला दैनंदिन जिवन जगत असताना होत नाही. परंतु इलेक्ट्रॉनिक मिडीया बघितला तर मग आपल्याला धर्म धोक्यात वाटतो, मुस्लिम देशद्रोही वाटतो, लव जिहाद ज्वलंत प्रश्न वाटतो. आणि या विषयावर भावनिक करून शिक्षण रोजगार महागाई व आरोग्य यावरून दुर्लक्ष करून धर्मच जगला पाहिजे त्या साठी काही झाले तरी चालेल असे वातावरण निर्माण केले जाते. जेव्हा जेव्हा धार्मिक दंगली होऊन सामाजिक वातावरण दुषीत झाले तेव्हा तेव्हा कोणत्याही धर्माला कधीच कोणताच फायदा झाला नाही. उलट दोन्ही धर्मातील तरुणांवर केसेस दाखल होऊन त्यांचे भविष्य उध्वस्त झाले. आणि ज्यांना दंगलीचा फायदा झाला त्या लोकांची मुले ना दंगलीत असतात ना त्यांच्यावर केसेस होत ना ते बेरोजगार असतात. ज्यांना दंगलीचा फायदा व धर्माचा फायदा होतो त्यांची लेकरं विदेशात शिक्षणासाठी जातात. आणि गावातील शाळा बंद करून सर्वसामान्य लोकांच्या हाती दगड, तलवार चाकु बंदुक आणि डोक्यात बेगडी धर्म देऊन जिवनाची राग रांगोळी केली जाते. तरीही लोकांना याची जाणीव राहली नाही. ज्यांना जाणीव आहे त्यांचे हे लोक ऐकतही नाहीत. प्रामाणिक पणा, इमानदारी, सत्यता ह्या गोष्टी तर लोकांच्या डोक्यातून काढून घेऊन केवळ आणि केवळ धर्म आणि धार्मिक तेढ एवढ्याच गोष्टी मेंदुवर बिंबवल्या गेल्या आहेत. म्हणून सामाजिक प्रश्न जसे शिक्षण, नोकरी, महागाई, आरोग्य, राष्ट्रप्रेम, महापुरुषांचे विचार याचे धर्मांध व भक्त लोकांना काहीच घेणे देणे नाही. मुळात हे धर्मांध व भक्त लोक संख्येने खुप कमी आहेत. परंतु इलेक्ट्रॉनिक मिडिया वारंवार त्यांनाच व त्यांच्या मेंदुला खुराख पुरेल अशाच बाबी दाखवते म्हणून




त्यांची संख्या जास्त वाटते. धर्मांध व भक्त लोकांच्या कोणत्याही कृत्याला प्राधान्य देऊन दाखवले जाते म्हणून सामाजिक तेढ दिसते. कधी कधी तर इलेक्ट्रॉनिक मिडियाच अगोदर स्टुडिओ मध्ये सामाजिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य करते त्यानंतर समाजात त्याचे पडसाद उमटले जातात. सुप्रीम कोर्टाने मिडियाने धार्मिक तेढ निर्माण करू नये असे बजावले असतानाही मिडिया सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करून आपली लाचारी व बेईमानी वेळोवेळी सिद्ध करते. नोकरी साठी शिकवलेल्या व पुस्तकाचा कधीच संबध न आलेल्या लोकांना येथे इलेक्ट्रॉनिक मिडिया विद्वान म्हणून समोर आणते. भोंदुगीरी पाखंड विषमता यांना प्रोत्साहन दिले जाते म्हणून त्या प्रवृत्तीचे लोक कमी जरी असले तरीही जास्त दिसतात. देशात राहतांना समता बंधुता व शांतता प्रस्थापित कशी होईल याचे उत्तर भारतीय संविधान व संताचे विचार यामध्ये आहे. पण मुळात प्रश्न हा आहे की भक्त व धर्मांध लोक कधी वाचत नाहीत. स्वतः ला एक भारतीय म्हणून समजून इतरांना पण भारतीय समजले आणि दैनंदिन जिवन जगले तर प्रत्येक धर्माला आदराने व नियमाने जगता येते. आम्हाला देशावर प्रेम असायला पाहिजे पण प्रेम हे धर्माच्या नावाखाली चुकीच्या कामावर आहे म्हणून विकृती वाढत आहे. कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे कोणत्या गोष्टी मानव हिताच्या देशहिताच्या आहेत यावर धर्मांध, विषमतावादी लोक चर्चाच न होऊ देता केवळ द्वेष पसरवण्याचे काम करतात. प्रत्येक बाबीमध्ये जात आणि धर्म शोधण्याचा प्रयत्न करतात. आणि जेव्हा स्वतः च्या जाती धर्मावर आरोप होतात तेव्हा राष्ट्रहीताच्या गोष्टी करतात. एवढे माणसिक अपंग लोक आहेत. सध्या औरंगजेबाच्या फोटो वरून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. औरंगजेबाचा फोटो वापरणे चुकिचेच आहे. यात काहीही दुमत नाही.परंतु केवळ औरंगजेब मुस्लिम होता म्हणून द्वेष करत असाल तर हा मुर्ख पणा आहे. शत्रुच्या कबरा बांधणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज समजून घेणे अगोदर आवश्यक आहे. औरंगजेब यांच्या फोटो मुळे जर धार्मिक वातावरण बिघडत असेल आणि धर्म धोक्यात येत असेल तर फोटो ला विरोध व्हायलाच पाहिजे. परंतु फक्त एवढ्यावरच थांबुन जमणार का ? डॉ. बाबासाहेब यांची जयंती साजरी केली म्हणून तरुणांची हत्या केली जाते, मुबंई मध्ये मुलीवर बलात्कार करून हत्या केली जाते. रेणापूर मध्ये तिन हजारासाठी खुन केला जातो. मुंबई मध्ये महिलेचे तुकडे करून कुकर मध्ये शिजवून, मिस्कर ने बारीक केले जाते तेव्हा कोणत्या धर्माला गर्व वाटतो ? औरंगजेब फोटो प्रकरणात बोलणारे व रस्त्यावर येणारे वरिल प्रकरणात गप्प का बसतात ? धर्म म्हणजे नेमकं काय ? फोटो दाखवणे जास्त गंभीर आहे का व्यक्तीची हत्या करणे जास्त गंभीर आहे ? हत्येचा निषेध आणि आरोपींना शिक्षा व्हायला पाहिजे या साठी जे लोक रस्त्यावर येत नसतील ते कोणत्या धर्माचे ? मानवता प्रामाणिक पणा शिल्लक आहे का ? धर्माच्या नावाखाली आरोपींना वाचवणे योग्य आहे का ? फोटोवरून वादळ निर्माण करणारे धर्मांध लोक वरिल आरोपींच्या विरोधात कधी आवाज उठवणार. याच मातीत संतानी समतेची पेरणी केली परंतु जातीवादी, विषमतावादी स्वार्थी राजकारण्या लोकांनी संताचे विचार पायदळी तुडवून द्वेष विषमता, पसरवून धार्मिक व सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि लोक त्यांना समर्थन करतात हे माणसिक गुलामीचे लक्षण होय. संत महापुरुषांनी समता बंधुता शांतता प्रस्थापित होण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घालून सुसंस्कृत होण्यासाठी वैचारिक संस्कार घातले परंतु लोभी, पाखंडी लोकांनी ते संस्कार झुगारून विकृती पसरवणारे संस्कार स्विकारुन आपले चुकीचे संस्कार, बेईमानी, धर्मांध व विषमतावादी विचार दाखवत आहेत. हि विकृती नष्ट करण्यासाठी पुन्हा प्रबोधनाची मशाल पेटवणे आवश्यक आहे.

# एस.टी. प्रवास सवलत ७५ वरुन ६५ वर्षे करावी !

आधुनिक केसरी

**भारत सरकारने जनतेसाठी अनेक सुबिदा उपलब्ध करुन दिलेल्या असतानाच महाराष्ट्र सरकारही मागे राहिलेले नाही. सध्याचे महाराष्ट्र सरकार नेहमीच जनतेच्या बाजूने असल्याचे जाणवते. त्याचे कारण म्हणजे गेल्या सात ते आठ महिन्यात अनेक सुविधा महाराष्ट्रातील जनतेला सरकारने उपलब्ध केलेल्या आहेत. त्यातील एक म्हणजे ७५ वर्षा वरिल ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. बसेस मधून मुक्त प्रवास करता येणार आहे. ह्या योजनेचे सर्वत्र स्वागत होत असले तरी काही त्रुटी यात आढळतात. त्यावर चर्चा होणे गरजेचे वाटते. तुम्ही लोकांचा विचार करण्यात वेळ वाया घालवू नका.. तर लोक तुमच्या बद्दल विचार करतील असे काही तरी करा.**

या प्रमाणे महाराष्ट्र सरकारने जनतेच्या प्रवासाच्या अडचणीचा विचार करुन ६५ वर्षा वरील ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्धी तिकिट आकारुन ७५ वर्षावरील नागरिकांसाठी मुक्त प्रवास योजना सुरु केलेली आहे. पण ही योजना नक्की कोणासाठी आणि त्याचा फायदा किती लोकांना होणार या बद्दल कुणीही विचार केलेला दिसत नाही. कारण सर्वसामान्य माणसाचे ६० वर्ष हे निवृत्तीचे वय समजून त्याला खाजगी किवा सरकारी आस्थापनातून निवृत्त केले जाते. कारण तो साठ वर्षांनंतर काम करण्यायोग्य नसती असे समजून त्याला निवृत्त केले जाते. हे फार चांगले आहे परंतु निवृत्ती नंतर फक्त २० टक्केच लोक फक्त साठ ते सत्तर वर्षाच्या वर जगतात असा निकश आहे. वेळ आणि व्यक्ती पुन्हा मिळवता येत नाही. म्हणून वरील योजनेचे सर्वच क्षेत्रात वाहवा होत आहे. मात्र काही अपवाद हे जरुर पडताळून पाहायला हवेत. ते असे आजकालच्या आधुनिकिकरणाच्या युगात ७५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आयुष्य असणारे लोक फारच कमी प्रमाणात आहेत त्यामुळे पंच्याहत्तर



वर्षांची एस. टी. प्रवास मुक्त अशी सेवा कोणाच्या फायद्याची होणार ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत पसरला आहे. खरं तर निवृत्तीच्या दिवसापासूनच प्रत्येक निवृत्त व्यक्तीला एस.टीच्या सेवेत मुक्तप्रवास मिळायला हवा. नाहीतर त्या सेवेचा कोणाला फायदा होणार ? त्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रत्येक व्यक्तीच्या वयाच्या ६० वर्षा पासून अर्ध तिकिट आकरुन ६५ व्या वर्षा पासून एस.टी. प्रवास मुक्त करायला हवा तरच त्यांचा पूर्ण फायदा जनतेला होऊ शकतो. म्हणून आमची सरकारला एक कळकळीची विनंती आहे की, एस. टी. सेवेची मुक्त सवलत ७५ वर्षाची अट कमी करून ती ६५ वर्षाची व अर्ध्या तिकिटासाठी ६५ वरून ६० वर्षे अट केली तर समान्य जनतेला त्याचा फायदा घेता येईल. सद्याच्या सरकारने सर्व सामान्य जनतेला बऱ्याच योजनांमध्ये आकर्षक सवलती दिलेल्या आहेत. आणि अजूनही पुढे त्या वाढण्याची शक्यता आहे. शेतकरी, उद्योजक, साखर कारखानदार, सर्वसामान्य कामगार, विद्यार्थी, मेडिकल सुविधा, साहित्यिक, कलाकार अशा अनेक क्षेत्रात सुविधा उपलब्ध करून सरकारने सामान्य जनतेला दिलासा दिलेला आहे. त्याबद्दल सरकारचे अभिनंदन आणि आभार मानावे तेव्हढे थोडेच आहे.

आता पर्यत या योजनेचा लाभ किती नागरिकांना झाला हा सुध्दा एक मोठा प्रश्न आहे. त्याचा शोध घेऊन खरच ही योजना जनतेसाठी लाभ दायक आहे काय ? याचा विचार व्हायला हवा. जर सवलत धारकाचे वय ७५ वर्षावरून ६५ वर्षे पूर्ण सवलतीचे व ६५ वर्षा वरून ६० वर्षे अर्ध सवलत केल्यास अनेक गोर गरीब नागरिक त्याचा लाभ घेऊ शकतील. मात्र सरकारने नक्की या योजनेचा पुनर्विचार करावा. तसे नाही झाले तर ती योजना असूनही काहीच उपयोग नाही असे होईल. कृपया संबंधीत अधिकारी वर्ग, मंत्रीमहोदयांनी व एस.टी. महामंडळाने या योजनेचा पनर्विचार करुन योजनेचा लाब सर्वसामान्यांना कसा मिळेल याचा विचार करावा ही अपेक्षा. तरच अशा योजनांचा गरजूंना लाभ घेता येईल. कारण आता सरकारी व खाजगी सेवेतून ६० वर्षांनीच सेवानिवृत्त होता येते शिवाय ७५ वर्ष वयाची व्यक्ती एकट्याने प्रवास करू शकत नाही. सरकारने दिलेल्या सदर सवलतीचा फायदा घेण्यासाठी वयोमर्यादित बदल केल्यास या योजनेचा पुरेपूर फायदा जनतेला घेता येईल. त्यासाठी सरकारने जनतेचा विचार करून या योजनेत बदल करावा असे वाटते. म्हणून मायबाप सरकारने वरील एस.टी. सवलत ७५ वर्षावरून ६५ वर्ष पासून पूर्ण सवलत व ६५ वर्षावरुन ६० वर्ष अर्धी सवलत केल्यास खऱ्या अर्थाने जनतेला या सवलतीचा फायदा होऊ शकतो.

दत्ताराम दळवी, लालबाग

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

# यम्मी डिझार्ट

आधुनिक केसरी

**साहित्य :** 3 कप दूध , दीड कप डेसिकेटेड कोकोनट, 1 कप कॉर्नफ्लोअर ,1 कप थीक क्रीम किंवा अर्धा कप व्हीप्ड क्रीम पावडर, 1 मोठा चमचा पिठीसाखर , 4 मोठेचमचे साखर ,ट्रे ला लावण्यासाठी अर्धा चमचा तूप, व्हॅनिला इसेन्स 10.12 थेंब ,फूड कलर, सजावटीसाठी पिस्ते किंवा टूटी फ्रुटि , गोल्डन स्पार्कल्स .

**कृती :** प्रथम गॅसवर 2 कप दूध गरम करण्यासाठी ठेवावे. ट्रे ला तूप लावावे. त्यावर 2 कप डेसिकेटेड खोबर्याचा कीस पसरवावा. बाऊल मध्ये कॉर्नफ्लोअर घेऊन अर्धा कप दुध घालून नीट एकत्र करावे.दूध उकळले की त्यात साखर घालून ढवळावे.साखर पूर्णपणे विरघळली की सावकाश गुठळ्या होणार नाहीत याची काळजी घेत घेत कॉर्नफ्लोअर किन्वा व्हनिला कस्टर्ड पावडर मिसळलेले दूध त्यात घालून सतत हालवत रहावे .5..6 थेम्ब व्हॅनिला इसेन्स घालून छान एकजीव करावे. लवकरच मिश्रण घट्ट होईल.झाऱ्याला चिकटून राहील इतके घट्ट झाले की ते ट्रे मधील खोबऱ्यावर पसरावे.

खोबऱ्याच्या पांढऱ्याशुभ्र थरावर हा क्रिम रंगाचा थर घातल्यावर खूप छान दिसतो.नंतर एका मोठ्या बाऊल मध्ये थीक क्रिम कींवा ऑनलाईन व्हीप्ड क्रीम पावडर मिळते ती घेऊन त्यामध्ये बाकिचे थोडे थोडे दुध घालत घालत इलेट्रिक बिटरने फेटत राहावे.मग त्यात पिठीसाखर,थोडा लाल फूड कलर ,आणि इसेन्स घालून मस्त फेटून हलके फेसाळ होईपर्यंत फेटावे. शेवटी या क्रीमचा थर द्यावा आणि फ्रिज मध्ये सेट करण्यासाठी तासभर ठेवावे. नंतर बाहेर काढून त्याच्या वड्या कट करून पिस्ते टुटिफ्रुटी व गोल्डन स्पार्कल्सने मस्त सजावून सुंदर डिश मध्ये हे डिझार्ट थन्डगार सर्व्ह करावे. **वैशिष्ट्य :** हे डिझार्ट कोणत्याही कार्यक्रमांच्या आधी करून ठेवता येते.त्यामुळे ऐनवेळी धावपळ होत नाही.फ्रिज मध्ये आठवडाभर सुद्धा छान राहते. दिसायला आकर्षक आहे त्यामुळे पार्टीची लज्जत वाढते.चवीलाही यम्मी असल्यामुळे सर्वजण नक्कीच आवडीने खाणार.



# सोशिकतेचा सागर...



सौ. दुर्गा देशमाने राऊत,
माजलगाव, जि. बीड

आधुनिक केसरी

**बालपणीच लग्नाच्या बेडीत अडकलेल्या कांताबाई बालवयापासून कष्ट करण्याची त्यांना जणू देवानं शक्तीच प्रधान केली. आपल्या मेहनतीवर जगण्याची त्यांना सवयच जडली आपल्या आईबरोबर चिमुकल्या हाताने अनवाणी पायांनी कणसे विकून उदरनिर्वाहासाठी आईला हातभार लावत, त्यामुळे व्यवहार ज्ञानात त्यांचा कोणी हात धरू शकत नव्हते. त्या काळच्या परिस्थितीनूसार सासरी अगदी गरिबी होती, बेताची परिस्थिती पोपटराव लहरी माणूस "केलं त केलं नाहीत तेल लावीत गेलं" त्यामुळे घरची जबाबदारी कांतावरच येऊन पडली. ज्या वयात मनसोक्त खेळायच बागडायच त्याच वयात संसाराचा गाडा ओढण्याचं कुकर्म त्यांना प्राप्त झालं शरीर व मन तयार नसतानाही परिस्थितीसमोर ताठ मानेने लढण्यास तयार झाल्या.**

भेटेल ते काम निडरपणे करणे एवढेच त्यांना माहीत होते, समोर उभ्या शत्रूचा फडशा पाडण्याचा विचार जसा सैनिकाच्या मनात तसाच परिस्थितीला धूळ चारण्याचा त्यांचा करारी बाणा.

चार भावंडांचा सामायिक कुटुंब कांता थोरली असल्याने तिनेच सासरी आपल्या जावांची आई होऊन बाळंतपणा उरकली तिच्याही संसार वेलीवर बघता बघता चार कळ्या उमलल्या या कळ्यांनी घर गजबजलं वातावरणात गंध दरवळला आणि त्याबरोबरच अविचाराने ही फेर धरला सासू सासऱ्यांचा तोंड काही गप्प बसलं नाही चार पण त्यांनी घर उजळलं पण कांताच्या जीवनात सासरवासाचा अंधार पसरला. पोपटराव सोडून गेले कुठे गेले काय गेले काहीच पत्ता लागला नाही चार मुली व सारा भावंडांचा सांभाळ कांता करू लागली जावाही तिच्या सोबतीला होत्या सहा महिन्यानंतर पोपटराव घरी आले पुन्हा पूर्ववत संसार सुरू झाला



आणि सर्वांच्या मतानुसार नवस सायास करून मुलगा झाला बालवयात लग्नं होऊन पाच बाळंतपणात योग्य उपचार विधी न मिळाल्याने कांताला वाताने घेरले पण पोपटरावांना तिच्या दुःखाशी घेणे देणे नव्हते त्यांना फक्त बसून खाण्यात पुरुषत्त्वाचा तोरा मिरवण्यात समाधान इलाजासाठी पैसे नसल्याने कांताच्या भावाने कसा बसा इलाज केला आणि वातावर उपचार झाला. कोणालाच दोष न देता जीवन संघर्ष करण्यास कांता पूर्ववत तयार झाली. आणि कामाला जाऊ लागली. मुले लहान असल्याने कोणी कामही देत नसे बाहेरचे काम सोडून घरीच धंदा करण्याचा सुविचार कांताला सुचला पतीला सांगून सुरुवात करायचे ठरले. पण भांडवलाचा प्रश्न होता शेवटी तोही तिच्या भावानेच मिटवला तसा छोटासा उद्योग समोसा सेंटरचा श्रीगणेशा झाला पण पोपटराव अत्यंत आळशी असल्याने माल तयार करून झाल्यावर अंग दुखीचं नाटक करून झोपत असत मग विक्रीला जाण्यासाठी त्यांचे हात पाय चेपून विनवणी करून कशा बशा कांताबाई त्यांना पाठवत असत हे सर्व सोपस्कार झाल्यावर रात्री दहा ते अकरा वाजता पोपटराव आले की ती माऊली त्यांना गरमागरम भाजी पोळी खाण्यासाठी करून देते पण "कुत्र्याचं शेपूट वाकड ते वाकडेच" पोपट रावांची शिव्यांची मालिका दणकावून चालत असे. कांताबाई आपल्या अश्रूंचा अभिषेक धरणी मातेला घालत असत, हे नित्याचेच ठरले होते. ऐकून बहिरे आणि पाहून आंधळे अशी भूमिका त्यांनी स्वीकारली आपल्या पाच पांडवांसाठी दुःखाच्या माथ्यावर स्वार होऊन उद्याच्या सोनेरी पहाटेची आज त्यांच्या नयनाला लागलेली होती. पोपट रावांना फिरून माल विकणे जमले नाही ,हात गाडीतही यश आले नाही, मेडिकल वरही निभाव लागला नाही, कधी मुलांशी मिळून मिसळून खेळणे गप्पा मारणे जमले नाही, कोणत्याही बाळाचा मायेने पापा घेण्याचं सुख त्यांना अनुभवता आलं नाही. चिमुकल्या पावलांना शाळेची वाट दाखवनं तर खूपच दूरची गोष्ट आहे.

त्यांना जमलं फक्त सहनशीलतेचा करूनेचा स्वाभिमानाचा सागर असणाऱ्या कांताला छळणं हाड उगाळून ज्या कांतीन त्यांचा संसार फुलवला टिकवला तिच्या डोळ्यात कायम आसवं भरण्याखेरीज सुखाचा एकही क्षण कधी तिच्या आसपास फिरकू दिला नाही.

आजही अशा अनेक कांताबाई परिस्थितीच्या अंधकारात भविष्याचा दीपस्तंभ होऊन उभ्या आहेत पुरुषाच्यासाथीशिवाय त्यांच्या अत्याचाराला सहन करत आपला संसार रथ समर्थपणे हाकत आहेत या सर्व रणरागिनींना सलाम....

**चंदनासम झिजवून**
**घर त्यांचं फुलवते**
**स्वतःच पेरून अस्तित्व**
**बीज तुमचंच खुलवते.**

# युक्रेन-रशिया युद्ध वॉटर बॉम्बच्या दिशेने



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**6 जून 2023 रोज मंगळवारला रशियाच्या ताब्यात असलेल्या खेरसन भागातील "नोव्हा काखोव्का"हे अतिशय महत्वाचे धरण मंगळवारी झालेल्या स्फोटात उध्दवस्त झाले.युक्रेनच्या खेरसनजवळ धरण फुटल्याने अनेक गावं शहरे जलमग्न झाले आहेत.यामुळे युक्रेनमध्ये पुराचा धोका ओढवल्याचे दिसून येते.रशियाने युक्रेनवर हवाईहल्ले केले अनेक मिसाईले डागलीत यामुळे युक्रेन आगीत भाजतो आहे.यात मोठ्या प्रमाणात जिवित हाणी व वित्तीय हाणी सुध्दा झाली.परंतु आता रशियाने युक्रेनच्या लढाईत वॉटर बॉम्बचा वापर केल्याचे दिसून येते. रशियाने युक्रेनच्या अनेक शहरांवर बॉम्ब हल्ले केले.परंतु आता युक्रेनच्या खेरसन शहराजवळील मोठ्या धरणाची भिंत कोसळल्याने संपूर्ण परिसरात पुराचा धोका ओढवल्याचे दिसून येते.**

यामुळे युक्रेनने रशियावर आरोप लावला आहे की स्फोटकांच्या सहाय्याने रशियाने मुद्दाम धरणाची भिंत फोडली असावी असा गंभीर आरोप युक्रेनने केला आहे.त्यामुळे आज युक्रेन आगीसह जलप्रलयचा सुध्दा सामना करीत आहे.यामुळे युक्रेनने प्रतिहल्याची तयारी दर्शविली आहे.असे जर झाले तर दोन्ही देश तलाव,नहर,धरण यावर हल्ला करेल अशा परिस्थितीत वॉटर बॉम्ब युध्दाला सुरुवात होईल व अनेक देश जलमग्न होईल.ज्याप्रमाणे संपूर्ण व्दारका पाण्याखाली आली त्याचप्रमाणे जगातील अनेक देश पाण्याखाली येवू शकते याला नाकारता येत नाही.धरणाच्या पाण्यामुळे युरोपातील सर्वात मोठ्या झापोरिशिया अणुप्रकल्पाला धोका निर्माण झाला असून पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होण्याची भीती आहे.या दुर्घटनेसाठी युक्रेन आणि रशियाने परस्परांवर आरोप केले आहेत.नीपर नदीवरील काखोव्का धरण आणि जलविद्युत प्रकल्प स्फोटात उडवून दिल्याचे सांगण्यात येत आहे.हा परिसर रशियाच्या नियंत्रणाखाली असुन त्यांनीच या प्रकल्पाजवळ स्फोट घडवल्याचा आरोप युक्रेनने केला आहे.तर दुसरीकडे या परिसरात युक्रेनकडुन सातत्याने बॉम्बफेक करण्यात येत आहे,यातुन धरण फुटल्याची घटना घडल्याचे रशियाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.परंतु यात मानवीय, पशुपक्षी व वित्तीय हाणी होत आहे त्याचे काय ? याकडे कोन्हीही लक्ष देण्यास तयार नाही.फक्त एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून दोन्ही देश बदल्याचे भावनेने कारवाई करू शकते.त्या पध्दतीची तयारी दोन्ही देशांनी केल्याचे दिसून येते.गेल्या 16 महिन्यांपासून सुरू असलेल्या युक्रेन-रशिया युध्दाची झळ दोन्ही देशांना भोगावी लागत आहे.परंतु धरणाची भिंत कोसळल्याने रशियाच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशातील 22 हजार नागरिक तर युक्रेनच्या नियंत्रणाखाली प्रदेशातील 16 हजार नागरिक रहातात.त्यांना सुरक्षित स्थळी नेण्याचे काम दोन्ही देशांकडून युध्दपातळीवर सुरू आहे.या्रून स्पष्ट होते की युक्रेन-रशिया यूध्द सध्याच्या परिस्थितीत "आ बैल मुझे मार " या स्थितीत येवून ठेपले आहे.धरण फुटल्याने पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण होवू शकते.याचा फटका रशिया-युक्रेनच्या नागरिकांना बसु शकतो."नोव्हा काखोव्का" धरण उध्दवस्त झाल्याने त्यातील 1.8 कोटी घनमीटर पाणी परिसरातील गावांमध्ये शिरूर शेकडो लोकांचा बळी जाऊ शकतात.त्यामुळे 100 हुन अधिक गावे व शहरात पूरस्थिती निर्माण होऊ शकते. रशिया-युक्रेनची अशीच संघर्षमय स्थिती राहिली तर धरण, तलाव,नदी यांना हतीयार बनवून वॉटर बॉम्ब युध्दाला सुरुवात होवू शकते.नोव्हा काखोव्का धरण उध्वस्त करून जलप्रलय दिसून आला ही तर सुरुवात( ट्रेलर ) आहे.अशीच परिस्थितीत रहाली तर भयावह स्थिती निर्माण होवू शकते.त्यामुळे जगातील देशांनी युक्रेन-रशिया युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे.अन्यथा अनर्थ होऊ शकतो.सावधान!



# आठवणी जागविणारे आंब्याचे दिवस




प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९


आधुनिक केसरी

**झुकू झुकी आगीन गाडी धुरांच्या रेषा हवेत काढी पळती झाडे पाहूया मामाच्या गावाला जाऊया हे गाणे आम्ही लहानपणी म्हणायचो पण आता ते गाव हरवले आहे तरी ज्योती कपिले यांच्या पुस्तकातून मामा-मामी, आजी - आजोबा ही मंडळी भेटतात. आता आंब्याचे दिवस आहेत. शहरातील मंडळी बाजारात जाऊन आंबे आणतात.परंतु पूर्वीच्या काळी घराघरात आंब्याची आडी असायची. वाट्टेल तेवढे आंबे खावेत,अशी पद्धत असायची. एक डझन आंबा आणून तो आठ दिवस खायचा प्रकार नव्हता. आंब्याचे दिवस या पुस्तकातील बाबा त्यांच्या बालपणीच्या आठवणी सांगतात. आपण बालपणी कसे व किती आंबे खाल्ले.**

त्याच्या कोयींवरून आज्जीला ते कळायचे. दिवसभर हुंदड्या घालणारी मुले संध्याकाळी आंब्याच्या खोलीत जाऊन आंबे खातात. अगदी कोपरापर्यंत ओघळ येत असल्याचे पाहत आंबे खाण्याच्या आठवणी जाग्या करणारे हे पुस्तक आहे. मुलांच्या भाषेतील हे पुस्तक त्यांचे निरागसपण जपणारे आहे. कैऱ्या का तोडून आडीत ठेवायच्या हा खुलासाही त्यांनी केला आहे. मुलांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे देणारे हे पुस्तक आहे. आजकालची मुले इतकी निरागस व भाबडी नसली तरी त्यांच्या मनातील जिज्ञासा जागवणारे व शमविणारे हे पुस्तक जरूर आहे. मदतीचा हात हे सहा कथा असलेले पुस्तक असेच आपल्याला खाण्याची शिस्त लावणारे आहे. आपण आपल्या जेवणातील भाज्या खाताना कुरकुर करतो. आजही मेथीथीच भाजी असं म्हणत कुरकुर करणारा आदित्य आणि तीच भाजी आवडणारी सई यांच्यातील संवाद व आजीचा सल्ला यांची सांगड घालणारी ही कथा. आजच्या मुलांना माहीत नसलेला किंवा कधीच म्हटला जात नाही असा वदनी कवळ घेता या श्लोकाच्या समावेशाने हे पुस्तक अधिक महत्त्वाचे बनले आहे. त्यानिमित्ताने तो श्लोक मुलांना व त्यांच्या पालकांनाही माहीत होईल. जेवण कसं जेवावं याचीही माहिती मामीच्या तोंडी घातली आहे. मदतीचा हात ही कथा भोपळ्याची भाजी न आवडणाऱ्या मुलाची ही कथा. आपण कुठलंही जेवण नाकं मुरडत जेवतो. परंतु अनाथ व गरीब मुलांना मिळेल ते आनंदाने खावे लागते. कथानायक राहुलला शिकवण्यासाठी आईने त्याला ओंकारेश्वराच्या मंदिरात घेऊन जाते. जाताना खूप जेवण घेऊन जाते. राहुलला ते कळत नाही. पण मंदिरातील अपंग व अनाथ मुले व माणसे ते जेवण खाण्यासाठी किती आतुर आहेत हे कळल्यावर राहुल आपण होऊन त्यांना जेवण वाढतो. म्हणजे कृतीतून एखादी गोष्ट पटवून देऊन मनावर बिंबवण्याचे काम ही कथा करते. आनंद ही कथा अशीच उपदेशात्मक आहे. अक्षयचा वाढदिवस साजरा न करता आधार केंद्रात जाऊन तेथील मुलांबरोबर साजरा करण्याची कल्पना भन्नाट आहे. तिचे अनुकरण शहरातील सर्व मुलांनी करायला हवे, असे सुचविणारी ही कथा आहे. देणाऱ्याने देत जावे या उक्तीप्रमाणे अक्षय कसा शहाण्यासारखा वागतो हे या कथेत आले आहे. खेळणी या कथेतदेखील आपली अनावश्यक खेळणी इतरांना दान करावीत व त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद निरखीत राहावे, असे सांगणारी ही कथा आहे. शेफ सोहम ही कथाही अशीच आपल्याला स्वावलंबी बनण्याचा संदेश देते. एकंदरीत मूल्यशिक्षण देणारी व जुन्या काळातील आठवणी जागविणारी व हसत खेळत शिकवण देणारी ही पुस्तके नव्या पिढीला उपयुक्त निश्चित ठरतील.

**आंब्याचे दिवस**
**पृष्ठे १६ , मूल्य ४० रुपये**
—
**मदतीचा हात**
**पृष्ठे ४८, मूल्य ८०रुपये**
**दोन्ही पुस्तकांचे प्रकाशक**
**जे. के. मीडिया**
**ठाणे, मुंबई ४००६०७**



# शॉक लागून चिमुकल्याचा जागीच मृत्यू

## लोह्यात महावितरणच्या उपअभियंत्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील तलाठी कॉलनी भागात छतावरील गजाळीत घरावरून गेलेल्या विजेच्या तारेचा संपर्क झाल्याने त्यात विजेचा प्रवाह आला असता गजळीस पाच वर्षीय चिमुकल्याचा स्पर्श झाल्याने तो जागीच मृत पावल्याची घटना दि. ९ रोजी सकाळी आठ वाजता चे सुमारास घडली. महावितरणच्या निष्काळजी व हलगर्जीपणामुळे चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची तक्रार मयत मुलाच्या वडिलांनी लोहा पोलिसात संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



लोहा शहरातील तलाठी कॉलनी भागात राहणारे गोविंद संभाजी देवकते हे दि. ९ मे रोजी सकाळी कामानिमित्त घराबाहेर होते. दरम्यान घरात कुटुंबातील मंडळी सकाळच्या कामात व्यस्त असताना अथर्व गोविंद देवकत्ते ( वय ५ वर्ष ) हा खेळत खेळत घरावरील छतावर गेला. घराचे छतावरून महावितरणचे ११ केव्ही चे विद्युत प्रवाहाचे तार गेलेले आहे. सदर तार ही हवेमुळे घराच्या कॉलमला असलेल्या गजाळीस चिटकली सदरील गजाळीस चिमुकल्या अथर्वा ने हाताने पकडले असता शॉक लागून चिमुरडा बेशुद्ध पडला त्याची आई त्यास वाचविण्यासाठी गेली असता तिला देखील विजेचा शॉक लागून ती जखमी झाली. ऐन आरडाओरडा केल्याने शेजारील नागरिक धावून आले. त्यांनी तत्काळ आई आणि चिमुकल्या दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी अथर्व यास तपासून मृत घोषित केले.

मागील जवळपास वीस वर्षापासून विद्युत तारेतील वीज प्रवाह बंद आहे. परंतु सदरील तारेच्या खालुन गल्लीतील महावितरणचे पोलवरून एलटी लाईन क्रॉसमध्ये गेलेली आहे. त्याचे विद्युत प्रवाहाचे तार देवकते यांच्या घरावरून गेलेल्या ११ केव्ही च्या बंद असलेल्या विद्युत प्रवाहाचे तारेला चिटकुन आहेत. त्यामुळे सदर विद्युत प्रवाह असलेले तार बंद असलेल्या विद्युत प्रवाहाच्या तारेला स्पर्श होऊन सातत्याने स्पार्क होत होती आणि छतावरील कॉलम च्या गजाळीला लागुन त्यामध्ये विद्युत प्रवाह उतरत होता. त्यामुळे देवकते कुटुंबाच्या वतीने विद्युत प्रवाहाचे तार धोकादायक बनले असल्यामुळे विजेचा शॉक लागून एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता असल्याचे मागील एका वर्षापासुन लोहा महावितरण कार्यालयाकडे उपविभागाचे अभियंता सचिन गणपत दवंडे, शहराचे अभियंता ऋषिकेश जांभुळे व तलाठी कॉलनी भागाचे लाईनमन संग्राम मोरे यांना भेटून तसेच अर्ज निवेदन करून देखील त्यांनी घरावरील विद्युत प्रवाहाचा तार काढून टाकली नाही. परंतु संबंधितांनी घरावरील विद्युत प्रवाहाचा तार काढला नाही. आणि विशेष म्हणजे घरा शेजारील सचिन हागदळे, अर्जुन लामदाडे, आत्माराम सुर्यवंशी, देवराव पवार यांचेकडुन अनाधिकृतरित्या पैसे घेऊन त्याचे घरावरील विद्युत प्रवाहाचा तार काढून टाकले. मात्र आमच्या घरावरील विद्युत प्रवाहाचा तार काढले नसल्याचे तक्रारीत आरोप केले आहेत. त्यामुळेच चिमुकल्याचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला असून त्यांच्याविरुद्ध सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची विनंती तक्रारीत करण्यात आली होती.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून प्रेत उत्तरीय तपासणीसाठी लोहा उपजिल्हा रुग्णालयात पाठविले. याप्रकरणी मयत मुलाच्या पित्याने लोहा पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे हे करत आहेत.

महावितरण कंपनीच्या निष्काळजीपणाने कळस गाठला असून, शहरासह तालुक्यात अवैद्य मार्गाने भरमसाठ पैसे घेऊन पोलवरून अंदाजे पाचशे ते सहाशे फूट लांब सर्विस वायर टाकून विद्युतधारकांना विजेचे कनेक्शन दिले असून लोहा शहरातील शिक्षक कॉलनी तलाठी कॉलनी व माळावरील पाण्याच्या टाकी परिसरात अवैद्य पैसे घेऊन कनेक्शन दिल्याचे जनतेतून बोलल्या जात आहे महावितरण कार्यालयातील मदत केंद्रातील दूरध्वनीवर संपर्क साधला असता तो बंद असल्याचे बऱ्याच वेळेस आढळून आले आहे काही काही कामानिमित्त उपविभागीय अभियंता, शहर अभियंता तथा संबंधित लाईनमन यांना फोन केला तर त्यांचा फोन बंद येतो किंवा ते उचलत नसल्याचे आढळून येत आहे . काही ठिकाणी लाईनमन यांनी भरमसाठ पगार घेऊनही खाजगी मनुष्यबळ वापरून कामे करण्यास सुरुवात केली आहे, ते वीज ग्राहकाकडून अवैद्य पैसे घेऊन कामे करून देण्यात येत असल्याचे दिसून येत आहे . शिक्षक कॉलनी, तलाठी कॉलनी तसेच इंदिरानगरच्या पाठीमागील भाग तसेच श्रीकृष्ण नगर या भागातील लाईनमन च्या संपत्तीची चौकशी केल्यास अवैद्य मार्गाने कमावलेल्या पैशाचा अंदाजा येईल असे जनतेतून बोलल्या जात आहे .

# १६ जूनपासून गोव्यात वैश्विक हिंदू राष्ट्र महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** गोवा राज्यातील फोंडा येथील श्री रामनाथ देवस्थान येथे १६ ते २२ जूनदरम्यान अखिल भारतीय वैश्विक हिंदू राष्ट्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या ११ वर्षांपासून दरवर्षी हा महोत्सव घेण्यात येतो. या महोत्सवात विदर्भातून शेकडो पदाधिकारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती हिंदू जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर यांनी दिली. महोत्सवाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला हिंदू विधिज्ञ परिषदेचे ॲड. मुकुंद जालनेकर, राष्ट्र जागृती मंचचे संस्थापक अध्यक्ष संजय ठाकूर, समितीच्या जिल्हा सहसमन्वयक ॲड. श्रुती भट आदी उपस्थित होते. अधिवेशनामध्ये नेपाळसह भारताच्या २८ राज्यांतून दीड हजार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यंदाच्या अधिवेशनामध्ये 'हिंदू राष्ट्र संसद' या वैशिष्ट्यपूर्ण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विविध विषयांवरील तज्ज्ञ मंडळींचे परिसंवाद, तसेच विशेष कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या मुलाखती अधिवेशनाचे विशेष आकर्षण असणार आहे. विविध विषयांवर महोत्सवामध्ये विचारमंथन होणार असल्याचे श्रीकांत पिसोळकर म्हणाले. अधिवेशनाला देशातील विविध धर्मपीठांच्या संतांची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय ज्येष्ठ अधिवक्ता हरिशंकर जैन, विष्णू शंकर जैन, तेलंगणा येथील आ. टी. राजासिंह, 'हिंदू इकोसिस्टिम'चे संस्थापक कपिल मिश्रा यांच्यासह वरिष्ठ अधिवक्ता, उद्योजक, विचारवंत, लेखक, मंदिर विश्वस्त, तसेच अनेक समविचारी सामाजिक, राष्ट्रीय आणि आध्यात्मिक संघटनांचे प्रतिनिधी अधिवेशनात उपस्थित राहणार आहेत.



# हज यात्रेला जाणाऱ्या भाविकांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** हज यात्रेसाठी निवड झालेल्या गणेश कॉलनी छत्रपती संभाजीनगर येथील भाविकांचा सत्कार कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांनी पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन हजयात्रा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. छत्रपती संभाजीनगर येथील विवेकानंद महाविद्यालयाचे कर्मचारी हाजी युनूस जमालोद्दीन शेख जहागीरदार आणि त्यांची पत्नी श्रीमती सुरैय्या युनूस शेख यांची हजसाठी निवड झाली असून ते हजला रवाना होण्यापूर्वी त्यांचा प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी कय्युम पठाण, युनूस पठाण, हाजी अनिस पठाण , हाजी श्रीमती अहेमदाबी महेबूब पठाण हे उपस्थित होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# तेलंगणातील दोघांना मुंबईतून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** बँक क्षेत्राला हादरवून सोडणाऱ्या येथील वर्धा नागरी बँकेतील सायबर हल्ला प्रकरणात दोघांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. हैद्राबाद येथील शिवशंकर येंडू कोंडाल केसान व चंदू रमनय्या परचुरू, अशी आरोपींची नावे आहेत. अवघ्या पंधरा दिवसात अत्यंत किचकट अशा गुन्ह्यात आरोपींचा छडा लागला आहे. २४ मे रोजी नागरी बँकेतील १ कोटी २१ लाख रुपयाची रक्कम लंपास करण्यात आली होती.

त्या खात्यातून सायबर गुन्हेगारांनी ही रक्कम विविध बँकांच्या खात्यात ऑनलाईन वळती केली होती. पोलीसांनी तपासाची सूत्रे हातात घेताच प्रथम वळती करण्यात आलेल्या रकमेपैकी तीस लाख रुपये थांबविण्यात फत्ते केली. ज्या दिवशी बँकांच्या खात्यात रक्कम वळती करण्यात आली होती त्याच दिवशी वेगवेगळ्या शहरातील एटीएम केंद्रातून ही रक्कम काढल्या गेली. वर्धा सायबर गुन्हे विभागाने त्यानंतर तांत्रिक उकल करीत पुढे तपास सुरू केला. लीस अधीक्षक नूरुल हसन यांनी बँक अधिकाऱ्यांशी स्वतः बोलून अनेक बाबींचा उलगडा केला.



# मोदींच्या माध्यमातून जगभरात भारताचा डंका

## आमदार लोणीकर : बरबडा येथे महाजनसंपर्क अभियान बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

परतूर : विश्वविख्यात नेते आणि भारताचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या केंद्रातील सरकारला नऊ वर्ष पूर्ण झाले असून या ०९ वर्षाच्या कालखंडामध्ये मागील ७० वर्षांचा अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न पंतप्रधान मोदींनी केला आहे जे काम स्वातंत्र्याचा ७० वर्षात जे होऊ शकले नाही ते काम मागील ०९ वर्षाच्या कालखंडात पंतप्रधानांनी करून दाखवले आहे संपूर्ण जगभरात पंतप्रधान मोदींची लोकप्रियता असून भारताचा दबदबा निर्माण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रातील सरकारने लोककल्याणाच्या अनेक योजना सुरू केल्या असून त्या योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांचे जीवनमान उंचावण्याचा निश्चितपणे प्रयत्न झाला आहे त्या सर्व योजनांना सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी महा जनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले. मंठा तालुक्यातील श्रीक्षेत्र सूर्यनारायण मंदिर बरबडा येथे आयोजित मोदी@9 महा जनसंपर्क अभियान दरम्यान आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान श्री लोणीकर बोलत होते. यावेळी पुढे बोलत असेल लोणीकर म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या माध्यमातून संपूर्ण जगावर भारताचा एक आदरयुक्त दबदबा निर्माण झाला असून सर्वच क्षेत्रात भारत अग्रेसर बनला आहे मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे प्रभू श्री रामचंद्राचे मंदिर, तीन तलाक, काश्मीर मधील ३७० कलम यासारखे अनेक प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात पूर्णत्वास गेले असून शिल्लक असलेल्या अनेक प्रश्नांना केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच पूर्णत्वास नेऊ शकतात असा विश्वास सर्वसामान्य जनतेला आहे. असेही लोणीकर यावेळी म्हणाले. ३० मे ते ३० जून दरम्यान महा जनसंपर्क अभियान राबवले जात असून मतदारसंघातील महत्त्वाच्या विकास कामांना भेटी दिल्या जाणार आहेत त्यामध्ये शेगाव- पंढरपूर दिंडी मार्ग, परतुर वॉटर ग्रीड, मंठा वॉटर ग्रीड, तीर्थक्षेत्र, क्रीडांगण नाट्यगृह अनेक महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी दिल्या जाणार आहेत त्याचबरोबर परतुर, मंठा, आष्टी,




सातोना, वाटुर, सेवली, नेर, तळणी यासारख्या महत्त्वपूर्ण बाजारपेठां मधील व्यापारी बांधवांची भेट घेतली जाणार आहे पक्षाच्या संघटनात्मक रचनेप्रमाणे विविध मोर्चा व आघाड्यांमधील पदाधिकाऱ्यांचे संमेलन देखील यादरम्यान घेतले जाणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली. यादरम्यान जेष्ठ कार्यकर्त्यांशी संवाद, सोशल मीडिया टीम सोबत संवाद, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची व्हिडिओ कॉन्फरन्स यासह आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाणार असल्याची माहिती देखील श्री लोणीकर यांनी यावेळी दिली यावेळी परतूर विधानसभा निवडणूक प्रमुख श्री गणेशराव खवणे भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य सतीशराव निर्वळ ज्ञानेश्वर माऊली शेजुळ माजी सभापती संदीप गोरे पंजाबराव बोराडे राजेश मोरे नागेश घारे विलास आकात शत्रुघ्न कणसे संभाजी वारे रवी सोळंके रामप्रसाद थोरात संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण विठ्ठलराव काळे दिगंबर मुजमुले अमोल मोरे नवनाथ खंदारे परमेश्वर आकात भगवान आरडे दत्तराव कांगणे सुरेश सोळंके महादेव बाहेकर संपत टकले राजेंद्र वायाळ अशोक बरकुले पद्माकर कवडे बबलू सातपुते नितीन सरकटे नवनाथ चट्टे किरण देशमुख आनंद जाधव बाबाजी जाधव बंडू मानवतकर बाबाराव थोरात गजानन उफाड विक्रम उफाड शिवराज तळेकर प्रमोद भालेकर सौरभ माहोरकर मधुकर मोरे प्रमोद राठोड गणेश सोळंके अर्जुन राठोड अजय चव्हाण सिताराम राठोड निर्धास्त राठोड रमेश आढाव नारायण बिडवे गणेश चव्हाळ बाळासाहेब तौर विठ्ठलराव कदम महेश पवार गजानन लिपणे सोपान वायाळ सुभाष चव्हाण उद्धव वायाळ द्वारकादास चिंचाने बाळासाहेब हजारे गीताराम हजारे प्रकाश हजारे शरद मोरे नितीन चव्हाण विष्णू गायकवाड गौतम खरात विलास देशमुख जितेंद्र सरकटे राजेश राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती .

## पुंडलिक नगर येथील मनोरुग्णाने स्वतःच्या पत्नीवरच केला चाकूने वार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मनोरुग्ण अवस्थेत दहशत निर्माण करणाऱ्या पुंडलिक नगर येथील व्यक्तीला पोलिसांनी माणुसकी समुहाच्या मदतीने आणि सु- लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने पुणे येथील मनोरुग्णालयामध्ये दाखल केले आहे.औरंगाबाद शहरातील पुंडलिक नगर मधील मनोरुग्ण अवस्थेत फिरणाऱ्या तीस वर्षीय आकाश इंगळे यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. आकाश इंगळे मागीन दहा वर्षापासून मनोरुग्ण आहे. त्याच्यावर शासकीय रुग्णालयात तसेच खाजगी रुग्णांमध्ये रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत.पण आता तो रात्री बे रात्री केव्हा ही बाहेर फिरतो. घरात पत्नी एकटी असताना त्याने तिच्या गळ्यावर चाकूने वार केले व तिला जीव मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्या पत्नीने चाकू हातात धरून कसा बसा स्वतःचा जीव वाचवला, अशा पद्धतीने तो घरामध्ये दहशत पसरवत होता. शेवटी त्याच्या पत्नीने पुंडलिक नगर पोलिसांना या संदर्भात माहिती दिली. पोलिसांनी आकाश इंगळे याला पकडून त्याच्या पत्नीच्या फिर्यादीवरून कलम 324, 504 भा.द.वि. प्रमाणे दिनांक ४ जून २०२३ रोजी गुन्हा दाखल केला. परंतु तो मानसिक आजार असल्याने आणि औरंगाबादमध्ये अशा रुग्णांना ठेवण्याची कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे पोलिसांनी सु- लक्ष्मी बहुउद्देशीय सेवेचे आणि माणुसकी समूहाचे प्रमुख सुमित पंडित यांना बोलावून या मनोरुगणासाठी रुग्णालयात उपचारात दाखल केले व तेथून त्याला न्यायालयामध्ये हजर करून, आदेशानुसार येरवडा येथील मनोरुग्न रुग्णालयामध्ये त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आले.अशा मनोरुग्णाला पुणे येथे दाखल करणे हे खूपच धोक्याचे काम आहे.कारण बऱ्याच वेळा असे मनोरुग्ण सोबतच्या सहकाऱ्यांना पण ड त्रास देतात, या सर्व कारवाईच्या वेळी पुंडलिकनगर येथील पोलीस निरीक्षक राजश्री आडे मॅडम, सहाय्यक पोलीस निरीक्षक घटाने, पोलीस उपनिरीक्षक संदीप काळे, पोलीस हवालदार एल.बी. हिंगे व माणुसकी समूहाचे समाजसेवक सुमित पंडित, समाजसेविका पूजा पंडित, डॉ निलेश सोनवणे, बोधी संस्थेच्या डॉ.रंजना दंदे यांनी सहकार्य केले

## भाजपा विधानसभा मतदारसंघ प्रमुखपदी सुहास शिरसाठ यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक भाजपाच्यावतीने प्रमुख पदी तालुकाध्यक्ष तथा जिल्हा बँकेचे संचालक सुहास शिरसाठ यांची निवड करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही निवड केली आहे. फुलंब्री शहराचे नगराध्यक्षपद शिरसाठ यांनी भूषविले असून भारतीय जनता पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदाची धुराही त्यांच्याकडे आहे. नुकत्याच झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समि तीच्या संचालकपदी त्यांची निवड झाली आहे. त्याचबरोबर दोन वर्षांपूर्वी झालेली जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही शिरसाठ यांनी बाजी मारली आहे. त्याच प्रमाणे नुकत्याच झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत विजय संपदान केला आहे. आता प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुन्हा त्यांच्याकडे फुलंब्री विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक प्रमुखपदी निवड करून आणखी एक जबाबदारी दिली. सुहास शिरसाठ यांची फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. आगामी काळात फुलंब्री विधानसभा संघटन अधिकाधिक मजबूत करणार आहोत. शिवाय सर्वांना सोबत घेऊन राज्याचे नेतृत्व पुन्हा सक्षम करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय मंत्री भागवत कराड, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, अतुल सावे व प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही सज्ज असल्याचे सुहास सिरसाठ यांनी सांगितले.

## पत्नीचीच आक्षेपार्ह छायाचित्रे केली सोशल मीडियावर व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कौटुंबिक वादातून पत्नीची आक्षेपार्ह अवस्थेतील छायाचित्रे प्रसारित करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पत्नीविषयी समाजमाध्यमातील अश्लील मजकूर प्रसारित केल्या प्रकरणी एकाच्या विरुद्ध मार्केट यार्ड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.याबाबत एका ३५ वर्षीय महिलेने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# डबेवाल्यांना परवडणाऱ्या किमतीत घरे

## भाजपा नेते आ. श्रीकांत भारतीय यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** सेवाभावी वृत्तीने काम करणा-या डबेवाल्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याचा निर्णय शिंदे- फडणवीस सरकारने घेतला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी गृहनिर्माण विभागाचे अधिकारी व डबेवाले संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर घेतलेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती भाजपा नेते आ. श्रीकांत भारतीय यांनी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी डबेवाला ट्रस्ट अध्यक्ष उल्हास मुके, डबेवाला असोसिएशन अध्यक्ष रामदास करवंदे व भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. आ.भारतीय यांनी सांगितले की, १८९० पासून मुंबईमध्ये सेवा पुरवणाऱ्या डबेवाल्यांना मालकीची घरे मिळावीत, अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या बाबत आपण विधिमंडळाच्या मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी श्री. फडणवीस यांनी डबेवाल्यांना घरे देण्याचे आश्वासन दिले होते. त्या नुसार आजच्या बैठकीचे आयोजन केले होते. म्हाडा, सिडको तसेच महसूल विभागाकडून जागा घेऊन डबेवाल्यांना परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. डबेवाल्यांना त्यांची सेवा देणे सोईस्कर होईल अशा ठिकाणी त्यांना घरे देण्यात येतील, असेही आ.भारतीय म्हणाले.डबेवाल्यांच्या घरांचा प्रश्न शिंदे- भाजपा सरकारने अतिशय संवेदनशीलतेने हाताळला आणि मार्गी लावला त्याबद्दल आ. भारतीय यांनी श्री. फडणवीस यांचे आभार मानले. डबेवाल्यांना त्यांच्या कामकाजाची माहिती देण्यासाठी उपयुक्त असलेले मुंबई डबेवाला भवन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे आ. भारतीय म्हणाले.

# निगडीत मनोरुग्ण तरुणीवर अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** मनोरुग्ण तरुणीशी जवळीक साधून, मानसिक आजाराचा फायदा घेऊन तिच्यावर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना मे २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत निगडी, पुणे, येलवाडी या परिसरात घडली.

या प्रकरणी तरुणीच्या आईने निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार माणिक नानाभाऊ होरे ( वय ३५ ) याला अटक केली आहे. त्याला मदत करणाऱ्या त्याच्या पत्नी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांच्या मुलीचा विश्वास संपादन करून, ती मनोरुग्ण असल्याचे माहिती असूनदेखील आरोपी माणिक याने तिच्याशी जवळीक साधली. गोड बोलून, मानसिक आजाराचा फायदा घेऊन जबरदस्तीने बलात्कार केला. फिर्यादी व त्यांच्या पतीने याबाबत आरोपीला फोन करून जाब विचारला. तू आमचा विश्वासघात केला आहे, असे म्हटले असता. आरोपीने त्यांना शिवीगाळ करत त्यांचा मुलगा आणि त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीला त्याच्या पत्नीने साथ दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. निगडी पोलीस तपास करत आहेत.

# बँक ऑफ इंडियाचे शाखा प्रबंधक नाईक यांची बदली : पिलीवकरांना अश्रू अनावर

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथील बँक ऑफ इंडियाचे



शाखा प्रबंधक शांत, संयमी व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून अल्पावधीतच आपली लोकप्रियता वाढवलेले विजय नाईक यांची पिलीव येथून थेट सोलापूर झोनल ऑफिस येथे बदली झाली आहे.पिलीव येथील बँक ऑफ इंडिया ही शाखा अनेक वर्षांपासून कार्यरत आहे.परंतु विजय नाईक यांच्या कार्यकाळात बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांना जी समाधानकारक वागणूक/सेवा मिळाली ती सेवा या अगोदर कोणत्याही शाखाप्रबंधकाकडून मिळाली नसल्याचे पिलीवसह परिसरातील जाणकार लोकांकडून बोलले जात आहे.विजय नाईक यांच्यासह बँक अधिकारी अभिजीत मोहळे यांच्या तडकाफडकी बदलीने पिलीव, कुसमोड.झिंजे वस्ती, काळवाडी, चांदापुरी पठाण वस्ती, तांदुळवाडी, शिंगोर्णी, बचेरी, कोळेगाव यांसह इतर गावातील लोकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.सदरची बदली रद्द करून विजय नाईक यांना पिलीव शाखेतच ठेवावे अशी विविध सामाजिक संघटनांकडून मागणी होत आहे.अशा कर्तव्यदक्ष व संयमशील व्यक्तीची अचानक बदली झाल्याने बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांकडून संताप व्यक्त होत आहे व बदली रद्द करण्याची मागणी होत आहे.विजय नाईक यांनी पिलीव शाखेचा पदभार स्वीकारल्यापासून अनेक गोरगरीब व गरजू लोकांना कायद्याच्या कचाट्यात राहून सहकार्य केले असून अनेक सुशिक्षित बेकार तरुणांचे मजूरीकडचे हात ओळवून उद्योग धंद्यामध्ये गुंतविले आहेत तर अनेक वर्षांपासून थकीत असलेल्या थकबाकीदारांकडून थकबाकी वसूल केली आहे.त्यामुळे त्यांची पिलीसह परिसरामध्ये एक वेगळीच क्रेझ निर्माण झाली आहे.परंतु यांच्या अचानक बदलीची वार्ता परिसरामध्ये पसरताच लोकांना अश्रू अनावर झाले असल्याचे पहावयास मिळत आहे.

# प्रवेशद्वाराची कमान कोसळून बालकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नियोजित गृहप्रकल्पातील प्रवेशद्वाराची कमान कोसळून सात वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अर्णव मिथीलेश राय ( वय ७, सध्या रा. गुलमोहोर सोसायटी, वाघोली, नगर रस्ता ) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. अर्णवचे वडील मिथीलेश राय ( वय ३६ ) यांनी या संदर्भात लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



# सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडून जेजुरीच्या पालखी मैदानाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत 16 जून रोजी मुक्कामी विसावत असून त्या अनुषंगाने या राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी जेजुरीच्या पालखी तळाची पाहणी करून आधिकारी वर्गाशी चर्चा केली. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत जेजुरी गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाच्या काठावर नऊ एकर जागेत गेल्या वर्षी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या मुक्कामासाठी नव्याने पालखी तळ विकसित करण्यात आला आहे. गुरुवार दिनांक 8 रोजी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जेजुरीच्या पालखी तळाला भेट दिली . यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी जेजुरीत पालखी सोहळ्यासाठी जागा, पाणी, वीज, शौचालये, स्वच्छता, येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंग याबाबत चर्चा केली. जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी पालखी सोहळ्या संदर्भात माहिती दिली.यावेळ बाबाराजे जाधवराव भाजपा शहर अध्यक्ष सचिन पेशवे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, गटनेते सचिन सोनवणे अजिंक्य देशमुखउपस्तिथ होते , भाजपाचे सचिन पेशवे यांनी मंत्री महोदय यांचा पालखी मैदानावर सत्कार केला . यावेळी नगर पालिका, पोलीस, आरोग्य, वीज, महसूल , सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थितीत होते.

# जनमानसापर्यंत वृक्षसंगोपन संवर्धनाची चळवळ रुजावी : शांताराम मगर

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** वृक्षवल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे वृक्षच मानवाच्या जीवनामध्ये आनंद देऊ शकतात. त्यामुळे तरुणांनी वाढदिवसानिमित्त वृक्षलागवड करण्याचा नवीन उपक्रम मागिल एक वर्षांपासून हाती घेतलाआहे. त्यामुळे वाढदिवसाच्या अनाठायी खर्चाला आळा बसेल व जीवनात आपण काहीतरी समाज उपयोगी कार्य या निमित्ताने करू शकतो म्हणून मी हा वाढदिवस अगदी साध्या पद्धतीने वृक्ष लागवड करत साजरा केला आहे. तालुक्यातील तलवाडा येथील तरुण- युवकांनी अशाच प्रकारचा वाढदिवस साजरा करावा. वाढदिवस म्हटले की बॅनर, पोस्टर लावण्याची परंपरा गेल्या काही वर्षात सर्वत्र दिसून येते, मात्र या परंपरेला फाटा देत समाजोपयोगी आणि पर्यावरणाचे संवर्धन व्हावे हा उद्दात हेतू समोर ठेवूनपर्यावरणाचे संतुलन आणि समतोल कायम राखण्यासाठी व वृक्ष संगोपणाची चळवळजनमाणसापर्यंतरुजावीया हेतूने

वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथील नागवागवाडी येथील जिल्हापरिषद, शाळा, परिसरामध्ये शांताराम मगर यांच्या वाढदिवसानिमित्त वटवृक्ष लागवड करण्यात आले यावेळी काशीनाथ मगर ज्ञानेश्वर मगर, जालींदर शिंदे, रामदास मगर गणेश मगर सुदर्शन मगर संकेत मगर ओमकार मगर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना शांताराम मगर म्हाणाले दिर्घायुष्याकरीता नैसर्गिक आरोग्यवर्धक गुणधर्म अंतर्भुत असलेले वृक्ष मानवाला प्राणवायु, फळं, फुलं, सावलीच देत नाहीत तर अंतिम क्षणातही त्याला साथ देतात. ही जाणीव अंगी बाळगून त्याने पर्यावरणास घातक ठरणाऱ्या घटकांचे पतन करुन वृक्षांचे रक्षण केले पाहीजे. संपूर्ण तलवाडा गावात तरुण वर्ग ग्रामपंचायतीच्या वि,वि,का, सोसायटीतच्या माध्यमातून वृक्ष लागवड करण्याकरीता सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे.पर्जन्यमानासाठी व पारिस्थितीकी संतुलनासाठी दृष्टिने निश्चितच उपयुक्त असल्यामुळे ग्रामीण भागाच्या सौदर्यात सुध्दा भर पडेल. नागरीकांनी वृक्षांना आपल्या अपत्याप्रमाणे समजून संगोपन केल्यास शुध्द प्राणवायु मिळेल तसेच आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल.

परंतु दिवसेंदिवस वाढत चाललेल्या व्यावसायिक, राजकीय जाहीरतीबाजीच्या फलकांमुळे सजीव वृक्षांनाच मोकळा श्वास घेणे कठीण झालेले दिसते. त्याकरीता बहूतांश ठिकाणी वृक्षांवर लावलेले फलक शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून त्वरीत हटविण्यात येवून वृक्षांचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे, रस्ता रुंदीकरणाच्या पट्ट्यातील वृक्षतोड हा विकासात्मक भाग असला तरी त्या वृक्षकत्तलीच्या जागी नवीन वृक्ष लागवड करुण त्याच्या संगोपनाची अंमलबजावणी झाली पाहीजेत. कृतीनंतरही उल्लंघन करणारांवर योग्य ती कार्यवाही करावी असे शांताराम मगर म्हणाले.



अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406